साप्ताहिक

# माणूस

२१ जून ८६/२ रूपये




## लॉस एंजेलिस ते न्यूयॉर्क

## विजयश्री !

# सप्रेम नमस्कार...

□ 'माणूस' ७ जून १९८६ चा अंक वाचनीय वाटतो. त्यातील वैचारिक लेखन चिंतनीय वाटतं. डॉ. ग. ना. जोगळेकर यांनी सादर केलेला परिसंवादाचा वृत्तांत ('नियत-कालिकांना भरती ... दर्जेदार साहित्याला ओहोटी') व त्यावरील प्रतिक्रिया वाचनात आल्या. त्यात प्रा. स. शि. भावे यांनी अनिल अवचटांचं लेखन सामाजिक निरीक्षणावर आधारित आहे व त्या लेखनाचा 'वाङमय प्रकार' कोणता असावा, हा प्रश्न व संभ्रम उपस्थित केला आहे. मॅसाच्युसेट्स विद्या-पीठातील प्रा. नॉर्मन सिम्स अशा लेखन-प्रकाराला 'लिटररी जर्नालिझ्म' किंवा 'वाङमय पत्रकारिता' म्हणतो. अमेरिकेत १९६५ ते ११७५ व पुढे जॉन मॅक्फी, टॉम वुल्फ, जोन डिडिऑन्, रिचर्ड ऱ्होडस व इतरांनी 'ललित गद्य आणि वैचारिक लेखन यांच्या सीमारेषा' पुसल्या जाणारं बरंच लेखन केलं व आज तरुण पत्रकार त्याचं अनु-करण करत आहेत. भारतात १९७५ नंतर अनेक नियतकालिके निघाली. त्यात तरुण लेखक या स्वरूपाचं लेखन करत आहेत. या तरुण लेखकांनी पत्रसृष्टीचा चेहरामोहरा पालटून टाकला. लेखक (किंवा पत्रकार) विविध विषयांचं, घटनांचं, सामान्य जन-जीवनाचं निरीक्षण करतो, त्याचं अंतरंग शोधतो, मानसिक विश्लेषण करतो, स्वतःचं मत बनवतो व एखाद्या कादंबरीकाराप्रमाणं सत्य घटनांचं लालित्यपूर्ण, सुबोध शैलीत चित्रण करतो. दैनंदिन जीवनात त्याला संघर्ष व नाट्य प्रतीत होतं. सत्ता अथवा राजकारण याभोवतीच केवळ पिंगा न घालता सांस्कृतिक जीवनाचं अंतरंग उलगडून दाख-वतो. यात लालित्य, आकर्षकता व विचार असतो. सत्य आणि कल्पकता यांचे बेमालूम मिश्रण असतं. ( पाहा : नॉर्मन सिम्स : द लिटररी जर्नालिस्टस् : द अमेरिकन रिव्ह्यू समर १९८५. व्हॉ. २९, नं. ४)

डॉ. जोगळेकर म्हणतात, आजचे अनेक लेखक 'कलमबहाद्दर' ऐवजी 'कॉलम बहाद्दर' आहेत. माटे, पाध्ये व क्षीरसागर हे वैचारिक ग्रंथलेखनाबरोबर सदर लेखनही करत असत. पूर्वी शिक्षित वर्ग व लेखक किती होते? नियतकालिके किती होती? वैचारिक व सदर लेखन अनेकांनी केलं का? पूर्वीच्या आणि आजच्या जीवनात बराच फरक आहे. पूर्वी वेळ भरपूर होता.संधी घरी चालून येत. ज्ञानसाधने व ग्रंथसंख्या कमी. दगदग कमी. निवांतपणा जास्त. आजचं जीवन धावपळीचं, दगदगीचं, कटकटीचं झालं आहे. संधी कमी व स्पर्धा वाढली आहे. ज्ञानाचा स्फोट झाला आहे चिंतनाला कमी वेळ आहे. विवंचना


साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सव्विसावे
अंक : तिसरा
२१ जून १९८६
किंमत : दोन रुपये
वार्षिक वर्गणी
साठ रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

मुखपृष्ठ :
सुरेश नावडकर

पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.


वाढल्या आहेत संघर्ष वाढले आहेत अशा स्थितीत तरुण लेखक धडपडतो, लेखन करतो याचं खरं तर कौतुक झालं पाहिजे 'कॉलम बहाद्दर' म्हणून हिणवण योग्य नाही. कॉलम्सची मर्यादा सपादक घालतात, लेखक नव्हे. कागद व मुद्रणाचा, मजुराचा खर्च वाढला आहे. विविध सदरासाठी 'कॉलम्स'ची मर्यादा ही परिस्थितीमळं अनिवार्य झाली आहे शब्दाची काटकसर महत्त्वाची ठरते. कमीत कमी शब्दात अधिक आशय व्यक्त करणं सोपं नाही. सपादकाला मर्यादा असतात. अनेक विषयावर लेखन प्रकाशित केलं जातं. वाचकाना सर्व विषयांची 'मिसळ' हवी असते. एकाच विषयाला वाहिलेली गंभीर व चिंतनशील लेखन प्रकृतीची मासिके कोणी वाचत नाही अशा स्थितीत देखील पूर्वीचा माटे, पाध्ये, क्षीरसागर याचा वारसा गोविंद तळवलकर व माधव गडकरीसारखे लेखक पुढे चालवत आहेत. ते वैचारिक व सदर लेखन, संपादकीय व प्रासंगिक अशा दोन्ही स्वरूपाचं लेखन करताना दिसतात. या संदर्भात इंग्रजीतील तरुण पत्रकार एम जे अक्बर याचं नावही सागता येईल. काहींचं याकडे लक्ष नाही, याला काय करायचं ?

वृत्तात दलित व जैन नियतकालिकाचा उल्लेख आहे पण मराठीतील वीरशैव (लिंगायत) नियतकालिकाकडं डोळेझाक होते. उदा ज्ञानप्रसाद, कोल्हापूर व कपिलधार, लातूर. त्यातील मजकूर वीरशैव सप्रदाय आणि सस्कृतीविषयी असला तरी अनेकदा त्यात अभ्यासपूर्ण लेख प्रकाशित होतात पुणे–मुंबईखेरीज इतरत्रही दर्जेदार नियतकालिके निघतात. त्याकडं सोयिस्कररित्या लक्ष दिलं जात नाही उदा पचधारा, हैदराबाद. अनुबंध, गुलबर्गा नवसाहित्याच्या मूल्यमापनार्थं जुने निकष उपयुक्त आहेत का ? नवसाहित्य समीक्षेची वेगळी चौकट अथवा निकष निर्माण झाले आहेत का ? साहित्य-समीक्षा वस्तुनिष्ठ असावी. त्याविषयी पूर्वग्रह नसावे. पण आपल्याकडं जुन्या साहित्याचं अधिक कौतुक होत विशिष्ट जुन्या नियतकालिकाचा 'दर्जेदार' म्हणून पुन्हा पुन्हा उल्लेख होत असतो. नव्याकड पूर्वग्रहदृष्टीनं तिरस्कारानं पाहिल जातं. वस्तुत अल्प प्रमाणात का होईना, आज तरुण वर्ग लेखनात गुणवत्तेचा विचार करतो, पूर्वग्रहदूषित टीका पचवतो सुधारण्याचा प्रयत्न करतो. पण जुने–जाणते समीक्षक खच्चीकरण करतात 'सत्यकथा' बद पडली. त्याविषयी विचारी रसिकास खंत वाटण स्वाभाविक आहे. अनेकानी त्याविषयी हळहळ व्यक्त केली पण ग्रेस सपादित गुणवत्तापूर्ण 'सदर्भ' अल्प काळात बद करावा लागला. त्याविषयी कुणी नक्राश्रुसुद्धा ढाळल्याचे वाचनात नाही. हे दुटप्पी वर्तन नव्हे का ? कपुशाही नव्हे का ? आज 'हस' मासिक नाही म्हटल तरी दर्जेदार वाटत. त्याचा उल्लेख कुठ येतो का ? तरुण सपादकाच कौतुक होत ? होत नसेल तर का ? गुणवत्तापूर्ण, दर्जेदार नवीन लेखनाकडं लक्ष दिलं जात नाही. वस्तुनिष्ठ मूल्यमापन होत नाही सर्वत्र 'अहो रूप, अहो ध्वनी.' असा प्रकार चालतो. वाङ्मयक्षेत्रात नवीनाना मार्गदर्शन हवंय. पूर्वग्रह नको झाले आहेत. धडपडीचं चीज व्हावं, ही अपेक्षा आहे. निरामय व निकोप प्रवृत्तीखेरीज हे शक्य नाही. समीक्षकाच्या काकदृष्टीकडे कुणी लक्ष देऊ नये. पण यथायोग्य, समर्पक, वस्तुनिष्ठ मूल्यमापनाची व प्रोत्साहनाची तरुणानी अपेक्षा करण गैर नाही.

१० जून

— **विश्वनाथ थोटे**

सोलापूर




## ☐ दुर्गाबाईंचा कदंब

माणसाचे आपल्या सभोतालच्या वातावरणाशी किती घट्ट अनुबध असतात. वर्तमानाच्या कालचक्रात रगडून निघत असतानाः देखील माणूस आपल्या चहूबाजच्या वातावरणाचे संस्कार टिपून घेत असतो हेच सस्कार आत खोलवर झिरपत जातात. माणसाचा एक महत्त्वाचा भाग टवटवीत ठेवतात.

कलावताच्या बाबतीत तर हा रॅपो खूप महत्त्वाचा ठरतो. बोरकरांच्या कवितेतली रूखावळ, माडगूळकराच्या कथेत, सतत ऐकू येणारी तांबड्या मातीची गूज, डिकन्सच्या कादबरीत जवळजवळ अटळ ठरलेलं गेल्या शतकातल इंग्लड, ही काही उदाहरण. लेखकाला–कलावताला आपल्या सभोतीचा कालक्रम सातत्याने मोहवत असतो.

हे सगळं विस्ताराने सागायचं कारण म्हणजे गेल्या शनिवारी अेशियाटिक वाचनालयात झालेल दुर्गा भागवताचं 'कदंब' वृक्षावरच भाषण 'अड्डा अेशियाटिक' तर्फे हे भाषण अेशियाटिकच्या दरबार हॉलमध्ये झालं.

दुर्गाबाईंना कदब वृक्ष उपनिषदात–वेदात, महाभारतात–रामायणात भेटला. पुढे या भेटी जशजशा वाढत गेल्या तो तो बाईंची कदबाविषयीची आस्था वाढत गेली. कदबाबद्दल दुर्गाबाईंच्या मनात खोल अनुभूती रुजली. मग ह्या वृक्षाचा मागोवा घेण्याचं, त्याची परपरामुळे हुडकून काढण्याच प्रचड काम बाईंनी हाती घेतल जवळजवळ चार दशके हे काम चालल

बाई कदबाविषयी इतक्या विलक्षण जिव्हाळ्याने अन् एकतानतेने बोलल्या की ते भाषण नव्हत. एका मनस्वी लेखिकेने प्रकृतीच्या खानदानी सस्कृतीला दिलेला मानाचा कुर्निसात होता.

'गुलाबावर आपल्याकडे इतकी गाणी लिहिली जातात. पण आपण गुलाब 'फील' करतोय का ? गुलाब आपल्या अनुभूतीला स्पर्शून जातोय का ? याच उत्तर नाही असंच आहे. म्हणूनच गुलाब 'फील' न झाल्याने 'तुझे गाल गुलाबासारखे' किंवा हृदयी गुलाब फुलला' सारखी भिकार कवनं रचली जातात वृक्ष, फुल, पान, झाडं या सगळ्याची अनुभूति घ्यायला हवी. आज

आपल्यात ही अनुभूती जवळ जवळ संपल्यासारखीच आहे निसर्ग अनुभवल्याशिवाय तो साहित्यात रसरशीतपणे व्यक्त होणार कसा?

दुर्गाबाईंचा हा सवाल अंतर्मुख करणारा आहे.

### ☐ मानापमान

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार शंकरराव चव्हाण गेल्या सोमवारी एन. सी. पी. ए. च्या टाटा सभागृहात 'मानापमान' नाटकातली गाणी ऐकायला आले होते. आमच्या मते हा दुग्धशर्करा योग होता.

'मानापमान' च्या अनेक पदाना गोविंदराव टेंब्यांनी कर्नाटक चाली लावल्या आहेत. तर अशी ही कर्नाटक चालीतली पदे ऐकायला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यावेत हा शुभकर योग आहे नाही तर काय ?

याच कार्यक्रमाला अरुण आठल्येही दिसले. तेव्हा आम्हाला अनायास याद आली ती त्याच्या 'कानडा विठ्ठलू' या कार्यक्रमाची. या आठल्येबुवाचा हा 'कानडा विठ्ठलू' कार्यक्रम मुख्यमंत्र्यांनी एकदा पाहावा

तसच, आठल्यानी यापुढचा भाग म्हणून 'कानडा रामकृष्णू' हा कार्यक्रम करावा नतर 'मऱ्हाटी शंकर' हा दुसरा कार्यक्रम करावा खूप गाजेल. राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून टी. व्ही वर दाखवल्यास अरुण आठल्ये खूष होतील या दोन्ही कार्यक्रमाच सूत्रसचालन 'नवशक्ती' कार पु. रा. बेहऱ्याकडे द्याव. म्हणजे पुढचा वाद मिटेल.

एवीतेवी, बेहरेसुद्धा साप्रत मोकळेच आहेत. अंतुले गेल्यापासून त्याना सारखे अस्वस्थचित्त वाटत असते. अरुण आठल्यांच्या कार्यक्रमाच ॲडिशनल काम मिळालं की तेवढच त्यानाही बरं वाटेल 'भाळी चद्र असे धरिला' हे पद मात्र खुद्द शंकररावानीच म्हणावं एकाद दुसरी तान भालचद्र ऊर्फ भाई सावताना घ्यायला हरकत नाही.

आठल्येबवा कराच एकदा हा कार्यक्रम. आम्ही पहिल्या रांगेच तिकिट काढू

### ☐ मराठी माणूस काय करेल ?

मराठी माणसाला नाटच–सगीताच अन् राजकारणाच जबरदस्त वेड आहे अस कुणी कुणी म्हणून आम्हा मर्दमराठी माणसाची साफ गोची करून टाकलीये. कारण आता आम्हा मराठी माणसाना वेगळच वेड लागलय. सगीत अन् राजकारणाचे सोन्याचे दिवस गेले बालगधर्व गेले अन् नाटचसगीताची रया गेली. आता नाटचसगीता प्रोग्राम एन् सी. पी. ए. मध्ये, त्या टाटा थेटरात होतात. कोण जाणार - वीस रुपयाचं तिकीट काढून ते पी. एल साहेबही सांगून ऐकत नाहीत. 'मानापमान' ची गाणी ऐकायला मराठी माणूस नॅशनल सेंटर फॉर द परफार्मिंग आर्टस्ला कसा येणार ? अरुण टिकेकर, गोविंद तळवलकर वगैरे जातात अस ऐकतोय. पण ही 'टाइम्स' मधली माणस कसली हो मराठी माणस ? हे सगळे लॉर्ड रिपनचे कुळानले. तेव्हा सांप्रत आम्हा मराठी माणसाचं संगीताच वेड जवळजवळ सपलय.

राहता राहिलं राजकारण तिथही मराठी माणसाचे सुगीचे दिवस सपले.

चव्हाणसाहेब गेले आणि सगळ सपलं. आता वर्षाविर्षाला मुख्यमंत्री बदलतात. दो का चार, दो का चार अशा भावात महाराष्ट्राच मुख्यमंत्रीपद मिळत की काय अशी शका येते. सगळेच राजकारणी जणू क.य लाटणा माल विकायला बसलेत असं साप्रत इये मराठीचिये नगरीत वातावरण आहे.

तेव्हा सध्या मराठी माणसाच्या मनात एक वेगळच वेड सचारलंय ते म्हणजे सीमाप्रश्नाच वेड. शेवटी. माणसाला कसल ना कसल वेड लागतच तेव्हा सीमाप्रश्नासारख दुसरं वेड नाही. अहो, याच वेडापायी तर मर्दमराठा आज जिवत आहे. हेही वेड सपल की मग जगायला / भाडायला (या दोन्ही क्रिया मराठी माणसासाठी परस्परपूरक आहेत) दुसरं उरणार काय ?

तेव्हा, महाराष्ट्रात सध्या तरी दुसरा 'इश्यू' नाही. सीमाप्रश्न ॲण्ड सीमाप्रश्न ओन्ली. अस पेटवून दिलय रान सगळ्यानी की विचारू नका दुसर तिसर कुणाला सुचत नाही. कुणी कुणाला सुचायला देतच नाही. 'ओन्ली विमल' या चालीवर 'ओन्ली सीमाप्रश्न' अस सध्या वातावरण चहूकडे आहे.

एरवी, कुणाला न जुमानणारे शंकररावसुद्धा कसे बरे बोल्याने बगळरला जाऊन आले. आता शरद पवार – अण्णा जोशीसुद्धा हेगडेंना भेटतील अस ऐकतोय. स्वत च्या पक्षातला मुख्यमंत्री असूनदेखील एसेमनी हेगडेना सूर्याची पिल्ले दाखवलीच ना? याला म्हणतात समाजवादी बाणा अण्णाना सीमप्रश्नाच केवढं वेड लागलय बघा.

आता एकच गोची आहे ती ही की शरद पवार, एसेम – हेगडे भेटीत हा सीमाप्रश्न कायमचा नको सुटू दे. हा प्रश्न जर सपूर्ण सुटला तर मराठी माणसाला मग कसल वेड उरणार नाही नाटचसगीत नको, राजकारणात अपेश, सीमाप्रश्न सलोख्याने सुटला. मग पुढे काय ? व्हॉट नेक्स्ट ? मराठी माणूस काय करेगा ? शेट्टीके होटेलमें डोसा खायेगा ?

—विष्णू जयदेव

## पुणे वार्ता

### ☐ कवितेचे दोन दिवस

सध्या वातावरण पावसाळी आहे. आकाशात रोजच ढगाची गर्दी दाटते आहे, अगदीच मुसळधार नसला तरी थोडा फार पाऊस पडतो आहे आणि पाऊस हा तसा कवितेचा विषय. पाऊस कवी लोकाना भलताच भावतो (आणि म्हणूनच पावसावर दोनचार आल्हाददायक–शीतल कविता लिहून कवी लोक भाव मारतात) तर अशा पावसाळी वातावरणात कवी मडळींना स्फूर्ती न आली तर नवल ! तस कवितेबद्दल अस्मादिकानी या आधी लिहिलच आहे. कवितेवर असं वारवार लिहाव लागतय म्हणजेच कवितेला काही भले दिवस आले आहेत अस म्हणावयास काही हरकत नाही तर अशा एकूणच 'भल्या' दिवसात कवितेचा एक 'भला' कार्यक्रम व्हावा ही खचितच आनदाची गोष्ट !

लायन्स क्लब ऑफ पिंपरी–चिंचवडच्या सहकार्याने पुण्यातील 'कविता' या सस्थेने कवितेच्या विविध पैलूवर प्रकाश टाकणारा एक परिणामकारक कार्यक्रम सादर केला. दि. ७ आणि ८ जून रोजी ! अनिल कावळे आणि त्याच्या उत्साही सहकार्यांनी मोठ्या परिश्रमाने आयोजित केलेले दोन दिवसाचे हे एक समेलन होते. मुलाखती, परिसंवाद, गायन, काव्यवाचन आणि पुस्तक प्रदर्शन याचा समावेश या समेलनात होता विंदा करदीकर, मगेश पाडगावकर, शाता शेळके, अनुराधा पोतदार, यशवत देव, हृदयनाथ मगेशकर याच्यासारख्या बड्या व्यक्तींबरोबरच नव्या, ताज्या दमाच्या विविध व्यक्तिमत्त्वाचा उत्साहवर्धक समावेश या समेलनात होता.

दोन दिवस चालणाऱ्या या समेलनाचे उद्घाटन केले विंदा करदीकरानी आपण विसवादी सूर समेलनाच्या उद्घाटनालाच लावतोय असे स्पष्ट सागून विंदानी एकूणच अशा स्वरूपाच्या सोहळ्याविषयी नापसती व्यक्त केली अशा स्वरूपाच्या कार्यक्रमामुळे कवीवर रसिक आणि समीक्षकाचे दडपण येते आणि त्यातून कवीचेच नुकसान होते असे मत त्यानी व्यक्त केले. कवी हा एकातात असतो तेव्हा तो समाजापासून तुटलेला नसतो तर स्वत त बुडलेला असतो असे विंदा म्हणतात. विंदाचा हा मुद्दा समेलनाच्या पुढच्या सत्रामध्ये विस्तार पावला.

'कविता फुलली अशी' या कार्यक्रमात कवींच्या प्रकट मुलाखती होत्या. आपल्या निर्मितीच्या क्षणाविषयी कवी बोलले. निर्मितीची प्रक्रिया ही मोठी गुंतागुंतीची असते. प्रत्यक्ष निर्मात्यालादेखील ती उलगडणे कठीण. ही कठीणता प्रत्येक वक्त्याच्या वक्तव्यात आढळली. रसिकाला खर तर कविता हवी असते. तिचा परिणामकारक आनंद हवा असतो निर्मिती प्रक्रियेच्या जिज्ञासेत कवी आणि रसिक दोघांनीही गुंतू नये हेच खरे !

पहिला दिवस गाजवला तो हृदयनाथ मंगेशकर आणि यशवंत देवांनी. 'कविता-गीत आणि संगीत' हा तसा पसरट झालेला चर्चेचा कार्यक्रम या दोघांनी सुरमय केला. 'पाऊस केव्हाचा येतो' या गाण्याने तर मंगेशकरांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले हार्मोनियमवर सफाईने फिरणारी बोटे आणि उमटणारे सूर याचा मजेदार अनुभव तृप्त करणारा होता. मराठी भावगीतांच्या रेकॉर्डस्चे हिशेबी अर्थशास्त्र अडचणीचे आहे. मराठी भावगीतांच्या कॅसेटस् काढण्यास फारसे कोणी उत्सुक नसतात याबद्दल मंगेशकरांनी तीव्र खंत व्यक्त केली

'कवितेची दिशा आणि दुर्दशा' हा खऱ्या अर्थाने रंगलेला परिसंवाद. कवितेच्या दुर्दशेविषयी बोलताना प्रा. राजा दीक्षितांनी कवींवर परखड आरोप केले. नवे कवी स्वत्व सोडून संयोजक, संपादक, गीतकार यांची हुजरेगिरी करतात, संमेलनातून श्रोत्यांचा अनुनय ते करतात, त्यांची अभिरूची घडवण्याचा प्रयत्न ते करत नाहीत, काव्याच्या प्रांतात गुरूबाजी–चेलेगिरी यांचे संप्रदाय उघडले गेले आहेत, अशा स्वरूपाची खंत त्यांनी व्यक्त केली. ह मो मराठेंनी साहित्य संस्कृती मंडळाच्या कार्यावर दृष्टिक्षेप टाकला. गेल्या काही वर्षात मंडळामुळे अनेक नव्या कवींना त्यांचे संग्रह काढता आले. मंडळाचा बराच पैसा खर्च झाला परंतु योग्य नियोजन, व्यवस्था आणि निवडीच्या अभावामुळे मंडळाला कवितेची आजची अवस्था सुधारता आली नाही प्रत्येक पिढीच्या कवीला किंवा कविसमूहाला एक चेहरा किंवा व्यक्तित्व असते. तसे व्यक्तित्व आजच्या पिढीच्या कोणत्याही कवीला मिळालेले नाही असे सांगून 'सध्याच्या युगाला ठळक दिशा देणारा नवा सूर्य अद्याप उगवला नाही' असे ते म्हणतात. महाराष्ट्रात कानाकोपऱ्यात अनेक चांगले कवी आहेत. मात्र त्यांची माहिती किंवा शोध घेण्याचा प्रयत्न आजचे संपादक करत नाहीत अशी टीका मराठे करतात

दोन दिवसाच्या या कार्यक्रमात दोन कवी संमेलने झाली. यात जुन्याबरोबरच नव्या दमाच्या कवींचाही आवर्जून उल्लेख करायला हवा. किशोर पाठक, नारायण सुमंत, प्रमोद कोपर्डे, हेमंत जोगळेकर, सुधाकर नेर्लेकर, रमण रणदिवे, संगीता जोशी यांच्या कविता ताकदवान आणि नव्या अनुभूतीच्या वाटल्या 'भावधारा' या संगीताच्या कार्यक्रमात नव्या दमाच्या गायकांची झलक ऐकावयास मिळाली.

या संमेलनाला जोडूनच पुस्तक प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते केवळ कविता संग्रहांचेच असलेल्या या प्रदर्शनाला रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पुस्तक प्रदर्शनाची जबाबदारी 'पहाट' पुणे या संस्थेने सांभाळली होती.

दोन्ही दिवशी उपस्थितांची संख्या चांगली या सदरात गणण्यासारखी होती कवी संमेलनांना श्रोते मिळणं आणि त्यांची दाद लाभणं हे कवितेच्या संदर्भात निश्चितच स्वागतार्ह वळण आहे. पण अखेर विदांनी नमनालाच विचारलेला प्रश्न महत्त्वाचा ठरतो. अशा स्वरूपाचे सोहोळे काय साधतात ? पुण्याबाहेरील कवींच्या मते पुण्यासारख्या ठिकाणी मिळालेल्या या व्यासपीठाचा चांगला उपयोग होतो वगैरे संमेलनाचे फायदे जसे निश्चित तसे तोटेदेखील निश्चितच. तोट्यापेक्षा धोकेच अधिक· 'टाळीबाज' कविता आणि कवींची कविसंमेलनातून गर्दी होऊ लागलेली आहे हे अतिशय स्पष्ट आहे. राजा दीक्षितांच्या म्हणण्याप्रमाणे ही कविता निश्चितच श्रोत्यांचा अनुनय करणारी आहे. मोठमोठे कवी देखील 'व्यासपीठी कविता' आवर्जुन लिहितात कवितेला असे 'द्वैत' असू शकते का हा प्रश्नच आहे !

या संमेलनाने कवी आणि कविता रसिकांसमोर आली आणि हे संयोजकांचे यश आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेने याचा जरूर विचार करावा म. सा. प. ने भरविलेल्या विभागीय साहित्य संमेलनाला जो शोचनीय प्रतिसाद मिळाला त्या पार्श्वभूमीवर कवितेची ही कामगिरी मोठी आहे परिषदेच्या कार्यक्रमाला तिकीट होते आणि हा कार्यक्रम 'विनामूल्य' होता असे परिमाण कोणी कदाचित लावेलही. पण ते पूर्ण सत्य नाही. बदलत्या चित्राची दखल परिषदेसारख्या संस्थांनी घेण्याची वेळ आता आली आहे. अनिल कांबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे कार्य 'नेटाने' पार पाडले आहे.

### □ आगळी मैफल

गेले काही दिवस बालगंधर्वचे कलादालन गजबजलेले होते. कुमार गंधर्व, पं. भीमसेन जोशी, उस्ताद विलायत खाँ, मोगुबाई कुर्डीकर, किशोरी अमोणकर... बाप रे यादी लांबतच चालली आहे. तर भारतीय अभिजात संगीतातील अनेक नामवंत मोहोरे आपल्या दिलखुलास भावभावनांसह आणि खास लकबींसह इथे मौजूद होते. हां... प्रत्यक्ष नाही तर छायाचित्राच्या रूपाने !

या साऱ्यांना हजर केले होते सतीश पाकणीकरांनी आपल्या कॅमेऱ्याद्वारे. मैफल कोठेही असो मुंबई, पुणे, मिरज, पाकणीकर आपल्या कॅमेऱ्यासह हजर. मैफलीत जाऊन कलाकाराचा 'मूड' पकडायचा, त्यांच्या खास लकबी साधायच्या यासाठी मुळातच या संगीताची आवड हवी. ती पाकणीकरांकडे आधीचीच वसलेली. प्रत्येक कलाकाराला जवळून पहायचे, त्यांची आठवण जपायची या ध्यासातून त्यांनी हे फोटो घेतले आणि त्यातूनच हे प्रदर्शन साकार केले.

फोटोग्राफीच्या आस्वादाचे बाकी अनेक निकष आहेत. स्पीड मोशन, लाईट, मूडस् वगैरे. परंतु या साऱ्यात पाकणीकरांना फक्त कलाकाराचा 'मूडच' अधिक अभिप्रेत. म्हणून 'मूड'कडे पहा हा त्यांचा आग्रह. बाकीच्या तांत्रिक चुका (असल्या तर) क्षमस्व ! आवाज लावण्यापूर्वी वाद्ये जुळवण्यापूर्वीचे कलाकार आणि नंतर भर मैफीलीत रंगात आलेले कलाकार दोन्ही टिपलेत पाकणीकरांच्या क्लिकने. पं. भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, किशोरी आमोणकर, उस्ताद अमीनुद्दीन डागर, तबला नवाझ झाकीर हुसेन यांच्या अनेक मनमोहक मुद्रा त्यांनी खेचल्या आहेत.

ही सारी छायाचित्रे आपल्याला एका वेगळ्या भावावस्थेत नेऊन सोडतात. 'पुणेरी श्रोत्यांची दाद' घेण्यास हे अभिजात कलाकार कायमच उत्सुक असतात. अशा 'भारलेल्या' पुणेरी मैफलीच्या दृश्यासह या प्रदर्शनाची सुरुवात होते आणि पुढे स्वर आणि सुरांचा अभेद्य मेळ जुळवणारी वाद्ये आणि वादक छायाचित्रकाराच्या तितक्याच सुंदर कलेशी मेळ करीत अनुपम आणि अनवट चिजा ऐकवताना दिसतात. प्रत्येक छायाचित्र आपल्याला नकळत सुरांच्या दुनियेत नेऊन सोडते. दृक्–श्राव्य असा दोन्ही अनुभव एकाच वेळी मिळतो.

—मनोहर सोनवणे

सांस्कृतिक डोंबिवली

# नाथ पै स्मृती संस्था

भारतीय राजकारणातील ज्या थोड्याफार व्यक्ती अकाली निधन पावल्यामुळे सान्यानाच हळहळ वाटली, त्यात कै. लालबहादूर शास्त्री, पं. दीनदयाळ उपाध्याय, बॅ. नाथ पै इ. चा समावेश करण्यास हरकत नाही. नाथ पै ससदेला, लोकशाही समाजवादाला मानणारे होते. आणीबाणीच्या वेळी, मुस्लिम महिला घटस्फोट विधेयकाच्या वेळी ते जर असते तर त्याना काय वाटले असते? संसदेला पवित्र सस्था मानणाऱ्या नाथ पैंना ह्याप्रसगी ससदेची झालेली विटंबना सहन झाली असती का ? धदेवाईक राजकारण्याकडून महाराष्ट्र–कर्नाटक सीमा प्रश्नावर नाथ पैंसारख्या ध्येयवादी राजकारण्याची झालेली फसगत आज कोणते रूप धारण करून बसली आहे, ते आपण पाहतोच आहोत. पै हयात असताना त्यानी ज्या तडफेने काम केले, त्याचा ठसा त्या वेळेस अनेकाच्या अत करणावर उमटला. त्याच्या मृत्यूनतर महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्याच्या नावाच्या विविध प्रकारची कामे करणाऱ्या सस्था निर्माण झाल्या. तशीच एक सस्था, 'नाथ पै स्मृती सस्था' ५ जून १९७९ पासून डोंबिवलीत सुरू झाली. डोंबिवलीत राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणारे आणि ह्या नाथ पै स्मृती सस्थेचे एक संस्थापक–सदस्य श्री. दत्ता रा. नेरूरकर ह्याना भेटलो. काही वर्षांपूर्वी 'सध्याकाळ' ह्या 'नवाकाळ'च्या सायंभावंडाने 'सर्वोदयी दत्ताजी' असा एक अग्रलेखही त्यांच्यावर लिहिला होता. वर त्याना राजकीय कार्यकर्ते असे म्हटले आहे; पण ते आजच्या राजकारणाला विटले आहेत. अशा ह्या निरलस, सेवाभावी कार्यकर्त्याकडून त्याच्या कार्याची माहिती करून घेतली.

'५ जून १९८० रोजी म्हणजे संस्थेची स्थापना झाल्यानंतर एका वर्षातच आम्ही आमची संस्था पजीकृत करून घेतली. सुरुवातीला तेवीस संस्थापक सदस्य होते. आमच्या घटनेनुसार पन्नास सदस्य असणे आवश्यक होते तसे ते झाले.' मी संस्थेबद्दल तपशीलवार सांगा असे म्हटल्यानतर ते सागते झाले ते पुढे म्हणाले, 'आम्ही शैक्षणिक क्षेत्रात लक्ष घालावयाचे ठरविले असल्यामुळे ह्या सभासदापैकी बावीस टक्के सभासद महिला वर्गातील आहेत.' 'तुम्ही नेमके काय करता व करू इच्छिता ते विस्ताराने सांगा' असे म्हटल्यानतर ते सागू लागले, 'रघुवीरनगर, गोखलेवाडी आणि मानपाड रस्ता ह्या तीन ठिकाणी आमच्या मराठी माध्यमाच्या दोन व इंग्रजी माध्यमाची एक अशा तीन बालवाड्या आहेत त्यात सुमारे ६५ विद्यार्थी–१५ इंग्रजी माध्यमाचे धरून–शिकत आहेत. त्याचप्रमाणे डोंबिवलीतील ज्या शाळा प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्त्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतात त्या शाळातील विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकासाठी मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करतो. आतापर्यंत हे वर्ग नोव्हेंबरमध्ये घेत होतो. ह्या वर्षीपासून ते ऑगस्टमध्ये घेण्याचा विचार आहे आम्हाला श्री. वा. ना. दाडेकर, निवृत्त शिक्षण सचालक, गोवा, दमण, दीव ह्याच्यासारखे तज्ज्ञ मार्गदर्शक लाभले. आम्ही एक वाचनालय सुरू करण्यासाठी अनेक महत्त्वाचे ग्रंथ गोळा केले; पण सोयीस्कर मध्यवर्ती जागा न मिळाल्यामुळे ते ग्रथ साने गुरुजी सेवा मडळाला (पाडुरंग विद्यालय व रा. वि. नेरूरकर विद्यालय चालविणारी सस्था) दिले. ह्या वर्षी श्री विजयकुमार साष्टे ह्या सगणक तज्ज्ञाच्या सहकार्याने एक संगणक अभ्यासवर्ग दि. ६ एप्रिलपासून सुरू केला. दोन महिने आणि चोवीस सत्राचा हा अभ्यासवर्ग (Basic Computer Course) आहे. त्याची फी रु. २००/– ठेवली. त्या अभ्यासवर्गाला सोळा मुली व दहा मुलगे असे सव्वीसजण मिळाले. दर वर्षी दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीत वेगवेगळ्या तात्रिक, जीवनोपयोगी विषयाचे अभ्यासवर्ग सुरू करणार आहोत. ह्या दिवाळीच्या सुट्टीत तीन आठवड्याचा पत्रकारितेचा अभ्यासवर्ग घेऊ. त्यासाठी कल्याणचे ज्येष्ठ पत्रकार श्री. विनायक बेटावदकर ह्याचे सहकार्य मिळणार आहे. पुढील उन्हाळ्याच्या सुट्टीत घड्याळ दुरुस्ती, नळाचे काम (प्लंबिंग), सुतारकाम इ. पैकी आपल्या पायावर उभे करणारे, जीवनावश्यक अभ्यासवर्ग घेण्याचा विचार आहे.' 'त्याशिवाय तुमचे आगामी, सकल्पित काम कोणते असणार?' असे विचारल्यानतर ते सागू लागले–

## आजचं चित्र आणि पुढे

'आमच्या ह्या सस्थेचा दुहेरी हेतू आहे. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सुट्टीचा काळ निरर्थक जाऊ नये ती मुले गुतून रहावीत, त्याचप्रमाणे जाणत्या मुलाना आजच्या आणि पुढील आयुष्यात उपयोगी पडेल असे शिक्षण मिळावे. त्यादृष्टीने डोंबिवलीतील चारपाच निरनिराळ्या विभागातील विहिरी स्वच्छ करून घेऊन तेथे सुट्टीत पोहायला शिकण्याची सोय करणार आहोत. त्याचप्रमाणे सुट्टीत शारीरिक शिक्षणाची शिबिरे आयोजित करण्याचा विचार आहे. व्याजरूपाने हजार बाराशे रुपये दरवर्षी हातात येतील इतका निधी जमा करून लोकशिक्षण देणारी, सामाजिक महत्त्वाच्या विषयावरची एक व्याख्यानमाला (पाच व्याख्यानाची) सुरू करणार आहोत. त्यासाठी निधी जमा करण्यास सुरुवातही झाली आहे. येत्या पाच वर्षांत डोंबिवलीच्या विविध भागातून पधरा वीस बालवाड्या सुरू करण्याचा विचार आहे. त्या सुरू करण्यासाठी जागा मिळणे ही एक फार मोठी अडचणीची बाब आहे. ह्या बालवाड्याचे नियंत्रण करण्यासाठी एक मध्यवर्ती केन्द्र कार्यालय हवे. त्यासाठीही जागा व त्यावरील छोटीशी वास्तू इ. साठी निधी हवा आहे.'

'प्रत्येक कामाला पैसा हवाच. तुम्ही सुरुवात कशी केलीत. ह्या बालवाड्याचा अनुभव काय?' असे विचारल्यानतर ते सागू लागले. 'मला लहान मुलाच्या शिक्षणात रस आहे. मी माझ्या घरी एक बालवाडी चालवीत होतो 'ना नफा ना तोटा' ह्या धर्तीवर. ही सस्था सुरू झाल्यानंतर जमलेली खेळणी व इतर साहित्य ह्या सस्थेच्या बालवाडीला मी दिले ह्या तिनही ठिकाणी भरणाऱ्या बालवाड्या आमच्या कार्यकर्त्यांच्या जागेत, त्याच्याकडूनच चालविल्या जातात. आमच्या ह्या शिक्षिका एकतर कार्यकर्त्या तरी आहेत किंवा अशा कामाची आवड असणाऱ्या आहेत. आम्ही ह्या शिक्षिकांना

फारसा पगार देत नाही. आम्ही देतो त्याला त्या मानधन समजतात. त्याच्या सेवाज्येष्ठ-प्रमाणे दरमहा रु. १५०।– ते रु. २५०।– मानधन देतो. जागाना भाडे नाही. आणि अल्प मानधनावर काम करणाऱ्या कार्यकर्त्या लाभल्या म्हणून अल्प फी घेऊनही दरवर्षी आम्ही बचत करू शकतो. आमचे एक कार्यकर्ते श्री. दुनगुणे व त्याची सौभाग्यवती हे कानडी मातृभाषा असणारे आहेत. त्यांच्याकडे एक बालवाडी चालते. सौ. दुनगुणे ह्या बालवाडीतून मराठी माध्यमातून शिकवितात. त्यांनी त्यासाठी बालवाडी शिक्षकाचा अभ्यासक्रम पुरा केला आमच्या ह्या बालवाडीत कामगारांची मुले आहेत तशीच मध्यमवर्गातील पांढरपेशी मुले आहेत. बंद पडलेल्या कारखान्यातील कामगाराच्या मुलाकडून आम्ही इतर फी घेत नाही. फक्त दोन रुपये इमारत निधी घेतो. अशी काही मुले आमच्या बालवाड्यातून शिक्षण घेत आहेत. आमच्या बालवाडीतून बाहेर पडलेली मुले इयत्ता पहिलीसाठी जेव्हा इतर शाळातून प्रवेश घेतात तेव्हा ती मुले अभ्यासात, वर्तणुकीत आपला ठसा उमटवितात. ती तिथे रुळतात, चमकतात असा अनुभव आहे. हल्लीच्या क्रमिक पुस्तकातून 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत....त्याचे कल्याण आणि त्याची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे' अशी प्रार्थना सुरुवातीच्या पानावर असते. आमची अशी इच्छा आहे आणि प्रयत्नही असे आहेत की ही प्रार्थना फक्त शब्दापुरती (लेटर्स) मर्यादित न राहता, केवळ पोपटपंची न करता त्या प्रार्थनेचे मर्म, सार, खरा हेतू (स्पिरीट) प्रत्यक्षात आला पाहिजे. आमच्या साऱ्या कार्यामागे तीच व्यापक प्रेरणा आहे. आमच्यापुढे तोच हेतू आहे. ही संस्था स्थापन करण्यात सर्वश्री वसंत नाचणे, (ठाणे), रा. रा ऊर्फ बाबा पाटील (कल्याण) इ. नी पुढाकार घेतला. त्यावेळी झालेल्या चर्चेत हीच व्यापक भूमिका आमच्यापुढे होती व आजही आहे'

आपल्या मंडळाचे आजचे पदाधिकारी कोण कोण आहेत.' त्यावर ते म्हणाले 'श्री. वसंत नाचणे–अध्यक्ष, श्री मधुकर पै–उपाध्यक्ष, सौ. अनुराधा मोहितेकर–चिटणीस, श्री. प्रभाकर काबळे-संयुक्त चिटणीस, श्री. सूर्यकांत वैद्य–खजिनदार व इतर नऊ सदस्य आहेत नाथ पै हे राजकीय नेते म्हणून ओळखले जात असले आणि ही संस्था त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू केली असली तरी आमचा राजकारणाशी, राजकीय पक्षाशी संबंध नाही. तो विषयच आम्हाला वर्ज्य आहे. आम्ही आमच्यासमोर जे ध्येय ठेविले आहे, जी कामे करावयाची आहेत ती माफक, मर्यादित आहेत. पैसा आणि त्याहीपेक्षा जमीन, वास्तु मिळविणे ही बाब डोंबिवलीत खूप खर्चाची झाली आहे. त्यामुळे पुढे काय होईल हे सांगता येणे–आजतरी–शक्य नाही. धीमेपणाने आमची वाटचाल सुरू झाली आहे हे मात्र नक्की.' समारोपादाखल श्री. दत्ता नेरुरकरानी ह्या शब्दात आपला निर्धार व्यक्त केला.

सर्वमान्य होणाऱ्या, गरजेच्या कामांना सुरुवात झाली की कार्यकर्ते मिळू लागतात; पैसा गोळा होऊ लागतो. त्यापेक्षा सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्याला प्रत्येक कामातून–आपली जागा वापरायला देणे, आपला फुरसतीचा वेळ देणे–पैसा मिळालाच पाहिजे असे न मानणारे पुढे येतात. सर्वदा पैशाचाच विचार न करणारे भेटतात आणि त्यातून अशी लहान लहान कामे उभी रहातात त्यातूनच नतर त्या कामाना विशाल आणि व्यापक रूप येते. अशा कामांतून स्फूर्ती घेऊन इतरत्र प्रयत्न करण्याची इच्छा निर्माण होते. अशा ह्या ठिपक्यातूनच समाजचित्र प्रकटते. त्या त्या समाजाची, शहराची प्रकृती कळते. अशी कामे भोवतालचे बिघडत जाणारे, गुदमरवून टाकणारे वातावरण थोडेसे का होईना सुसह्य बनविण्यास मदत करतात. मारणारे, घाण करणारे, वातावरण गढूळ करणारे वाढत आहेत. आपण नेमके काय करणार? तटस्थ पहात रहाणार की अशा कामाना हातभार लावणार?

– चंद्रशेखर राजे

अमेरिकेतून...

# अमेरिका जोडो

जगातल्या इतर देशाच्या मानाने अमेरिकेत गरिबी आणि गृहहीनता खूपच कमी असली, तरी अशा समृद्ध देशात ती थोड्या प्रमाणात सुद्धा असावी हे लज्जास्पद आहे, असे सामाजिक दृष्ट्या जागरुक असलेल्या अमेरिकनाना वाटते. काही खाजगी संस्था आणि अभ्यासक ( उदा. हार्वर्ड विद्यापीठाचे डॉक्टर ) याच्या आढाव्यानुसार १९८० पासून ८५ पर्यंत अमेरिकेतल्या गरिबांची संख्या २ कोटी ८० लाखावरून ३ कोटी ४० लाखापर्यंत वाढली आहे ( गरिबीची ढोबळ व्याख्या चार माणसांच्या कुटुंबाला लागणाऱ्या मूलभूत पौष्टिक अन्नाची किंमत गुणिले तीन याच्यापेक्षा कमी उत्पन्न) या विषयाबद्दल इथल्या मासिकातून आणि वर्तमानपत्रातून वेळोवेळी लिहिले जाते मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकात हे प्रश्न सोडवण्याकरता पुरेशी तरतूद नाही–त्यामुळे राज्यसरकारे, खाजगी संस्था आणि विविध क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती याच्यातर्फे प्रयत्न चालू आहेत. यातलाच एक, नेत्रदीपक, गरीब आणि गृहहीन यांच्या मदतीसाठी सुमारे ६ लाख अमेरिकनाना देशाच्या पश्चिम किनाऱ्यापासून पूर्व किनाऱ्यापर्यंत एकाच वेळी हातात हात धरून उभे रहाण्याकरता एकत्र आणणारा, 'अमेरिका जोडो' ( Hands Across America ) असा कार्यक्रम २५ मे ला दुपारी ३ ते ३। या वेळात पार पडला. अशा प्रकारचा लाखो नागरिकाना एकाच वेळी देशभर संघटित करण्याचा कार्यक्रम या गणकयंत्रयुगातच आणि electronic दळणवळणाच्या युगातच शक्य आहे. या वार्तापत्रात अमेरिकेतील गृहहीनाचा प्रश्न आणि त्याच्याकरता केलेल्या 'अमेरिका हातसे जोडो' या कार्यक्रमाबद्दल लिहित आहोत.

मध्यंतरी इथे 'गृहहीनता–प्रश्न आणि त्याचे निरसन' या विषयावर एक परिषद झाली. नागरिक मानसिक कारणामुळे, का

आर्थिक कारणामुळे गृहहीन बनतात, या प्रश्नाचे उत्तर असे की, दोन्हीमुळे अमेरिकेत मानसिक रुग्णांना मानसिक रुग्णालयातून किंवा संस्थातून ( mental institutions ) ठेवण्यात येत असे. हल्ली अशा रुग्णावर शक्यतो घरी ठेऊनच उपचार करायची पद्धत आहे. आणि ज्याना अशा रुग्णालयातून ठेवायला हवे अशा काही रुग्णाना या संस्थाच्या आर्थिक तगीमुळे जागा मिळत नाही. असे रुग्ण कुठेच एके ठिकाणी स्थिर राहू शकत नाहीत आणि त्यामुळे गृहहीन बनतात. पण या शिवाय इतर कारणे पण आता स्पष्ट होऊ लागली आहेत– उदा. दारू आणि–किंवा इतर अमली पदार्थांचे व्यसन, समाजातल्या काही घरातील ढासळणारी कुटुंबव्यवस्था आणि मुलींना अल्पवयात येणारे मातृत्व आणि सरकारकडून होणाऱ्या मदतीत घट काही टीकाकाराच्या मते गृहहीन लोकामध्ये मानसिक रोगाचे प्रमाण जास्त नाही. ते आहे असे म्हणणे म्हणजे गृहहीनावर आणखी एक ठपका ठेवण्यासारखे आहे. गृहहीनांमधल्या दारूच्या व्यसनाचे आणि मानसिक रोगाचे स्तोम माजवल्यामुळे या प्रश्नाचा जो मूलभूत गाभा, म्हणजे आर्थिक असमता, आणि त्याकरता मोजावे लागणारे परिणामकारक आर्थिक उपाय, याकडे दुर्लक्ष होते पण या टीकेला उत्तर म्हणून असे म्हटले जाते की, नुसती आर्थिक मदत, स्वस्त भाड्याची घरे उपलब्ध करून देणे या आर्थिक उपायाखेरीज या लोकाची सर्वांगीण आरोग्य आणि सामाजिक व्यवस्था करायला हवी–कारण गृहहीनता ही नुसती आर्थिक समस्या नसून त्यात अनेक गुतागुतीचे सामाजिक, सास्कृतिक, मानसिक आणि शैक्षणिक प्रश्न अतर्भूत आहेत. उदा. मानसिक रोग असलेले गृहहीन संपूर्ण स्वावलंबी होऊ शकत नाहीत.

## गृहहीनांची वाढती संख्या

गेल्या २५ वर्षात अमेरिकेतील गृहहीनता या विषयावर इतर कोणत्याही सामाजिक प्रश्नापेक्षा जास्त सशोधन झाले आहे. गृहनिर्माण आणि नागरी व्यवस्था या येथील मध्यवर्ती सरकारच्या खात्यानुसार अमेरिकेत २।। ते ३ लाख नागरिक गृहहीन आहेत. पण इथल्या राष्ट्रीय मानसिक आरोग्य सस्थेच्या आकडेवारीनुसार ही सख्या सुमारे २० ते ३० लाख आहे काही मानसशास्त्रज्ञाच्या मते एखादा नागरिक एक दिवस जरी गृहहीन झाला तरी या आकडेवारीत गणला जायला हवा. गृहहीनतेच्या व्याख्येबद्दल मतभेद आहेत उदा. जो पुढ्याच्या घरात रहातो किंवा पुलाच्या कमानीखाली रहातो त्याला गृहहीन मानायचे का ? काही लोक अधूनमधून गृहहीन बनतात तर काही कायम देशातल्या वेगवेगळ्या भागात स्थलातर करतात. पण बऱ्याच तज्ज्ञाच्या मते गृहहीनतेची कोणतीही व्याख्या वापरली तरी अमेरिकेत गृहहीनांची सख्या वेगाने वाढत आहे, गृहहीनाचे वर्गीकरण करण्याचे पण वेगवेगळे प्रकार आहेत–मानसिक रोग असलेले गृहहीन, अधूनमधून बनणारे गृहहीन, विशिष्ट प्रसगामुळे अथवा आपत्तीमुळे झालेले गृहहीन, बदलती आर्थिक परिस्थिती आणि सरकारी धोरण यामुळे झालेले नवगृहहीन इ इ जे लोक उंबरठ्याबाहेर एक पाऊल ठेऊन उभे आहेत याची पण काही तज्ज्ञ गृहहीनातच गणना करता अमेरिकेत सद्यपरिस्थितीत १० टक्के कुटुंबांची प्रमुख आई आहे. यातल्या गृहहीन माता आणि त्यांची मुले याच्या सबधीच्या काही समस्या एका नव्या आढाव्यानुसार प्रकाशात आल्या आहेत अशा माता मानसिक दृष्ट्या अस्थिर असतात त्याचे बालपणातले आयुष्य भगलेले असते. त्याच्या नवऱ्याकडून त्याना वाईट वागणूक मिळालेली असते, मारहाण पण झालेली असते. त्याच्या लहान मुलाची शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक वाढ खुटलेली असते आणि या मुलाच्या वाट्याला बरेच वेळा आईने केलेली मारहाण, दुर्लक्ष आणि छळ झालेले असतात–ही मुले त्यामुळे विषण्ण आणि चितातूर असतात.

गृहहीनता हा या दशकातला सर्वात गभीर सामाजिक आजार आहे असे मत राष्ट्रीय मानसिक आरोग्य संस्थेच्या मुख्य अधिकाऱ्यानी व्यक्त केले आहे स्वस्त घराचे प्रमाण आणि सरकारी मदत यात झालेल्या घटीमुळे हा प्रश्न जास्तच गभीर होत आहे. (उदा. एकट्या न्यूयॉर्क शहरात स्वस्त घराची सख्या ७ लाखानी कमी झाली आहे). मध्यवर्ती सरकारच्या मते गृहहीनतेची समस्या मुख्यतः स्थानिक पातळीवर सोडवायला हवी आणि मध्यवर्ती सरकारच्या नवीन धोरणामुळे जोरदार आर्थिक प्रगती झाली की हा प्रश्न सोडवायला अप्रत्यक्षपणे मदत होईल–कारण कुठल्याही प्रकारच्या प्रत्यक्ष सरकारी मदतीपेक्षा सर्वांगीण आर्थिक प्रगती हीच हा प्रश्न सोडवण्याची गुरुकिल्ली आहे. इथली काही सपन्न राज्यसरकारे आणि नगरपालिका हा प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण काही तज्ज्ञाच्या मते मध्यवर्ती सरकारच्या मदतीशिवाय हा प्रश्न सोडवणे शक्य होणार नाही हे प्रश्न सोडवण्याकरता खाजगी सस्था आणि प्रतिष्ठाने यानी पण योजना आखल्या आहेत. (उदा. जॉनसन अँण्ड जॉनसन या कपनीच्या सचालकाचे रॉबर्ट वुड जॉनसन प्रतिष्ठान आणि आणखी एक प्रतिष्ठान यानी मिळून १८ नगरपालिकांना गृहहीनाच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्य योजनेकरिता ४½ कोटी डॉलर्स दिले आहेत आणि कमी व्याजाची कर्जे देण्याकरता ८० लाख डॉलर्स राखून ठेवले आहे ). याशिवाय तात्पुरती नोकरी पुरवणे, घरे पुरवणे, तात्रिक कसब शिकवणे इ. योजना पण राबवल्या जात आहेत. शिवाय गृहहीनाना चर्च, स्वस्त हॉटेले या ठिकाणी पण निवारा दिला जातो. अशा प्रकारच्या खाजगी क्षेत्रातल्या प्रयत्याचे एक ठळक उदाहरण म्हणजे अमेरिका हातसे जोडो हा इतिहास निर्माण करणारा २५मेचा उपक्रम

## मुले, तरुण, राष्ट्राध्यक्षही

या लेखाचे शीर्षक या उपक्रमावरुनच दिले आहे. २५ मेला अमेरिकन समाजाच्या सर्व थरातील लोक एकमेकाच्या हातात हात घेऊन एकाच वेळी पधरा मिनिटे (३ ते ३। वाजेपर्यंत) लॉस ॲंजलिसपासून न्यूयॉर्कपर्यंत उभे होते. ही मानवी हाताची माळ मोठ्या शहरातून, ५०० छोट्या गावातून, १० नद्यावरून, २ वाळवंटातून आणि एका पर्वतराशीवरून वळणे घेत घेत ४१५२ मलाच्या मार्गावर गुफली गेली १ मैलाचा मार्ग जोडायला २६४० मानवी हात या हिशोबाने ५४८०६४१ नागरिकाची आवश्यकता होती ( खरे म्हणजे या सख्येचा शेवटचा आकडा शून्याचा येत होता–पण कुणी तरी सुचवले की शेवटचा आकडा

१ ठेवावा म्हणजे जो जो नागरिक हा आकडा पाहील त्या प्रत्येकाला जणू असे वाटेल की मी आणखी एक स्वयंसेवक म्हणून यात सामील झालो तर ही मानवी हातांची माळ पूर्ण होईल) प्रत्यक्षतः सुमारे ६ लाख अमेरिकन यात सहभागी झाले मुले. तरुण, गरीब, गृहहीन, पैसेवाले, वयस्कर, डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन या दोन महत्त्वाच्या काही अंशी परस्पर विरोधी पण तुल्यबळ पक्षाचे सभासद, राष्ट्राध्यक्ष रेगन, त्यांच्या पत्नी, मुलगी या सर्वांनी भाग घेतला. एवढेच नव्हे तर काही ठिकाणी चाकाच्या खुर्चीतले पगुन्व आलेले नागरिक आणि एके ठिकाणी तुरुगातले ५०३ कैदी (तुरुगाच्या आवारातच उभे राहून) यात सामील झाले. अॅरिझोना आणि टेक्सस या राज्यातल्या वाळवटाच्या काही भागातून मात्र अति उष्णतेमुळे काही जागा रिकाम्या ठेवाव्या लागल्या काही जागा भरण्याकरता एका मोठ्या सर्कशीने हत्ती देऊ केले होते तर काही ठिकाणी कागदाच्या किंवा कापडाच्या फिती वापरण्यात आल्या. अमेरिकन एक्सप्रेस या कपनीने काही कठीण दूरच्या ठिकाणी जाण्याकरता विमानाची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. अमेरिकेतील नामवत कलाकारांनी आणि उद्योजकांनी या कार्यक्रमाकरता आर्थिक आणि इतर मदत केली. कोकाकोला कपनीने मोठे अनुदान दिले. शिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे या मानवी हाताच्या साखळीत भाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने १० ते ३५ डॉलर्सचे दान दिले या नागरिकांकडून सुमारे १० कोटी डॉलर्स जमा झाले असा अदाज आहे. (इतक्या प्रचड सख्येने लहान लहान देणग्या आल्यामुळे अजून हिशोब चालू आहेत ). शिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे पैशात मापता न येणारी अशी ६ लाख अमेरिकनाची सहानुभूती, जागरुकता आणि जवळीक गृहहीन आणि गरीब लोकाना लाभली. हा उपक्रम सघटित करण्याकरता १ कोटी ३० लाख डॉलर्स खर्च झाले. एकदर जमा झालेल्या पैशातून सप्टेंबरपर्यंत १० टक्के निकडीच्या मदतीकरता, ५० टक्के सध्या गृहहीनाकरता असलेल्या निवासस्थानाना मदत म्हणून आणि ४० टक्के पैसे गृहहीनाना स्वावलंबी करण्याकरता आखण्यात येणाऱ्या योजनांकरता दिले जातील असे ह्या कार्यक्रमाचे मुख्य सूत्रधार श्री केन क्रेगन यांनी सांगितले.

हा 'अमेरिका जोडो'चा कार्यक्रम श्री क्रेगन याच्या मते यशस्वी झाला. पण काहीजणानी त्यावर टीका पण केली. एवढा प्रयत्न आणि सघटन करून आणि इतकी प्रसिद्धी देऊन गोळा झालेले १० कोटी डॉलर्स या टीकाकारांच्या मते अपुरे पडणार आहेत—उदा. न्यूयॉर्क शहरात गृहहीन आणि गरीब याच्या मदतीकरता दरवर्षी २४ कोटी डॉलर्स खर्च करण्यात येतात या टीकेला उत्तर असे की, अशा कार्यक्रमामुळे जनतेची या समस्यांसबधी जागरुकता वाढते आणि जनतेला नवा दृष्टिकोन मिळतो—त्यामुळे भविष्यकाळात नागरिक वाढत्या संख्येने उत्स्फूर्तपणे स्वयंसेवक म्हणून हे प्रश्न सोडवण्याकरता मदत करतील ही शक्यता वाढते.

¤

**सांस्कृतिक मेजवानी :** न्यूयॉर्क / न्यूजर्सी भागात रहाणाऱ्या मराठी भाषिकाना गेला आठवडा सास्कृतिक मेजवानीचा ठरला. प्रथम इथल्या मराठी विश्व या संस्थेतर्फे वॉशिंग्टन येथील मराठी कलामंडळाचा 'महाराष्ट्र दर्शन' हा सौ अपर्णा करमरकर लिखित आणि दिग्दर्शित नृत्य आणि गायनाचा अप्रतिम कार्यक्रम सादर करण्यात आला हा कार्यक्रम २५ तरुण, वयस्कर आणि बालकलावंतानी अत्यत परिश्रम घेऊन बसवला आणि महाराष्ट्राचे सगीत, नृत्य, काव्य, सणवार, परपरा याचे हृद्य दर्शन आणि श्रवण घडवले देशाबाहेर रहाणाऱ्या आमच्यासारख्या मराठी भाषिकाची मने हा कार्यक्रम पहात असताना क्षणार्धात भराऱ्या मारून महाराष्ट्रभूमीत पोचली आणि नतर लगेच दुसऱ्या दिवशी पुण्याच्या थिएटर अॅकॅडमीचा घाशिराम कोतवालचा प्रयोग न्यूयॉर्कला भारतोत्सवाच्या कार्यक्रमाखाली सादर करण्यात आला. हा प्रयोग पाहिल्यावर असे मनात आले की ऐतिहासिक काळात राघोबांनी मराठ्याचा जेंडा अटकेपार लावला होता हे वाचले होते पण विजोबांनी मराठी नाट्यकलेचा झेंडा आज अटलांटिकपार लावला ते प्रत्यक्ष अनुभवले.

**—डॉ. विजय व सौ. जयश्री जोशी**
**वेस्टफिल्ड, न्यूजर्सी—जून १, ८६.**

## अहो, येता जाता

# सॉरी आणि थँक्यू

### फिरोझ रानडे

मला लोकलच्या प्रवासापेक्षा बसचा प्रवास आवडतो. लोकलने केव्हाही जा, सतत गर्दी असते. इतकी गर्दी की नीट उभेपण रहाता येत नाही अगदी अगाला अग लगटून अर्धा–पाऊण तासाचा प्रवास करावा लागतो. त्यापेक्षा बस बरी. काही वेळात तरी जागा मिळते व मी अधेरीलाच बसमध्ये चढत असल्याने मला पक्केपणी जागा मिळते.

पण बसच्या प्रवासाला फार वेळ लागतो. जेथे लोकलनं जायला पाऊण तास लागतो तेथे बसने चागला दीड–एक तास लागतो आणि मुबईत काही ठिकाण अशी आहेत की तेथे लोकलने जाणे सोयीचे असले तरी तेथून येणे फार गैरसोयीचे पडते. परत यायला बस सोयीची नाहीच आहे मुळी.

असं एक अडाणी ठिकाण म्हणजे गिरगावातलं साहित्य रंगमंदिर. तेथे जाण्याकरता सोयीचा थांबा आहे, पण येताना चागलं ऑपेरा हाऊसपर्यंत चालत यायला लागतं.

दुपारची वेळ होती. साहित्य सघात होणाऱ्या कोणा नाटकाची तिकिटं काढून मी चर्नीरोड स्थानकावर येत होतो मी फलाटावर जायला व गाडी यायला एकच गाठ पडली. अधेरी गाडी होती. म्हणजे त्यात गर्दी कमी असणार असा मी अदाज केला व माझा होरा खरा निघाला.

गाडी थाबली तशी घाईघाईने गाडीत चढलो, तर कोणा माणसाच्या पायावर माझा पाय पडला. तो अगदी मनापासून कळवळला. त्याने साध्या चपला घातल्या होत्या व मी बूट. मध्ये मी काही दिवस चपलाच घालत असे; पण असे बुटाचे पाय पडल्यापासून मी बूट घालायला सुरुवात केली होती.

त्याचं कळवळणं ऐकताच मला फार अपराधीपणाच वाटल. त्या भावनेनंच मी चटकन 'सॉरी' म्हटल.

'ही इंग्रजांनी चांगली सोय करून ठेवली

आहे.' तो कळवळत्या रागानं म्हणाला, 'प्रथम लोकाच्या पायावर पाय द्यायचा व वर 'सॉरी' म्हणायचे की सपल.'

मला त्याच्या भावना कळत होत्या. पण मी काही मुद्दाम म्हणून पाय दिला नव्हता. तेव्हा मी 'सॉरी' शिवाय दुसर काय म्हणणार होतो?

त्या गृहस्थाला पायावर पाय पडून झालेल्या जखमेपेक्षा त्यावर मी सॉरीचं मीठ चोळलं होत त्याचा राग आला होता. ह्याची मला जाणीव झाली.

योगायोगान आम्हाला ग्रँट-रोडला शेजारी शेजारी बसायला जागा मिळाली. बसता-बसता मी त्याच्याकडे बघून थोडा हसलो. त्याचाही राग मावळलेला दिसला. आता आम्ही नुसते प्रवासी नव्हतो तर माणसात आलो होतो. तेव्हा त्याला मी म्हटले,

'सॉरी हं, अगदी सॉरी, घाईघाईत चढलो त्यामुळे तुमच्या पायावर पाय पडला.'

'त्याच काही इतकं नाही हो.' तो थोडा वरमून म्हणाला पण लगेच त्याचा आवाज चढला,

'तुम्ही वर सॉरी म्हणालात ना त्याचा मला फार राग आला. इंग्रजांच राज्य जाऊन आता चागली चाळीस वर्षं होत आली. तरी हे सॉरी आणि थँक्यू काही गेल नाही.'

'बरोबर आहे तुमचं म्हणण' मी म्हटलं, 'माझ चुकलच.'

कोणा मराठी माणसानं आपली चूक इतक्या तडकाफडकी मान्य केलेली बघून त्याला आश्चर्य वाटलं आणि ते सहाजिकच होतं.

'खर म्हणजे आतापर्यंत ह्या इंग्रजी शब्दाच आपल्या भाषेतून उच्चाटन व्हायला पाहिजे होते.' परत मी.

'होना. अशी भाषेची चिरफाड कशाकरता?' तो म्हणाला. आजकाल भाषेची चिरफाड होते आहे, त्याबद्दल चिंता व्यक्त करणारा मोठा वर्ग तयार होतो आहे. तो त्या वर्गातला वाटत होता.

'मला सुद्धा अशी चीरफाड केलेली आवडत नाही.' मी त्याला दुजोरा देत म्हटले. माझ्या दुजोऱ्यामुळे त्याला फार आनद झाला. हुतूतूच्या खेळात दुसऱ्या पार्टीच्या भिडूला आत घेतात तसा मी त्याला आत घेत होतो.

'मी दोन-चार मिनिट शांत राहिलो व मग विचारले, 'पण काय हो, सॉरी ह्या शब्दाकरता कोणता मराठी शब्द वापरता येईल.'

'म्हणजे सॉरी शब्दाकरता मराठी शब्दच नाही आहेत की काय?' त्याने विचारले.

'असणारच हो. उगाच का त्या फादर स्टिफनने मराठीचं कौतुक केलं आहे? पण 'सॉरी' शब्दाला चपखल मराठी शब्द कोणता?'

माझ्या अज्ञानाची त्याला कीव आली. त्या कीवेतच तो म्हणाला, 'का? माफ करा असं नाही म्हणता यायचे?'

'हो, 'माफ करा' अस म्हणता येईल' मी म्हटले व परत दोन मिनिटं जाऊ दिली. 'पण माफ-माफी हे शब्द तर अरबी आहेत.'

हे ऐकताच तो चमकला. तो चमकलेला बघून मी म्हटले, 'माफ हा अरबी शब्द वापरण्यापेक्षा 'सॉरी' हा इंग्रजी शब्द वापरायला काय हरकत आहे? इंग्रजाची गुलामी जाऊन चाळीस वर्षंच झाली आहेत, तर मुसलमानाची गुलामी जाऊन निदान महाराष्ट्रापुरती तरी चागली साडे-तीनशे वर्षं झाली आहेत.'

ह्यावर काय बोलावे हे त्याला सुचेना. 'माफी' हा शब्द अरबी आहे हेच त्याला माहीत नव्हते दुसरा शब्द त्याला सुचेना.

'बरं, ते सॉरी आणि माफीचं राहू दे. थँक्स् ह्या शब्दाला तर 'आभारी आहे' हा शब्द प्रयोग करता येईल ना?'

'प्रयोग करता येईल.' मी शांतपणे म्हटले, 'पण खर सांगू का 'आभारी आहे' किंवा आभारी आहोत म्हणायला आपल्या लोकाना जड जाते.'

'सहाजिकच आहे. थँक्यु इतके तोंडात बसले आहे.'

'नाही तो प्रश्न नाही. ह्या बाबत लाल बहादूर शास्त्र्यांची गोष्ट सागतो.

लाल बहादुराची कोणी अमेरिकन वा ब्रिटिश माणूस मुलाखत घेत होता. मुलाखत चालू असता, शास्त्रीजींच्या कोणा चपराश्याने, त्यानी सागितले होते ते काम झाल्याचे सांगितले. त्यावर शास्त्रीजीनी त्या चपराश्याचे protesty म्हणजे अगदी सढळपणे आभार मानले. ते बघून तो मुलाखत्या चाट पडला. त्याने आपल्या मुलाखतीत लिहिले की, 'भारतात मी कित्येक राजकारणी व अधिकारी व्यक्तींना भेटलो पण चपराश्याचे आभार मानणारा माणूस मी पाहिला नव्हता.'

'मग तुम्हाला काय वाटतं? का आपले लोक का आभार मानत नाहीत?' त्याने प्रश्न केला. 'ह्याचे कारण आपल्याकडे माणसा-माणसात श्रेष्ठ आणि कनिष्ठ मानण्याच्या वृत्तीत आहे. आतापर्यंत काम करणारा म्हणजे कनिष्ठ ही समजूत. आणि कनिष्ठाचे कसले आभार मानायचे? थोडं चुकलं तर लगेच सॉरी काय म्हणायचे? कोणी काही काम केले तर त्यात आभार काय मानायचे? हे प्रश्न मनात नेहमी घोळत असतात.

'तेव्हा प्रतिशब्द सुचवत बसण्यापेक्षा त्या मागची वृत्ती आपल्यात कशी येईल ते बघितलं पाहिजे. आणि ही वृत्ती आली की आपोआप योग्य शब्द पण तयार होतील बघा.'

तोपर्यंत अंधेरी आले होते. आम्ही दोघेही उठलो व दाराकडे जाऊ लागलो. जाता जाता तो म्हणाला, 'तुम्ही मला आज वेगळा विचार ऐकवलात. थँक्यू.' □


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्याचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलाची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा

**मला निसटलंच पाहिजे!**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

**मराठवाडा**

# दंगली थांबल्या तरी सूत्रधार मोकळेच! कापसाच्या गंजींना आगी का लागतात?

प्रा. बी वाय. कुलकर्णी

'मराठवाडा' विभाग काही वर्षापासून गाजतो आहे तो रेल्वे रुंदीकरण, पाचवीला पुजलेला दुष्काळ व मराठवाडा विद्यापिठाच्या नामानर प्रश्नामुळे पण गेल्या दोन वर्षापासून 'मराठवाडा' ठळक अक्षरात वृत्तपत्रात गाजतो आहे तो कापसाला लागलेल्या आगीमुळे व १९८६ मध्ये मराठवाडा विभागात झालेल्या अभूनपूर्व दगलंमुळे.

जातीय दंगली मराठवाडा विभागाला नवीन नाहीत पण आजपर्यंत त्या दगली काही शहरापुरत्याच मर्यादित होत्या, प्रामुख्याने औरगाबाद, माजलगाव. पण यावेळी मात्र दगलीचे लोण अनेक शहरापुरतेच नव्हे तर गावस्तरावर पोहचले आहे सात–आठ हजार वस्तीच्या खेड्यात दगल झालेली आहे. तर अनेक शहरात तणावपूर्ण वातावरण आहे.

दगलीतही प्रथम मान पटकावला तो मराठवाड्यातील प्रमुख शहर औरंगावादने. या वर्षाच्या सुरुवातीला म्हणजे जानेवारी ८६ मध्ये शिवसेनेच्या मिरवणुकीवर दगडफेक झाली व दगल उसळली तर मे ८६ मध्ये औरगावादचे दैवत समजल्या जाणाऱ्या सुपारी हनुमान मदिरावर हिरवा झेडा लागला व दगल झाली. हिरवा झेंडा मदिरावर लावल्यानंतर हिदु–मुस्लिम समजदार नेतृत्वाने दगल होऊ नये यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. त्याचे प्रयत्न यशस्वी झाल्यासारखे वाटत असतानाच दगल सुरू झाली, कारण ज्याचे नेतृत्व दगलीवरच अवलबून आहे त्याना दंगल आवश्यक होती व त्याप्रमाणे ती झाली.

'माजलगाव' हे आणखी एक मराठवाड्यातील खेडेवजा शहर असलेले तालुक्याचे गाव, ज्याच्याकडे काही वर्षापासून दगलीचा ठेका आहे; त्याने शिवजयतीच्या अगोदरच १८ एप्रिलला दगल उरकून घेतली. पुन्हा शिवजयतीला तेथे काही तरी होणार असे लोकाना वाटतच होते पण तसे काही झाले नाही. लोकाना आश्चर्य वाटले.

मराठवाड्यातील दुसऱ्या क्रमाकाचे प्रमुख शहर व मुख्यमत्री शकरराव चव्हाण याचे गाव 'नादेड' जेथे शिखाची सख्या मोठ्या प्रमाणात आहे. श्रीमती गाधीच्या हत्येनतर दिल्लीत जे झाले त्याची पुनरावृत्ती होते की काय अशी भीती बाळगली जात होती; पण नादेडला तसे झाले नाही, तणावही वाढला नाही. पण यावेळी शिवजयतीच्या मिरवणुकीनतर तेथेही ११ व १२ मे रोजी दगल झाली नादेडच्या दगलीच्या सदर्भात मुख्यमत्र्यांनी म्हटले की, 'दगल पूर्वनियोजित होती' तर स्वातत्र्यसैनिक अमृत गडकरीनी स्पष्टपणे म्हटले की, 'दगल बाहेरच्या लोकानी येऊन केली.' तर मराठवाडा दैनिकाच्या प्रतिनिधीने लोकाशी चर्चा करून लिहिलेल्या नादेड विषयक वार्तापत्रात लिहिले की, औरगाबादहून निघणाऱ्या एका वृत्तपत्राने, सनसनाटी बातमी देण्याच्या नादात, दगलीला चिथावणी देणारी बातमी दिली व दंगल उसळली.

जालना जिल्ह्यातील अंबडला तर २६ मार्च ८६ ला भयकर दगल झाली विशेष म्हणजे ही दगल झाली तेव्हा स्थानिक अधिकारी हजर नव्हते या दंगलीला सर्वांनीच मुस्लिमाना जबाबदार धरले. अबड महाविद्यालयच्या प्राचार्यांनी तर स्पष्टपणे म्हटले की, 'त्या दिवशी प्रल्हादसिग (भाजपचे नेते) नसते तर संपूर्ण अबड जळून खाक झाले असते.' तर दगलपूर्व काळात धर्मनिरपेक्षता मानणाऱ्या अनेक व्यक्तीच्या मतात आता परिवर्तन होऊ लागलेले आहे, म्हणजे एका धर्माबद्दल त्यांनाही तिरस्कार वाटू लागलेला आहे.

मराठवाड्यात प्रथमच गावस्तरावर दगल झाली ती १५ मे ८६ ला, बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात उभापूर या सात हजार वस्तीच्या खेड्यात दगलीचे कारण बसमधील भाडण २० ते २५ लाखाचे नुकसान झाले. ४० घरे खाक झाली व खूनसत्र असे झाले की, आजही खाजगी व शासकीय आकड्यात मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या सख्येत बरीच तफावत आहे उभापूरची दगल, मराठवाड्यातील खेड्यात काय पेरून ठेवले आहे, याचे 'टोकन' समजायला हरकत नाही. कारण हिंदू–मुस्लिम समाजाच्या तथाकथित हितसबधाचे रक्षण करणाऱ्या सघटना उभ्या राहात आहेत. शहरातील दगल करणाऱ्याचे त्याना मार्गदर्शन आहे, इतकेच नव्हे तर शहरातील दंगलीसाठी या खेड्यातील शक्तीचा वापर होण्याची शक्यता आहे तशी काही ठिकाणी प्रचितीही आलेली आहे. असे झाले तर मग मात्र सपूर्ण मराठवाड्यात दोन्ही समाजाच्या नंबर दोनचे धदे करणाऱ्या गुडाचे नेतृत्व निर्माण होईल; जे नेतृत्व आपले अस्तित्व कायम ठेवण्यासाठी दंगलीचे चक्र चालू ठेवण्याचा प्रयत्न करील आणि म्हणूनच दगलीची शक्यता नाकारता येत नाही

मराठवाडा म्हणजे संताची भूमी! त्यातही पैठण म्हणजे संत एकनाथाचे गाव तेथेही दंगल झाली दगलीत परस्पराच्या कडब्याच्या गंजीना आगी लावण्यात आल्या. इतकेच

नव्हे तर चार वर्षाच्या 'निर्मला कोराळे' या मुलीलाही मारहाण करण्यात आली. दंगलीत सामान्य नागरिकाचे जास्त नुकसान झाले. कारण दंगलीत दंगलीच्या सूत्रधाराचे नुकसान होत नाही की ते मरत नाहीत. कारण त्याना दंगलीची पूर्वकल्पना असते. त्यामुळे ते सर्व गोष्टींची खबरदारी घेतात. दंगलीचे सूत्रधार असूनही त्याना अटक होत नाही. कारण त्याच्यामागे राजकीय 'गॉड-फादर' असतात. 'खरा बाजूलाच राहिला!' अशीच दंगलीनतर अटक झालेल्याची व गावातील लोकाची, अटक केलेल्या व न केलेल्या व्यक्तीबद्दल प्रतिक्रिया असते.

एकंदरीत मराठवाड्याची 'सताची भूमी' म्हणून ख्याती होती, ती आता तशी राहिलेली नाही. खेड्याखेड्यातून दोन्ही जमातीच्या सघर्ष सघटना निर्माण होत आहेत. कुरापती काढून दगल घडविण्याचा प्रयत्न होत आहे. याला आवर घालणे अशक्य आहे कारण या दंगलीचे सूत्रचालन दोन्ही समाजातील गुडाच्या हातात आहे या गुडाना राजकीय आश्रय आहे. हे गुड नबर दोनचे धदे करतात, त्यामुळे त्याचे अधिकाऱ्याशी लागेबाधे आहेत अधिकारी त्याचे पैसे घेऊन मिंधे झालेले आहेत. आणि जोवर हे चालू राहणार तोवर दंगलीनतर फक्त मलमपट्टी होणार. दंगलीची मानसिकता कायम राहणार, जी मानसिकता दंगलीची जखम कायम ओलीच ठेवणार.

### भ्रष्टाचार लपवण्यासाठी

मराठवाड्यात दंगलीशी समातर अशा आणखी अप्रिय घटना घडत होत्या आणि त्या म्हणजे कापसाच्या गजीना लागलेल्या आगी! कापूस एकाधिकार सुरू झाल्यापासून कापसाच्या गजीना आगी लागणे सुरू झाले. कापसाच्या गजीला आग लागली, अशी माहिती कुणी कुणाला सागितली की लगेच प्रश्न विचारला जातो 'आग लागली की लावली?' आणि हा प्रश्न आगीमागचे रहस्य सहज सागून जातो. कापूस एकाधिकारमध्ये खरेदीच्या वेळी इतका भ्रष्टाचार होतो की तो लपविण्यासाठी कापूस जाळणे हा एकच पर्याय शिल्लक राहतो व त्यामुळे आगी लावल्या जातात

मराठवाड्यात दंगलीचे सत्र सुरू झाल्यावर जसे माजलगावचे नाव घेतले जाते तसे कापसाच्या गजीना आग लावण्याचे सत्र सुरू झाले की, परभणी जिल्ह्यातील 'जिंतूर' या तालुक्याचे नाव घेतले जाते या वर्षीही तेथे १७ एप्रिल ८६ ला कापसाच्या गजीला आग लागली व ७ लाखाचा कापूस जळाला. महाराष्ट्रात कापूस एकाधिकार खरेदी योजनेच्या १५ वर्षातील तेथील आगीची ही २२ वी वेळ आहे. प्रत्येक वेळा चौकशी होते. गैरप्रकार आढळून येतो पण निष्कर्ष व त्यावर कारवाई कधीच होत नाही. कापूस केंद्रावरील भ्रष्टाचार हेच आगीचे कारण आहे, असे जिंतूरमध्ये सर्रास बोलले जाते. कापसाला आग लागणे, ही जिंतूरची परपराच झाली आहे परभणी जिल्ह्यातील कळमनुरी येथे १२ मे ८६ ला कापसाच्या गजीला आग लागली. आग तब्बल ८ तास होती. यात १ कोटी २५ लाखाचा कापूस जळून खाक् झाला. आग विझविण्यासाठी अग्निशामकाची सोय लवकर झाली नाही. ट्रकमधल्या सायलेन्सरमधून धुरासोबत उडालेली ठिणगी हे आगीचे कारण सागितले गेले, जे न पटण्यासारखे आहे. कापूसखरेदीतील काळेबेरे हेच खरे कारण आहे.

दंगल व कापसाच्या गजीला आग या दोन्ही घटना घडल्या त्या परभणी जिल्ह्यातील मानवत या खेडेवजा शहरात तेथे १७ मे ८६ ला कापसाच्या गजीला आग लागली. ५५५३ क्विंटल कापूस जळाला. आगविझवे बब नादुरुस्त होते, एकदरीत आगविझवे बब व कापसाच्या गजीना लागणारी आग याचा काहीतरी संबध आहे, अशी शका घेण्यास भरपूर वाव आहे. कारण कापसाच्या गंजीना आग लागावी व आगविझवे बब नेमके त्यावेळी नादुरुस्त असावेत हा एकदा योगायोग असू शकतो, नेहमी नाही आणि कापूस सकलन केंद्रावर कधीही आग लागण्याची शक्यता गृहीत धरली तर आग विझव्या बबाची नादुरुस्ती क्षम्य ठरत नाही. जालना शहरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी कापसाच्या जिनिंगमध्ये प्रचड आगी लागल्या तर याच जिल्ह्यातील अबड तालुक्यात तीर्थपुरी येथे कापसाच्या गजीला आग लागली. तो १५ तास होती. ४० लाख रुपयाचा कापूस आगीत खाक झाला. अगदी मे महिनाअखेर आग लागली ती किनवट तालुक्यातील कापसाच्या गजीला. २६ मे रोजी लागलेल्या आगीत १५००० क्विंटल कापूस, २५००० क्विंटल सरकी व इतर सामान आगीत खाक झाले. एकूण मालमत्तेचे नुकसान दोन कोटीचे.

कापसाच्या गजीना लागलेल्या आगीचे एकमात्र कारण आहे कापूस खरेदीत होणारा भ्रष्टाचार. या भ्रष्टाचाराची पद्धती अगदी सोपी आहे. साधारणतः शेतकरी बैलगाडीत किंवा ट्रॅक्टरमध्ये कापूस आणतात. बैलगाडीत पाच क्विंटल तर ट्रॅक्टरमध्ये २५ ते ३० क्विंटल कापूस बसतो. ग्रेडर व मापाडे त्या शेतकऱ्याशी सगनमत करतात. त्याचा मुळात पाच क्विंटल असलेला कापूस १० क्विंटल भरवतात. अतिशय खराब असा कापूस सुपरमध्ये लावला जातो. शेतकऱ्याला मोफत मिळणाऱ्या पाच क्विंटलच्या पैशात या ग्रेडरचा व मापड्याचा मोठा हिस्सा असतो. कागदोपत्री घेतलेला पण प्रत्यक्षात नसलेला हा कापूस शेवटी दाखवणे अशक्य असते. अशा वेळी कापसाच्या गजीला आग लावली जाते. थोडा कापूस जळतो आणि मग प्रत्यक्ष न घेतलेला कापूस कागदोपत्री जळतो, भ्रष्टाचारही त्याचबरोबर जळतो. भ्रष्टाचार करणारा पुढच्या वर्षाची वाट पाहतो. अतिशय परिश्रमाने शेतकऱ्याने उगवलेला कापूस अशा पद्धतीने खाक होतो.

कापूस एकाधिकारामधील भ्रष्टाचारामुळे शेतकऱ्याला कापसाच्या किमतीची हमी देणारी योजनाच बदनाम होत चाललेली आहे. ती चालू ठेवावी की नाही असा विचार सुरू झालेला आहे भ्रष्टाचारामुळे ही योजना आज कित्येक कोटीच्या तोट्यात आहे ही योजना शेतकऱ्याच्या अतिशय फायद्याची आहे आणि म्हणूनच ती चालू राहणे आवश्यक आहे. कापसाचे वाढते उत्पन्न या योजनेची देन आहे. आज ही योजना भ्रष्टाचाराच्या विळख्यात आहे तिला त्यातून बाहेर काढणे आवश्यक आहे, पण या योजनेतील भ्रष्टाचार सपवणे कठीण आहे कारण कापसाला लागलेल्या आगीत अग्रभागी ग्रेडर व मापाडे असले तरी त्याना साभाळणारे पुढारी या भ्रष्टाचाराचे खरे सूत्रधार आहेत.

एकदरीत दगलीच्या व कापसाच्या आगीच्या चक्रव्यूहातून 'मराठवाडा' लवकर सुटेल असे सध्यातरी वाटत नाही. ☐

## आधुनिक मीरा

# भगिनी रेहाना तय्यबजी

म. गाधीजीच्या परमशिष्या कै. भगिनी रेहाना तय्यबजी यांची श्री भगवान श्रीकृष्णावर अलोट भक्ती होती. मीरेचा आधुनिक अवतार असा त्याचा लौकिक होता. त्याचा जन्म सन १९०१ मध्ये एका गुजराती मुस्लिम कुटुबात झाला. तय्यबजी घराणे भारतीय स्वातत्र्याच्या इतिहासात देशभक्तीसाठी प्रसिद्ध आहे. श्रीमती रेहानाजीचे आजोबा न्या. बदरुद्दीन तय्यबजी, मद्रास येथे भरलेल्या भारतीय राष्ट्रीय सभेच्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते ! त्यांचे पिताजी अब्बास तय्यबजी आणि कुटुबातील अन्य व्यक्तीनीही मोठमोठी पदे भूषविली होती. श्रीमती रेहानाजीही अनेक वर्षे गाधीजीच्या आश्रमात राहात होत्या. त्यानी मीठाच्या सत्याग्रहातही भाग घेतला होता. तय्यबजी घराण्यात देशभक्तीच्या जोडीला रेहानाजीच्या रूपाने साक्षात् देवभक्ती अवतरली होती.

त्याचा परिचय कल्याण मासिकाच्या मे १९७८ च्या अकात भक्त श्रीरामशरणदासजी यानी करून दिला आहे दि १२।६।१९६२ रोजी त्यानी रेहानाजीची भेट त्याच्या निवासस्थानी घेतली. त्यावेळी त्या देव्हाऱ्यासमोर लाकडी स्टुलावर बसल्या होत्या. देव्हाऱ्यात भगवान श्रीकृष्णाची मनमोहक बसीधारी मूर्ती दिसत होती. गधाक्षता फुलानी नुकतीच कुठे पूजा आटोपलेली होती. जवळच पूजेचे तबक होते. सुगधाने खोलीतले वातावरण भारावून गेले होते. समोरच्या टेबलावर श्रीमद्भगवद्गीता, उपनिषदे इ. ग्रंथ ठेवलेले होते. एका अहिंदु–मुस्लिम कुटुबात जन्माला येऊनही भगवान श्रीकृष्णावरील त्याची अलौकिक दिव्य भक्ती आणि सर्वश्रेष्ठ हिंदुधर्मग्रथाचा स्वाध्याय पाहून श्रीरामशरणधासजी तर नतमस्तक झाले !

श्रीरामशरणदासजीनी आणलेली फळांची भेट रेहानाजीच्या समोर ठेवली. त्या उठल्या. ती फळे त्यानी भगवताला अर्पण केली, फळावर तुळसीपत्र ठेवून डोळे मिटून नैवेद्य अर्पण केला अन् घटेचा मंजुळ ध्वनी करून तो प्रसाद सर्वांना वाटून टाकला.

या भेटीत श्री रामशरणदासजीनी रेहानाजीची अध्यात्मिक विचारसरणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विचारले, 'आपल्या भारत देशात दिवसेंदिवस नास्तिकता व अशाती सारखी वाढते आहे त्याचे कारण काय असावे ?' यावर त्या म्हणाल्या– 'ज्या भारताने एकेकाळी जगाचे गुरुत्व केले होते, ज्या भारतात अनेक तत्त्वज्ञाने निर्माण झाली, विकसित झाली. ज्या पवित्र भूमीवर साक्षात् भगवताने अवतार घेऊन त्याच्या श्रीमद्भगवद्गीता या वाङमयमूर्तीद्वारे अखिल मानवजातीला मार्गदर्शन केले, त्या एका धर्मपरायण, परमपवित्र ऋषिमहर्षीच्या भारतासारख्या महान राष्ट्राने पाश्चात्य, भोगी राष्ट्राचे अधानुकरण करायला सुरुवात केली हेच आपल्या देशाच्या अध पाताचे एक कारण आहे.' अशी खत व्यक्त केली.

त्यानी दुसरा प्रश्न विचारला, 'काही लोक भगवान श्रीकृष्णाला ऐतिहासिक पुरुष मानत नाहीत, काही त्यांना मानतात पण भगवताचा अवतार म्हणून मानत नाहीत. आपले काय मत आहे ?'

यावर त्या सात्त्विक संतापाने म्हणाल्या, 'जे कोणी महाभाग भगवान श्रीकृष्णाच्या अस्तित्वाची शका घेतात ते निव्वळ अज्ञानी आहेत. ते श्रद्धा ठेवोत न ठेवोत, सत्य हे सत्यच असते. आजही भगवत साक्षात् प्रकट होऊन भक्ताना दर्शन देत असतात. जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्म माजतो तेव्हा तेव्हा धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी भगवंत अवतार घेतात. भगवतांचे साक्षात् दर्शन श्रीसंत मीराबाई, संतश्रेष्ठ सूरदासजी महाराज व नरसी मेहता याना झाले होते. असे त्या म्हणाल्या, त्यावेळी भगवत् प्रेमाने त्याचा कठ दाटून आला होता.

रामायण व महाभारत ही महाकाव्ये आणि त्यात रेखाटलेल्या व्यक्तिरेखा–भगवान श्रीरामकृष्णादी ह्या ऐतिहासिक नसून काल्पनिक आहेत असे महात्माजी मानत असत. त्याविषयी रेहानाजीचे 'मत' जाणून घेण्याचा प्रयत्न केल्यावर त्या म्हणाल्या– म. गांधीजी किंवा कोणीही जेव्हा असे म्हणतात तेव्हा त्या *स्वयप्रज्ञेने व्यक्तिगत* दृष्टिकोन *प्रकट* करीत असतात. परतु भगवत्तत्त्व मोठे विलक्षण आणि गूढ आहे. ते ज्याने जाणले तोच त्या अनिर्वचनीय रसानुभूतीच्या दिव्यानदाचा अनुभव घेईल. यावेळी त्यानी पुढील 'शेर'च 'पेश' केला.

नही इश्कका दर्जे लज्जतसे खाली
जिसे 'जौक' है वह मजा जानता है।

(यात 'इश्क' म्हणजे भगवत्प्रेम, आणि 'मजा' म्हणजे दिव्यानदाभूति असा अर्थ अभिप्रेत आहे)

श्रीरामशरणदासजीनी पुढे विचारले– रेहानाजी ! तुम्ही मुस्लिम कुटुबातल्या असूनही भगवान श्रीकृष्णाची उपासना का करता ? यावर त्या म्हणाल्या– मी एका मुस्लिम घराण्यात जन्माला आले परतु माझ्यावर संस्कार झाले ते हिंदु सस्कृतीचे ! आणि आम्ही मूळचे हिंदूच होतो. हिंदुस्थानातच सारे जन्माला आलो. अगदी बालपणीच्या झुजूमुजू वयापासून मी माझ्या हृदयीच्या देव्हाऱ्यात भगवान श्रीकृष्णाची मनोमन पूजा करीत आले लहानपणी वेदात वाचला–समजलाही. मी ८ वर्षाची असतानाच कुणीतरी मला म्हणाले–

The Hindus are idolaters

( हिंदू मूर्तीपूजक आहेत ) यावर मी सात्विक सतापाने म्हणाले होते–

The Hindus are not idolaters. They do not worship the idols, but worship the idea behind it

हिंदू मूर्तीपूजक नाहीत तर त्या मूर्तीमागे असलेल्या तत्त्वाची–श्रद्धेची भावनांची ते पूजा करीत असतात. मला ही कृष्णभक्ती पूर्वजन्माच्या संस्कारामुळे मिळाली आहे असे मी मानते. मी गीता वाचते, भगवान श्रीकृष्णाची उपासना करते हे पाहून माझे आप्तस्वकीय माझ्यावर नाराज होतात. परतु त्याच्या नाराजीची मी पर्वा करीत नाही.

पुनर्जन्मावर रेहानाजीचा दृढ विश्वास होता. पुनर्जन्माविषयी विचारल्यावर त्या

म्हणाल्या 'कोणी अशी शंका घेईल की जीव वा आत्मा मृत्यूनंतर पुनर्जन्म घेतो याला पुरावा काय? मी त्यांना उलट विचारीन की पुनर्जन्म नाही यावर तरी तुमचा काय पुरावा आहे? मी मात्र माझ्या जीवनात पुनर्जन्माच्या सत्यतेचा अनुभव घेतला आहे!

श्रीमती रेहानाजींची श्रीमद्भगवद्गीतेवर अतुट श्रद्धा होती. गीतेला त्या अद्वितीय व महान ग्रंथ मानत. त्यांनी 'सुनिये काकासाहेब' या आपल्या आत्मचरित्रात गीतेविषयी लिहिले आहे. 'सन १९२३ मध्ये माझ्या जीवनात 'गीताजी' आल्या. यंग इंडियात बापूंनी केलेली गीता प्रशंसा वाचली अन् मी एक गीतेची प्रत घेऊन घरी आले. वाचत बसले. वाचता वाचता माझ्या हृदयाकाशात जणू वीज चमकली. मी वेडी झाले. व्याकुळले. मी तिचे सतत वीस वेळा पारायण केले. तरीही मी तिला दूर करू शकले नाही. रात्री उशीजवळ ठेवूनच मी झोपू लागले. मी जणू अद्भूत, सुंदर तेजस्वी व आनंदी जगात विहार करू लागले. गीतेच्या सातशे श्लोकातून मला चौदा ब्रह्मांडाचे जणू रहस्य उमजले. माझ्या जीवनातील सर्व प्रश्नांची उत्तरे गीतेने दिली... समस्या उकलल्या. अंधारात जणू दीप आणि वाट चुकलेल्याला जणू मार्गदर्शक मिळाला.' त्या दररोज गीतेचे पारायण करीत. सर्व श्लोक त्यांचे मुखोद्गत होते. गीतेला त्या सन्मानाने 'गीताशरीफ' म्हणत. इंग्रजी शिक्षणाला त्या मानसिक गुलामीचे प्रतीक मानत. एकदा त्या उद्विग्न होऊन म्हणाल्या होत्या—'इंग्रजी शिक्षणाने आमच्या बुद्धीला आणि इंग्रजी औषधाने आमच्या शरीराला विकृत केले आहे!

श्रीमती रेहानाजींनी वाङ्मयसेवाही केली आहे. 'गोपीहृदय' या त्यांच्या पुस्तकात श्रीकृष्णभक्तीची अद्भूत आध्यात्मिक अनुभूतीची कथा लिहिली आहे. 'नापनेसे पहले' हा त्यांचा कथासंग्रह आहे. 'कृपाकिरण' हा श्रीकृष्ण भक्तीने भरलेल्या भजनांचा संग्रह आहे. हिंदुधर्म–हिंदुदर्शन, हिंदू आचारविचारांविषयी त्यांची श्रद्धा, भक्ती अन् प्रेम पाहून आपणही नतमस्तक होतो!

**—लक्ष्मण ढवळू टोपले**

बी. ए., बी. एड्.

विक्रमगड, ता. जव्हार, जि. ठाणे.

['गीतादर्शन' या पुण्याच्या गीताधर्म मंडळाच्या मासिकातून (दीपावली ८५ अंक) साभार पुनर्मुद्रित]

# वेशीबाहेरचे एक पान

सुगी झाली होती. दरसालासारखं भैरुपी माळावर उतरलं. पाली माळावर बसल्या. गावातली शेंबडी पोरं पालीभोवती जमाय लागली. एक दिस पालीच्या जुळणीत आणि विश्रांतीत गेला.

आता चांगला पंधरा दिवस गावात रंग येतोय. शिमग्याला गावची जत्रा फुटायची. पुढं दोन दिवस भैरुपी सुगी गोळा करायचं. रयत पायली दोन पायली दाणं द्यायचं. कुणी कापड–चोपड, कुणी काय तर कुणी काय. मूठ-पसा गोळा व्हायचं...त्यानं पोतं भरायचं. पानपट्टीवाल्यापासनं बड्या वाण्यापतूर आणि न्हाव्यापासून चांभारापतूर साऱ्याकडनं जे गावलं, ते वसूल करायचं. दर सालाला गावाला हे पाव्हणं यायचंच 'इया गेल्या. जातील. पर त्ये येतील,' असं नदीकडं तोंड केल्याली म्हातारी–कोतारी म्हणायची.

त्यांच्याकडं वाजापाचं सारं असायचं. त्यांच्या बायका पालीतच असायच्या. पुरुष माणसं तेवढीच दारोदार हिंडायची.— वेशीच्या आत त्यांच्या बायकांनी पदर पसरलेला दिसला नाही. त्या तोंड रंगवून भैरुपीच्या वेषात पण कधी दिसल्या नाहीत. वाऱ्यावरची जमात पर देखण्या जातीची. जात भटकी. हात फाटकी. पर रूप खानदानी.

त्या साली त्यांनी सोंगाला रामायण घेतलं होतं. पहिल्या दिसी कैकयीचा हट्ट झाला. दुसऱ्या दिवशी रामाला वनवासाला धाडलं. या साऱ्या प्रसंगी कथा, दिग्दर्शन, गायन, वादन सारं त्यांचंच

स्मरणात राहणारा तो दिवस. रावण सीतेला पळवून नेतो. कसा पळवून नेतो हे मोहक दाखवत होते त्यात सीताचं पात्र अति देखणं होतं. तरण्याबांड रुपवतीला, चवळीसारख्या गुलजार सीनेला, मुखवटा घातलेला रावण पळवून नेतो . रावण जटायूचं पंख छाटतो ... हा प्रसंग गल्लीबोळातल्या प्रत्येक घरापुढं, दुकानापुढं चालू होता. देखण्या सितेनं, साऱ्यांची मनं, रूपानं जिंकून घेतली होती. सीतेला बघायला चिक्कार गर्दी फुटली होती. त्यांच्या कथा–गायनाकडं कुणाचंच लक्ष लागत नव्हतं, सारं ध्यान सीतेवर.

साऱ्या गावानं आजच्या सोंगाचं कवतिक केलं. दिस बुडायच्या वक्ताला भैरुपी माळावरल्या पालीकडं निघाली. वेशीच्या बाहेर आली. तसं म्हारवाड्यानं त्यानासनी अडवलं. म्हारवाडा म्हणाला, 'आवंदापासनं सोंग आमालाबी दावा, आमीबी तुमासनी बिदागी गोळा करून देऊ.' भैरुप्यानी त्यानासनीबी रावण सीतेला कसा पळवून नेतोय ते दावलं.

आता बराच वकूत झाला होता. गावातल्या काश्या इथवी आला होता. साऱ्या म्हारवाड्याला मुजरा करून भैरुपी निघालं. इळभर नाचून, वरडून, गाऊन, थकल्याली भैरुपी पालीकडं पाय टाकायला लागली. त्यांच्यामागं चार हातावर अंधारात काश्या चालला होता. माळावर अंधारानं घर केलं होतं. इळभर नाचल्याली, धावा धावा करून ओरडल्याली आणि रावणानं खांद्यावरनं खाली आणि खालनं खांद्यावर घेतलेली सीता दमून भागून गेली होती. तिचं अंग ठणकत होतं. ती सगळ्या भैरुपीच्या मागण चालली होती.

तिच्या मागं काश्या तंद्रित चालला होता. डोस्कीला मफलर गुंडाळलेला होता. त्याचं डोस्कं अंधारातच आखणी करत होतं, सीताला कसं पळवून न्यायचं?

त्याला कुठलं तरी बळ चढलं. त्यानं मफलरचा बोळा सीताच्या तोंडात कोंबला. सीतेला रावणासारखं उचललं. सीता तडफडाय लागली. खांद्यावरनं उतराय बघाय लागली. खसफस ऐकून सारं भैरुपी थांबलं आणि एक भैरुपी वरडला, 'आरं ती पोरगी नव्हं...पोरगं हाय.'

काश्याच्या कानात तापलेल्या तेलासारखं हे शब्द पडलं. काश्याची दारू उतरली होती.

सारं भैरुपी काश्याभोवती जमली. हातात काय सापडलं त्यानं काश्याला ठोकलं. काश्याचा पायच पिरगाळून काढला.

दुसऱ्या दिसी दिवस फुटायच्या आतच भैरुप्यांनी आपल्या पाली उचलल्या होत्या. या गावाला कधी यायचं नाही म्हणून.

आज गावातल्या तिट्टावरल्या हॉटेलात काश्या पाय वडत चालताना कधी तरी दिसतो, पण भैरुप्याची सीता आमच्या गावात त्यापुढं कधीच नजरला पडली नाही. दिसणारबी नाही. वेशीबाहेरचा माळ कैक वरसं पालीविना उभा हाय!

**—बापू जाधव**

**किर्लोस्करवाडी**

कथा

# अनुभव

'ए, तू जरा दहा मिनिट पुस्तक वाचत बसशील का ?'

मैत्रिणीन 'व्यक्ती आणि वल्ली' तिच्यासमोर धरत तिला विचारलं तशी तिचे डोळे एकदम चमकले.

'हे पुस्तक देत असशील तर म्हणशील तेवढा वेळ बसेन! पण का ग, एकदम वाचना॰ा तास का काढलास ?'

'अग .. समीरला शाळेतून घेऊन येते मी पटकन्.'

'मी येऊ ?'

'चल की ! मी म्हटलं, तुला उगीच पिळापीळ नको म्हणून वाचत बैस...'

'काही नाही ग .. चल मी येतेच...'

मैत्रिणीच्या हो–नाहीची वाट न बघता ती पटकन् चप्पल घालून घराबाहेर पडते सुद्धा ! आपल्या या अचानक पवित्र्याने मैत्रीण चक्रावलेली आहे हे तिच्या पूर्ण लक्षात येत. पण त्याचबरोबर मैत्रीण काही बोलणार नाही हेही तिला पूर्ण माहीत आहे.

शाळेच्या वाटेवर खरं तर मैत्रिणीची रास्त अपेक्षा असते की अनायासे ही आपल्या बरोबर आली आहे तर तिन गप्पा माराव्या. पण ही गप्प ! जशी पावलं मोजत चालावं तशी आपल्याच पावलांकडे पहात चाललेली.

शाळा जवळ येताच मैत्रीण म्हणते,

'अग, आपण जरा लौकरच आलेल्या दिसतोय बघ ! आता थांबावं लागणार—'

एवढ्यात पलिकडून आवाज येतो,

'का हो दाते, आज बऱ्याच दिवसानी ?'

मैत्रीण त्या बाईपुढे हात ओवाळते,

'आ हा ? मी रोज येतेय म्हटलं...'

'मी पण रोज येतेय ..'

पहाता पहाता तिच्या मैत्रिणीभोवती बायकाचा घोळका गोळा होतो. सगळ्या साधारण समवयस्क ! त्याची मुलं त्याच शाळेत . बहुधा एकाच वर्गात. त्यामुळेच ही आपोआपच एका बाजूला, एकटी टाकली जाते. त्याच तिला विशेष काहीच वाटत नाही. उलट आपल्याला अलिप्तपणे निरीक्षण करता येईल म्हणून बरच वाटतं.

'अग, पाय इतका दुखतोय माझा...' निळी साडी.

'कशान ग ?'

'भोवरा झालाय ! डॉक्टर म्हणे कापावा लागणार '

'काय ?.. पाय ?'

'पाय नाही बये... भोवरा !' पण मी म्हटल, जरा थांबा माझा नवरा गेलाय गावाला ! काही झालं तर पोर उघड्यावर पडतील...'

तिला हसू येतं केवढा भाबडेपणा ! भोवरा कापताना जशी काय ही मरणारच आहे...

'ए, आज का ग अशी दिसतेस ?'

'अशी म्हणजे ?'

'दमल्यासारखी !'

'मग दमायलाच होत ग ! घरची, बाहेरची कामं... परत पोरामागे धावाधाव.'

...तिच्या नकळतच ती सभाषणाचे तुकडे गोळा करतेय कुणी नोकरी करणाऱ्या, न करणाऱ्या, तरुण, प्रौढ, गरीब...श्रीमंत किती प्रकारच्या बायका आणि त्यांच्या तेवढ्या प्रकारच्या गप्पा !

वास्तविक शाळा अजून सुटायची आहे. या बाया आणि एकूणच हे सगळे पालक तसे वेळेच्या आधीच आले आहेत. दूरवर, फाटकापाशीच भय्याने त्याना थोपवून धरलंय ! कारण उघड आहे. वर्गात किंवा ग्राऊंडवर मुलं जेवढा दंगा करतायत त्याच्या किती तरी पट जास्त दंगा इथे पालक करतायत.

... एकटीच स्वत:शी विचार करत तिच अवलोकन चालू असतं आणि ती एकदम दचकते. कारण शाळा सुटल्याची घंटा एकदम जोरजोरात घणाणते. इतक्या वेळच्या रंगलेल्या गप्पा एकदम फिसकटतात. लहान मुलाना बाहेरचं काही दिसणारही नाही एवढ्या वेगान एकदम पालकांच्या झुडी आत शिरतात.

या सगळ्या गडबडीचं आणि पळापळीचं नवल करत ती आपली जागेवरच उभी. शाळा सुटल्यावर खरं तर मुलं बाहेर येणारच आहेत. मग या लोकांना एवढी घाई करयच काय कारण ?

...पण हळूहळू चालत ती एकेका वर्गापाशी जाते. तशी या सगळ्या गडबडीच कारण तिला पटकन कळत. सगळी पोर वर्गभर शिट्ट्या मारत, मारामाऱ्या करत फिरत होती आणि त्याच्या बाकावर त्याचे पालक बसले होते.

दारातल्याच बाकावर एक मुलगी कपाळावरच्या झिपऱ्या परत परत मागे, सारत, मान खाली घालून फळ्यावरचा घरचा अभ्यास लिहून घेत होती. नीट दिसत नसलं तर कोणाला तरी विचारत होती. तिच ते ढबोळ अक्षर ही कौतुकानं पहात होती.

एवढ्यात पलिकडून 'मावशी' करून मैत्रिणीचा मुलगा ओरडत आला.

'तू आईबरोबर आलीस ?'

'हो !'

'शाळा पाहिली माझी ?'

'हा !... छान आहे.... मोठी आहे ना ?'

ती हसते. एवढ्यात 'झिपरी' मान वर करते. टपोऱ्या डोळ्यानी तिच्याकडे पहाते. हातातल्या पेन्सिलीच्या टोकान त्याला ढोसत 'झिपरी' विचारते,

'ते पलीकडे काय लिहिलंय रे ?'

'उखळ !' तो सांगतो.

'तुला नाही का रे लिहायचा अभ्यास ?' ती विचारते

'ती बघ ना... आई लिहितेय तिकडे.'

त्यानं दाखवलेल्या दिशेनं ती पहाते. तर खरोखरच, इतर सर्व पालकाप्रमाणेच तिची मैत्रिणही अभ्यास उतरवून घेत असते. आसपासचं सगळं भान विसरून गेलेली असते.

न राहवून ती त्या झिपऱ्या सावरणाऱ्या पोरीकडे पहाते. तर पेन्सिलचं टोक तोंडात घालून ती स्वस्थ बसलेली.

'काय झाल ग ?'

'अ ! ... दिसतंच नाही. सगळे लोक मधे मधे येतायत...'

'मग तू कधी लिहशील ?'

'जाऊ दे सगळे गेल्यावर मग लिहीन ...

...त्या छोट्या मुलीकडे ती थोड्याशा कौतुकाने पहात रहाते. एरवी तिला मुलाचा उमाळा तसा कमीच. फक्त गोरी गोमटी; हसरी–खेळती मुलं मात्र तिला जरा आवडतात... पण तीही दुरूनच. तरीही आत्ता मात्र नकळत तिचा हात पुढे होतो.

'दे !... मी देऊ का तुला लिहून सगळा अभ्यास ?'

'तुम्ही ?... का ?'

'मग तुला तर दिसत नाहीये. तू अशी किती वेळ बसून राहशील ?'... त्यापेक्षा मी पटकन् देते ना लिहून...'

'नको !'... छोटीचा ठाम नकार. तिची ती निश्चयानं हलणारी मान पाहुन मात्र हिला थोडंसं आश्चर्य वाटतं आणि बराचसा रागही येतो.

'का ग ?... नको का ?'

छोटी एकदा आपल्या टपोऱ्या डोळ्यांनी तिच्याकडे रोखून पहाते. डोळ्यांवर येणारे केस दोन्ही हातांनी मागे सारून कानामागे अडकवते. स्वत:शी थोडा विचार करते. एकवार नाक वर ओढत तिला म्हणते,

'आज द्याल तुम्ही लिहून... पण उद्या ? उद्या तर माझा अभ्यास मलाच लिहायला हवा...'

'का ?... उद्या तुझी आई येईल ना...'

'अं हं !' झिपरीचे डोळे पाणावतात. माझी आई नाही कधी शाळेत येत! ती नोकरी करते ना...'

हिला नवीनच माहिती कळते. मनातून थोडंसं वाईट वाटतं. तिचं ते वाईट वाटणं चेहेऱ्यावर उमटतं की काय कोण जाणे... पण तिची समजूत घालावी तशा स्वरात ती छोटी मुलगी म्हणते,

'अहो, रोज मीच तर लिहून घेते अभ्यास. फार वेळ नाही लागत ! आणि मला आवडतं पण आपला आपण अभ्यास लिहून घ्यायला...'

...बोलता बोलता दोघींची नजरभेट होते. हिचं मन अगदी भरून येतं. तिला मनापासून वाटतं, त्या गोड पोरीला अगदी छातीशी घट्ट कवटाळावं. तिचे डोळ्यावर येणारे केस मागे सारावे. तिचा एक छान पापा घ्यावा... काही नाही तर निदान तिच्या गालाला तरी हलकेच हात लावावा.

पण ती यापैकी काहीच करत नाही.

मनात येणाऱ्या साध्या साध्या गोष्टीसुद्धा आपण कशा करू शकत नाही याचंच ती हताशपणे नवल करत रहाते. एक वेगळा अनुभव घेऊनही आपण कोरड्या रहातो याची खंत बाळगत रहाते.

—अपर्णा भावे

## पुस्तके

# थोर कीर्तनकाराच्या मुलाची कहाणी

नासिकला एक त्र्यंबकबुवा पाठक म्हणून थोर किर्तनकार होऊन गेले. यशवंत पाठक म्हणजे त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव त्र्यंबकबुवांच्या घराण्यात कुणीच किर्तनकार नव्हते. पण तरी त्यांना आपल्या मुलाने किर्तनकार व्हावेसे वाटे. यशवंत पाठकांनी तो मार्ग नाकारला. कारण किर्तनं करून पोट भरत नसतं, हा जिवंत अनुभव समोर होता म्हणून. त्र्यंबकबुवा तसे प्रख्यात किर्तनकार होते. सोनोपंत दांडेकर, श्री. रा. टिकेकर यांच्यासारखे थोर लोक त्र्यंबकबुवांना मानायचे. त्याची किर्तने अतिशय उत्तम असत. पण तरीही घरातली चूल मात्र रसरशीत कधी पेटलीच नाही. यशवंत पाठकांना जसं आठवत होतं तेव्हापासून, घरात दारिद्र्यच होतं.

विद्वान किर्तनकाराच्या घरातल्या दारिद्र्याची कहाणी म्हणजे 'अंगणातलं आभाळ.' आपल्या घराच्या अंगणाच्या पलीकडचं दिसत नसतानासुद्धा यशवंत पाठकांचं लक्ष आभाळाकडे लागलेलं होतं. त्या रंगीबेरंगी आभाळाकडे बघत बघत त्यांनी दिवस रेटले अन् एक दिवस आला, ते प्राध्यापक झाले. पी. एचडी. मिळवली. घरातलं दारिद्र्य हटलं. आभाळ हातात आलं.

पिंपळनेरसारखे खेडे सोडून देऊन नासिकसारख्या शहरात त्यांच्या आईने छोटा संसार दोन खोल्यात सुरू केला, तो केवळ मुलांना नीट शिक्षण मिळावे म्हणून. त्यासाठी त्या माउलीने अपार कष्ट सोसले. नासिकसारखे तीर्थक्षेत्र असूनही (व प्रत्यक्ष गोदाकाठी घर असूनही) या ब्राह्मण कुटुंबाने फार हालात दिवस काढले. त्र्यंबकबुवा महिनोन् महिने किर्तनं करीत गावोगाव हिंडत अन् त्यांची पत्नी दोन मुलं अन् एक मुलगी यांचा सांभाळ करीत. त्यांच्या शिक्षणाची काळजी करीत पतीची वाट पहात रहात असे. या काळातलं चित्रण यशवंत पाठकांनी अत्यंत हृद्यपणे केलं आहे. ते भिक्षुकी शिकले होते. कॉलेजात जात असताना कुठे ब्राह्मणभोजनासाठी किंवा भिक्षुकीसाठी सोवळं नेसून जाताना लाज वाटे. पण तरी आईचा शब्द त्यांनी कधी खाली पडू दिला नाही. देवळात, श्रीमंत शेठकडे, यजमानांकडे किंवा गोदाकाठी मिळणारा प्रसाद घरी आणला तर घरातले सगळे त्याकडे डोळे लावून वाट पहात असत. त्यामुळेच त्यांना पी. एचडी. मिळली तेव्हा माधुकरी मागणारा, एकादण्या करणारा, सोवळं नेसून अनवाणी भरदुपारी जेवायला जाणारा ब्राह्मणाचा पोर डॉक्टर झाला, याचा हर्ष झाला.

अशा लक्ष्मी–तिरस्कृत ब्राह्मणाचं वर्णन वाचत असताना, दलितांच्या आत्मचरित्र कथनांची आठवण येते. बहुसंख्य दलितांना दारिद्र्याचे भयाण चटके सोसायला लागले होते. जवळ जवळ सर्व दलित–आत्मकथनकारांना शिक्षण मिळवण्यासाठी खूप झगडा करावा लागलेला आहे. पाठकांच्या व या दलितांच्या परिस्थितीत फरक एवढाच की दलितांना दारिद्र्यापेक्षा भयानक अशा अस्पृश्यतेच्या खाईतून जावं लागलं आहे. त्याउलट पाठकांना ब्राह्मण म्हणून व त्र्यंबकबुवांचे चिरंजीव म्हणून खूप मान सतत मिळत गेला आहे. नाही म्हणायला, त्यांच्या स्वाभिमानाला टोचणारे असे काही प्रसंग घडले. ब्राह्मण–भोजनाच्या पंगतीमध्ये इतर ब्राह्मणांकडून होणारी उपेक्षा, सहकारी भिक्षुकांचा दुस्वास, वाड्यातल्या शेजाऱ्यांचं जळफळणं. पण ते सर्व तोंडी लावण्यापुरतंच.

यशवंत पाठकांचं अंगण इतकं छोटं होतं की, त्यात त्यांच्या लहानपणी चालू असलेल्या सामाजिक किंवा राजकीय चळवळींचं थोडंसुद्धा प्रतिबिंब उमटलेलं नाही. त्यांची दृष्टी अंगणाबाहेर कधी गेलीच नाही, यात नवल नाही. किर्तनं करून पोट भरणार नाही, म्हणून पात्रता, विद्वत्ता, कला अंगात असूनही त्यांनी प्राध्यापकी पत्करली. पण पी. एचडी. करताना मात्र नेमकी किर्तनकलाच मदतीला आली. किर्तनकलेवरच्या अभ्यासासाठी पाठकांनी अनेक किर्तन

काराच्या मुलाखती घेतल्या. अनेक जुने संदर्भ धुडाळले अन् त्यामुळे हे किर्तनाचं सगळ जग त्याच्यासमोर उघड झाल. इतर सर्वसामान्य व्यवसायाप्रमाणेच याही व्यवसायात स्पर्धा, हेवेदावे, मत्सर, पाण्यात पहाणे, शत्रुत्व, पाय खेचणे, पाणउतारा करणे सगळे काही आहे अनेक बुवाच्या हातात पाच पाच सोन्याच्या अगठ्या आहेत. अनेकानी आपापले मठ स्थापन केले आहेत. पण सध्याकाळी हातात झाजा घेऊन उभं राहिलं की व्यवसायाचा भाग म्हणून लोकाना ब्रह्मज्ञान किंवा भक्तियोग यांचा उपदेश करताना पाहून लेखकाला आणि वाचकालासुद्धा गमत वाटते.

साधारणपणे एस. एस. सी. ते पीएच डी. चं संशोधन एवढ्या काळातली ही कथा वर्णन केली आहे याच काळात लहानपणाचे घरातले सस्कार, तारुण्य सुलभ विचार, बाहेरच्या वातावरणाची जाणीव यांचे सघर्ष सुरू होतात. पण पाठकाना हा सघर्ष चितारण नीट जमलेलं नाही. शिक्षणाकरिता पैसे जमवण, अभ्यासाकरता वेळ मिळवण आणि भिक्षुकीच्या कामाच्या लाजेवर मात करणं याचं वर्णन करताना नैसर्गिक भावनाविषयी लिहायचं बहुधा जाणूनबुजून टाळल आहे. पण एका ब्राह्मण किर्तनकाराच्या घरातले सस्कार किती भक्कम असतात, याचा शोध घेणं, सुरस झालं असतं. पाठकांच्या एका घीला नावाच्या मैत्रीसंबधातले, त्याच्या मनातले विचार मात्र कुठेच दिलेले नाहीत.

पाठकाचा ब्राह्मण म्हणून ब्राह्मणेतराशी झालेला सपर्क व सघर्ष याचाही कुठे उल्लेख नाही. फक्त नाशिकच्या गंगेकाठी गंगेच्या कावडी दलित किंवा इतरजणांना पूजा करून उचलून देण्याबद्दलचा उल्लेख आहे. असे सामाजिक संदर्भ व जागृत जाणीव होण्यापूर्वीच त्यांनी ही इतर ब्राह्मणाची नाराजी पत्करून कृती केली असली तरी लगेच गंगास्नान करून शुद्धीही करून घेतली. यानतर परत त्याच्या विश्वात असा सबंध आल्याचा उल्लेख नाही. तसा खरोखरच आला नसेल तर त्यांचाही नाईलाज असेल.

त्र्यबकबुवाना आपल्या चंद्रमौळी घराची भोक दिसत नव्हती, अस थोडंच आहे ? पण तरी त्यांना शेवटपर्यंत वाटत राहिलं की नानाने (लेखकाने) किर्तनकारच व्हावं. त्यानी स्वत स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. साने गुरुजीसारख्या अनेकाचा सहवास त्याना लाभला होता. तुरुगाच्या वाऱ्या कैक वेळा केल्या एका मिलमधे त्याना चांगल्या पगाराची नोकरीपण होती. तरी त्यानी या सर्वांचा त्याग करून किर्तनकार व्हायचं ठरवल. त्यासाठी पटवर्धनबुवाच शिष्यत्व पत्करल जाणूनबुजून डोळसपणे हा पेशा पत्करला. खरं तर त्र्यबकबुवा राष्ट्रीय किर्तनकारच व्हायचे. सुरुवातीला त्यानी तशी राष्ट्रीय किर्तने केली सुद्धा. पण नतर पुराणे-आख्याने, ज्ञानेश्वरी, भागवत इत्यादी" आधार घेत घेत पारंपारिक नारदीय किर्तनच करू लागले. काळ बदलला होता. राष्ट्रीय किर्तनाची गरज वाटेनाशी झाली होती.

## बोलके भेदक प्रसंग

नानाला कॉलेजात घालताना देखील त्याच्या मनात हेच होतं, की बी. ए. होऊन नाना किर्तनकार झाला तर किर्तनाची प्रतिष्ठा वाढेल. पण नानाच्या मनात दुसरेच विचार येत होते. बदलत्या काळाच भान त्र्यबकरावाना राहिलं नसलं तरी त्यांच्या पत्नीला व मुलांना होतंच. सोनोपंत दाडेकरांचासुद्धा त्र्यबकबुवाना पाठिंबा होता. पण नाना (म्हणजे लेखक) बी. ए. च्या शेवटच्या वर्षात असतानाच त्र्यंबकबुवांना पक्षाघाताचा झटका आला अन् घरच खाली बसलं. पुन्हा कधीही बुवा झाजा धरून उभे राहिले नाहीत बुवा कायमचे परावलबी झाले.

माणसाच्या सत्वाची व तत्वाची परीक्षा संकटात होते म्हणतात बुवा पक्षाघाताने कायम घरातच राहिल्याने, त्याचा त्यांच्या मनावरचा सयम, ताबा सुटला. मन कडवट झालं एक मुलगा प्राध्यापक झाला. पी. एच्. डी. झाला. दुसरा इजिनियर झाला तरी त्याना त्याचा आनद झाला नाही. इतराचा डोळा चुकवून ते हॉटेलात जाऊन जिलब्या खाऊ लागले. पत्नीवर सतत ओरडू लागले. लोकाना आयुष्यभर अध्यात्म सांगितले; पण शेवटी मरताना सामान्य माणूस होऊन मेले. त्यांच्या आयुष्यात मोह काय कमी आले असतील ? रेल्वे स्टेशनवर नानाच्या आग्रहावरून (पण तरी तरी मनातनं हवा—हवासा वाटताना) त्यानी वडा खाल्ला तेव्हा त्याना विलक्षण अपराध्यासारखं वाटलं होतं. त्या उलट त्यांच्या पत्नीने मुलाना मुद्दाम हॉटेलात डोसे खायला पाठवल. बुवाच्या खाजगी जीवनातल्या गोष्टी वाचताना बुवाच्या मधलं 'माणूस' पण लख्ख उजेडात येतं.

सपूर्ण पुस्तकाचा विचार केला तर, सुरुवातीला जी लेखनाची लय साधलेली आहे, ती शेवटी बिघडून गेल्याचं जाणवतं. शेवटही घाईघाईने केल्याप्रमाणे वागतो. कालक्रमही त्यामुळे उलटा पालटा झालाय. लहानपणच्या अनेक आठवणी, बालपणाच्या (Nostalgia) तद्रीत लिहिल्याप्रमाणे वाटतात. त्यामानाने (आणि त्यामुळेच) कॉलेजातल्या किंवा सशोधनाच्या आठवणी जागरुकपणे केल्यासारख्या वाटतात नामवंत किर्तनकाराचे मातीचे पाय दिसतात, त्यावेळचे प्रसग भाष्याच्या अभावामुळे अधिक बोलके, सखोल व भेदक वाटतात.

यशवंत पाठक हे प्राध्यापक आहेत. पण किर्तनकाराचे चिरंजीव असल्याने असेल बहुधा, पण शेवटचा काही भाग सोडला तर सर्व पुस्तक फार पाल्हाळीक झालय्. कमीतकमी शब्दात जास्तीत जास्त व्यक्त करण्याऐवजी, उगाच भाराभार तपशील भरून त्या त्या प्रकरणात रसहानी करून ठेवली आहे. कोणीतरी त्याचं नीट संपादन केलं तर पुस्तकाची खोली आणखी वाढेल. किर्तनकारांचं व्यक्तिगत कौटुंबिक आयुष्य, दारिद्र्य, भिक्षुकी व्यवसाय यांच्या पार्श्वभूमिवरच लेखकाचं शिक्षण याचंच प्रामुख्याने चित्रण करायच लेखकान ठरवलेलं दिसतंय. पण त्यामुळे आणखी एक दोन गोष्टींची उणीव भासते. लेखकाची धाकटी बहीण व भाऊ यांचं लेखकाला निरीक्षण करायची संधी मिळाली होती. बड्या (धाकटा भाऊ) हा सतत शेंबडा, काळासावळा, अर्ध्या चड्डीत दंगामस्ती करणारा, सगळ्याच्या हातचा मार खाणारा असा दिसतो. पण प्रत्यक्षात तोच बड्या पुढे इजिनियर होतो. पुस्तकात बड्याविषयी एवढंच सांगितलय तरी तो बड्या म्हणजे प्रत्यक्षात आजचा नव्या दमाचा प्रसिद्ध कवी म्हणजे किशोर पाठक आहे. याचा उल्लेख कटाक्षाने टाळलाय. असं करण्याची जरूरी नव्हती. किर्तनकाराची मुलं म्हणून दोघांनी त्यांची परंपरा व पेशा नाकारला तरी संस्कार होतातच. त्याचा परिणाम म्हणूनच की काय स्वत: लेखक—मराठीचे प्राध्यापक व साहित्यिक झाले

आणि बंडचा कवी झाला. या संस्काराला नाकारता कसं येणार ?

शेवटी मुखपृष्ठाविषयी सांगितलंच पाहिजे. वासंती मुजुमदाराचं हे रंगीत मुखपृष्ठ वेधक, सूचक अन् आकर्षक तर आहेच. पण खूपच अर्थपूर्ण आहे. थोडसं गूढपण आहे. (नवचित्राप्रमाणे थोडसं दुर्बोधही आहे.) मात्र पुस्तकातल्या लेखनशैलीशी थोडफार विसंगत आहे. मुखपृष्ठावरून कोणी कल्पना करू लागलं की हे पुस्तक असेच गूढ, सूचक, रुपकात्मक इ. इ. असेल तर त्याचा गैरसमज होईल. पुस्तक सरळ, अनलकृत शैलीतलं, अन् पाल्हाळीक असलं तरी खूप वाचनीय आहे.

— विश्राम राजहंस

अंगणातील आभाळ
डॉ. यशवंत पाठक
ग्रंथाली प्रकाशन.

---

## वकिली व्यवसायाचे पोस्टमार्टेम

गेल्या काही वर्षात स्वतःच्या व्यवसायाचे पोस्टमार्टेम करीत आत्मचरित्रात्मक लेखन करण्याची पद्धती मराठी साहित्यात आली आहे. कै. अरुण लिमये यांनी लिहिलेले क्लोरोफॉर्म असो की नव्याने बाजारात आलेले ' शातारामा '. स्वतःच्या व्यवसायाचे खरे मूल्यमापन करताना या लेखकांनी त्यातील गुणदोष माडले आहेत. वकीली व्यवसायाचे मूल्यमापन करणारे श्री. रमण देशपाडे यांची ' उलट तपासणी ' ही कादंबरी याच प्रकारची आहे.

मराठवाड्यासारख्या मागास भागातून शहरात आलेल्या ध्येयवादी तरुण वकीलाची होणारी मानसिक होरपळ श्री. देशपांडे यांनी ' उलट तपासणी 'त चित्रित केली आहे. न्याय मिळविण्यासाठी आलेल्या अशिक्षित, ग्रामीण आर्थिक दृष्ट्या दुर्बल अशा व्यक्तीची ओढाताण कशी होते हे दाखवितांना वकीलामार्फत होणारी अशिलांची फसवणूक, लुबाडणूकही त्यांनी तितक्याच स्पष्टपणे दाखविली आहे स्वतः वकील असून अशा प्रकारचे सत्य ( किंबहुना उघड सत्य ) लिहिण्याचे धाडस श्री. देशपाडे यांनी दाखविले याबाबत त्याची प्रशंसा करायला हवी. मात्र कादंबरी लिहिताना मुख्यपात्र असलेली ॲड. मिलींद मोटे याची व्यक्तीरेखा त्यानी स्वतःला डोळ्यासमोर ठेऊन रेखाटली आहे. त्यामुळे ती अनावश्यक अशी ' इनोसट ' झाली आहे. ग्रामीण भागातून कायद्यापर्यंत शिक्षण घेतलेला तरुण ध्येयवादी असू शकतो पण देशपाडे यानी रेखाटलेल्या मोटेइतका वास्तवतेची जाण नसणारा कधीच नसतो. कायद्याचे शिक्षण घेत असतानाच त्याला वकीली पेशातील गुणदोष माहिती होतात. ' खऱ्याचे खोटे व खोटयाचे खरे ' करून दाखविण्यासाठी वकीलानी कायद्याचा कसा कीस पाडला याची उदाहरणे अभ्यासाला असलेल्या खटल्यांच्याद्वारे त्याला समजलेली असतात. त्यामुळे ॲडव्होकेट मोटेमधली निष्पापता खटकते.

मुख्य व्यक्तिरेखा असलेले मिलीद मोटे वकिलीची सनद घेतल्यावरही कायदा व न्यायसंस्थेबाबत, एवढे अनभिज्ञ कसे असू शकतील याचा विचार कादबरी लिहिताना लेखकाने केला नाही. त्यामुळे लिखाणात एकांगीपणा आला आहे. कादंबरीतील ' रावसाहेब ' ही व्यक्तिरेखा मात्र त्यानी तंतोतत वर्णन केली आहे. कादंबरी वाचताना न्यायालयात वकिलाच्या व कारकुनाच्या मागेपुढे वावरणारे वकिलाचेच ' मोकील ' डोळ्यासमोर येतात. त्याच सस्थेत वर्षानुवर्षे कारकुनी करणारे ' रावसाहेब ' हेच ॲड. मोटेंचे व्यावसायिक गुरू आहेत. कोर्टदरबारी रूढ असलेली पद्धत, किचकट भाषा, भावनेपेक्षा व्यवहार श्रेष्ठ हे तत्त्व बाळगणारे ' रावसाहेब ' रेखाटताना लेखकाने न्यायसस्थेतला भ्रष्टाचार आडमार्गाने दाखवून दिला आहे.

तारीख वाढविण्यासाठी किंवा केस दाखल करण्यासाठी न्यायालयीन कर्मचाऱ्याना पसे द्यावे लागतात हे माहित नसणारा ॲड. मोटेसारखा वकील सापडणे कठीण आहे. केस जिंकण्यासाठी ' वजन ' वापरून ' वेल बिगिनिग इज हाफ डन ! ' हे तत्त्व स्वीकारताना गर्भगळीत होणारा हा वकील कादंबरीच्या शेवटी तत्त्वांपासून दूर गेलेला आहे. तसाच तो व्यवसायापासून दूर गेला आहे. कारण अखेरीस (पान १२०) हा वकिलाने म्हटले आहे की, विनयभंग, बलात्कार, हुंडा हत्येत माणूस निष्पाप असला तरी मी या केसेस स्वीकारत नाही. एक ध्येयवादी, तत्त्वनिष्ठ असा तरुण वकील निष्पाप माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी लढणे नाकारतो. याचा अर्थ तो एकतर तत्त्वनिष्ठतेचा आव आणणार असतो. किंवा न्याय मिळवून देण्यास अपात्र असतो.

पोटासाठी तत्त्व व व्यवहार यांच्यात समझौता केला असे म्हणणे ठीक असले तरी वरील प्रकारची विसगती ही लेखकाच्या विचारातील अज्ञान व्यक्त करते

जिद्द आणि महत्त्वाकांक्षा असणारा वकील न्यायालयातील वास्तवतेला सामोरा जाताना कधी भावनावश होतो व्यावसायिक जाण असणारा पितांबर भेटेपर्यंत त्याला व्यवहार आणि भावना यात फारकत करता येत नाही. तोच वकील पिताबरच्या सहवासात बदलतो आणि एक यशस्वी विधीज्ञ बनतो. या काळातील मुख्य व्यक्तिरेखा असलेल्या पात्राची भावनिक अवस्था, मानसिक ओढाताण यांच रेखाटन मात्र श्री. देशपांडे यानी उत्कृष्ट केलं आहे.

डोक्यातील आदर्शतेच्या कल्पना आणि दावे जिंकण्यासाठी किंवा त्यातून पैसे कमविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडी यातून सद्यस्थितीतील न्याय संस्थेतील गैरव्यवहारावर त्यानी ताशेरे ओढले आहेत. आदर्शवाद व कठोरवास्तव याच्या संघर्षातून निर्माण झालेली जीवघेणी बेचैनी व अस्वस्थता रेखाटण्यात मात्र श्री. देशपांडे यांना यश आले आहे कथाकथन पद्धतीने केलेले लिखाण पुढे काय घडते याबाबत वाचकाची उत्सुकता शेवटपर्यंत टिकवून ठेवते पण व्यवसायासाठी तडजोड केली म्हणताच वाचकाचा रसभग होतो.

मित्राला व घरच्या मंडळींना लिहिलेली पत्रे मनातली अस्वस्थता व्यक्त करीत असली, तरी मूळ व्यक्तिरेखेच्या स्वभावाशी ती नीट जुळत नाहीत. स्वतःच्या व्यवसायाचे ' पोस्टमार्टेमच ' करायचे असे ठरवूनच लिहिलेली ' उलट तपासणी ' ही रमण देशपांडे यांची कादंबरी न्यायालय व न्यायसंस्था यांच्या संदर्भात, सामान्य माणसासमोर प्रश्नांची मालिका उभी करणारी आहे. आत्मानुभवातून लेखन करताना लिखाणात अनेक चुका राहिल्या असल्या तरी कथासूत्रातील सुसूत्रता कादबरी वाचावयास लावते

— प्रदीप सदावर्ते

उलट तपासणी
रमण देशपाडे
सुपर्ण प्रकाशन,
किंमत ३० रुपये

## फिनिक्स लायब्ररी

## HEAVEN'S BREATH

( A Natural History of the wind )
By LYALL WATSON.
Coronet Books, Pages 384

वाऱ्याचा इतिहास आणि तो सुद्धा नॅचरल. मग वाऱ्याचा आर्टिफिशिअल इतिहास कोणता असा विचार मला चाटून गेला. श्री. दीक्षितांच्या 'इटरनॅशनल'मध्ये जेव्हा हे पुस्तक पाहिलं तेव्हा बरच कुतुलह वाटल. लेखकाच नाव बघून तर ते विकतच घेऊन टाकलं !

वाऱ्यामध्ये काय काय रहस्य दडलेलं आहे ते या पुस्तकात वाचून थक्क झालो. पृथ्वीच्या वरती जे ओझोन वायूचं आवरण आहे त्याची चादर बनवून पृथ्वीवर अंथरली तर तिची जाडी फक्त ३ मिलिमिटर होईल ! या मखमलीच्या पडद्यामुळेच आपण जिवंत आहोत. प्रदूषणाच्यापुढे, अतीद्रुतगतीने उडणाऱ्या विमानापुढे, एअरॉसॉल कॅन्सपुढे, ग्रीन हाऊस इफेक्टमुळे हा पडदा फाटणार की नाही हा प्रश्न नाही. प्रश्न असा आहे की कधी फाटणार. पृथ्वीचे खडकाळ प्रदेश, क्रोधी ज्वालामुखी, प्रचंड महासागर, रस्ते कागदाप्रमाणे फाडणारे व R. C. C. चे पत्त्याचे बंगले करून टाकणारे भूकंप वाऱ्याला चक्रावून सोडणारी बॉंबर विमाने, अनेक प्रकारचे विध्वसक पूर आणि माणसाची विविध दुःखे– हे सर्व सहजगतीने पचवणारी वसुंधरा. तिच्या रक्षणासाठी हा एवढाच मखमलीचा पडदा ?

वारा काय करीत नाही ? हायवेवर तुम्ही दुचाकीवर गेलात तर तो तुमचा चेहरा कुरवाळतो. वाऱ्याला शिल्पकला येते व तो अनेक प्रकारची कोरीव कामे करतो. वारा प्रचंड लाटा निर्माण करतो व कागदाच्या एका चिटोऱ्याला अलगद अधांतरी खेळवतो. लॉ की ( Low Key ) नॉटमध्ये व्हायोलिनवर अगदी हळूहळू काठी कशी फिरते तसंच अगदी. वाऱ्याने तर एकदा संपूर्ण आगगाडीच उचलून फेकून दिली होती. वाऱ्याच्या कलानुसार युद्धाचे प्लॅन्स आखले जातात. दार बंद असताना फटीतून येणारा जोराचा वारा कसा सू . सू... करतो ते आपण पावसाळ्यात अनुभवतो. वाऱ्याशी भांडणारे लोक ! ( Sorry, तो मी नव्हेच ! )

बाकी आपण 'वारेमाप, वाऱ्याचे' घोडे, ( गलबत ) 'वाऱ्यावरशी', 'वारापाणी' असे अनेक प्रकारचे शब्दप्रयोग करतो. इंग्रजीमध्य तर wind पासून तयार झालेले शब्दप्रयोग डझनांनी आहेत.

वाऱ्यावरचं हे पुस्तक बघून आश्चर्य तर वाटलंच. परंतु या पुस्तकाच्या शेवटी, वाऱ्यावरच्या ५३९ पुस्तकांची एक यादी आहे. बहुताशी ही पुस्तके हवामानशास्त्र as a study या विषयावर नाहीत. या यादीत Desmond Bagley चे Wyatt's Hurricane यासारखी नावं आहेत. साहित्य आणि वारा याची चर्चा पण या पुस्तकात आहे.

वाऱ्याच्या अदृश्यतेमुळे त्याला आणखीन एक रहस्यमय वलय प्राप्त होतं ! प्रेम, राजकारण, द्वेष याचं सांगोपांग विवेचन करणं जसं अवघड असतं, तसंच वाऱ्याचं. या गोष्टींकडे दुर्लक्ष करणं अशक्य आहे. काही विषयात सत्य, असत्य, अर्धसत्य, आख्यायिका यांचं बेमालूम मिश्रण होत. त्यापैकीच हे विषय आहेत.

इंग्रजीमधला एक वाक्प्रचार बहुतेक लोकांना माहीत असतो. Seeing is believing. आपला जेव्हा विश्वास बसत नाही तेव्हा आपण सहज म्हणून जातो, 'दाखवा बघू !' आपल्या सर्व इंद्रियात डोळा हे फौजदारी करणारे इंद्रिय आहे. प्रेम जसं दिसत नाही तसा वाराही दिसत नाही. ज्या ज्या गोष्टी आपल्याला दिसत नाही त्या त्या गोष्टींबद्दल आख्यायिका अनेक असतात. म्हणून तर आपल्याला या विषयावर वाचावस वाटतं.

हवामान, चक्रीवादळ, टार्नेडो, टायफून, मानवाच वर्तन, स्वास्थ्य वगैरे सर्व विषय या पुस्तकात घेतले आहे.

सर्व साहित्यात वादळाची वर्णने असतात. माझ्या स्मरणशक्तीत कोरून राहिले आहे ते मात्र स्टीफन झ्वाइगच 'Beware of Pity' मधल वादळाच वर्णन. झपाटल्यागत आपण पानामागे पान उलटत राहतो आणि खुद्द आपण ते चक्रीवादळ अनुभवतो की काय असे आपल्याला वाटते. डॅसमॉंड बॅग्लीचं Wyatt's Hurricane हे पण या विषयावरील वाचण्यासारखे पुस्तक आहे. थॉमस हार्डीने तर वाऱ्याबद्दल एक आख्यायिकाच निर्माण केली आहे. वाऱ्याच्या सळसळण्यावरून हा माणूस प्रत्येक झाड ओळखत असे ! ग्रामीण लॅंडस्कॅप तर हार्डी अगदी चित्राप्रमाणे शब्दात टिपत असे. शब्दांचं सामर्थ्य चित्रापेक्षाही अधिक असतं. स्टीफन झ्वाइगच्या वादळाचं कुणी आर्टिस्टनी चित्रं काढल तर चारसहा सेकदात बघून ते आपण बाजूला ठेऊन देऊ. परतु ह्याच वादळाचं वर्णन शब्दात केल्यामुळे आपण ते अक्षरशः अनुभवतो. (यावरून पुस्तकाला किती महत्त्व दिले पाहिजे हे सागायला नको )

शेक्सपीयरच तर काय विचारायलाच नको. हा एक असा Elizabethan होता की आपला ठसा त्याने साहित्यावर तर उमटवलाच, पण हवामान किंवा वारा यावरही त्यान आपला इम्प्रिन्ट मारला ! त्याला वारा


### NEW TITLES

1) **Citizen Hughes**
(Biography) Michael Drosnin
2) **City of Joy**
( a hymn to Calcutta ) By Dominiq Lapierre
3) **Confessions of an Advertising Man**
(Memoirs) David Ogilvy
4) **A Man**
( A Biographical Novel ) By Oriana Fallaci ( World's greatest interviewer)
5) **Letter to a Child Never Born**
(Musings of a mother who decides to abort ) Oriana Fallaci
6) **From Reveille to Retreat**
By ; Gen. S. P. P. Thorat
(Autobiography )

At Phoenix getting the book of your choice is not a game of dice !

**The Phoenix Library**
727, Sadashiv Peth,
Pune – 411 030

किंवा वादळ यांच्या अनेक दंतकथा माहीत होत्या. राजा चौथा हेन्री जेव्हा युद्धाची वाट पहात असतो ( पहिल्या अंकाच्या शेवटी ) त्यावेळेला येणाऱ्या हिसेबद्दल तो प्रेक्षकांना कसा तयार करतो –

...The southern wind
Doth play the trumpet to his purposes.
And by his hollow whistling in the leaves.
Foretells a tempest and a blustering day.

(इथे थोडं digression करतो. पूर्वी मला शेक्सपीयर आवडायचा नाही. पण कोटेशनच्या पुस्तकात त्याच्या काही ओळी पाहिल्या आणि एकेका वाक्यात किती प्रगल्भ अर्थ साचून राहिला आहे ते कळले. There are more things in heaven and earth Horatio, than are dreamt of in your philosophy वगैरे. पुणे विद्यापीठाने असल्या माणसाला हाकलून देण्याचा विचार करावा ही मोठी नामुष्कीची गोष्ट वाटते. )

समुद्रातील वादळ हे शेक्सपीयर कथानकाला नाटयपूर्ण कलाटणी देण्यात वापरतो. ही कलाटणी टेम्पेस्ट, ऑथ्येलो व पेरिक्लस या नाटकात आहे. ' Go swifter than the wind. ' ' Thou shall be as free as the mountain winds ' वगैरे डझनवारी वाक्यात त्याने वारा साहित्यात आणला आहे.

मी संभाजी पुलावरून रोज पायी येतो. (व्यायामासाठी ! ) त्यावेळेला मला कधी कधी Lorca आठवतो–


The girl of beautiful face goes
gathering olives.
The wind, that suitor of towers,
grasps her round the waist !

लकडीपुलावर पदर उडतात तेव्हा वाऱ्याने बाईला कमरेला धरलं असंच थोडसं वाटतं. पण बहुतेक बायका जाड असतात. त्यामुळे...

ट्रेड विन्डस विषयी तर प्रत्येकाने भूगोलात वाचलेच असेल. असला शुष्क विषय इथे लिहिण्याजोगा नाही.

तसं हे पुस्तक ' हेवी रिडींग ' या प्रकारात मोडणारं आहे. पण जिथे जिथे हेवी आहे तेवढा भाग वगळला तर निश्चित वाचनीय आहे.

– जे. एन् पोंडा



## दि. बा. मोकाशी स्मृती निधी

सप्रेम नमस्कार

मराठी वाङ्मयात श्री. दि. बा. मोकाशी यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांच्या साहित्याकडे पुढील पिढयांचे लक्ष वेधले जाईल अशा रीतीने त्यांच्या नावाने एखादी पारितोषिक योजना आखण्याचे आम्ही त्यांच्या काही मित्रांनी ठरविले आहे. कै. मोकाशी यांच्या साहित्याचे अनेक चहाते आहेत व त्यांचा मित्रपरिवारही विपुल आहे. या सर्वांच्या साहाय्याने किमान रुपये दहा हजारांचा निधी जमवावा असा आमचा संकल्प आहे.

या निवेदनाद्वारे आम्ही अशी विनंती करीत आहोत की कै. मोकाशी यांच्या चहात्यांनी प्रत्येकी किमान रुपये शंभर या निधीसाठी देऊन या कामाला हातभार लावावा.

हा निधी गोळा करून त्याचा विनियोग महाराष्ट्र साहित्य परिषदेमार्फत करावा अशी कल्पना आहे. या निधीच्या व्याजातून प्रतिवर्षी दि. बा. मोकाशी यांच्या नावे ललित साहित्यकृतीला पारितोषिक द्यावयाचे आहे.

येत्या ३० जून १९८६ रोजी श्री. दि. बा. मोकाशी यांच्या निधनाला ५ वर्षे पूर्ण होतील. तत्पूर्वी ही योजना कार्यान्वित करावी असा आमचा प्रयत्न आहे.


आपण सहकार्य द्यावे ही विनंती.

आपला निधी शक्यतो डिमांड ड्राफ्ट वा चेकने पाठवावा.

चेक, ड्राफ्ट वि. ग. कानिटकर यांच्या नावे काढावा. या निधीसाठी स्वतंत्र खाते उघडलेले आहे.

निधी पाठवावयाचा पत्ता :–
वि. ग. कानिटकर
१३६२ सदाशिव पेठ, फाटक वाडा, पुणे ३०
दूरध्वनी : ४४७७३४
४४१००४

आपले
वि. ग. कानिटकर, गजानन क्षीरसागर
( मोकाशी मित्र मंडळाकरिता )



# देहबाह्य अवस्थेचा अनुभव

सा.माणूस

प्रा. व. वि. अकोलकर

दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या घटनांची कसोशीपूर्वक नोंद, त्यांची कार्य-कारणभावात्मक मीमांसा, शक्यतितका प्रयोगतंत्राचा अवलंब, ही विज्ञानाची पद्धती होय. अ-सामान्य अथवा परा-सामान्य ( Paranormal) घटनांच्या बाबतीत तिचा अवलंब १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात होऊ लागला. मानवाचा दृश्य देह म्हणजेच त्याचे संपूर्ण स्वरूप असते काय, देहांतानंतर मानवाच्या व्यक्तित्वातील सारेच विलयास न जाता 'काहीतरी' अस्तित्वात रहाते काय, इत्यादी प्रश्नांच्या चिंतनातून प्राचीन तत्त्ववेत्त्यांनी आपापली 'दर्शने' प्रस्तुत केली होती. त्या प्रश्नांचा उहापोह वैज्ञानिक पद्धतीचा कमी अधिक अवलंब करून गेल्या शतकात करण्यात येऊ लागला.

'माध्यमांच्या' (mediums) उपस्थित घडलेले भौतिक स्वरूपाचे प्रकार, तसेच माध्यमांकरवी आलेले तथाकथित 'मृतात्म्यांचे संदेश' अभ्यासण्यात आले आहेत. पुष्कळदा ते संदेश म्हणजे माध्यम व्यक्तीला कोणत्यातरी प्रकारे कळलेली माहिती असते, किंवा कल्पना लढवून सांगितलेल्या गोष्टी असतात. तथापि, काही 'संदेशां'च्या बाबतीत एकाद्या दिवंगत व्यक्तीची खास शैली, निकड (urgency) प्रयोजनगर्भता, हयात व्यक्तींना माहित नसलेल्या गोष्टी, इत्यादी वैशिष्ट्ये आढळतात. त्यामुळे ते खरोखरच मृतात्म्याकडून आलेले असण्याची शक्यता बाजूस सारता येत नाही असे मत सुविख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ गार्डनर मर्फी व नामवंत तत्त्वचिंतक डॉ. सी. डी. ब्रॉड तसेच एच. एच. प्राइस यांनी व्यक्त केले आहे.

मृत व्यक्तींची 'भुते' तसेच एका स्थळी विद्यमान असलेल्या व्यक्तीचे अन्य स्थळी दर्शन हे प्रकार पुष्कळदा अवस्तुभ्रमात्मक अथवा भास (hallucinations) असतात. परंतु दोनतीन जणांना एकाचवेळी एकाच ठिकाणी असा अनुभव आल्याचीही उदाहरणे आहेत. त्यामुळे मृत्यूनंतरही अस्तित्वात राहू शकणारे काहीतरी माणसाच्या ठिकाणी असू शकेल काय, हा प्रश्न अद्यापही कायम आहे.

पुनर्जन्मसूचक अशा नानाविध केसेसनीही साक्षेपी अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतलेले आहे. स्वतःच्या पूर्वजन्मीचे म्हणून नाव, गाव, कुटुंब, जीवनातील प्रसंग सांगणारी बालके व त्यांच्या विधानांचा मिळालेला पडताळा; बालकाच्या स्वभाववैशिष्ट्यांशी, कौशल्यांशी, आवडी-निवडीशी, क्वचित जन्मखुणांशी वगैरेंचा मेळ 'पूर्वजन्मीच्या त्या' व्यक्तीच्या स्वभावादि वैशिष्ट्यांशी व क्वचित तिच्या मृत्यू-संबंधीच्या तपशिलाशी बसण्याची उहाहरणे आहेत. बालकाच्या तोंडून त्याला संपूर्णपणे वा अपरिचित अशा परक्या भाषेतील शब्द किंवा कवने आली, तसेच संमोहनाद्वारे भूतकाळात मेलेल्या व्यक्ती वर्तमान जन्माच्याही मागे गेल्याची व त्यांना मुळीच गंध नसलेल्या भाषेत बोलू तसेच संभाषण करू लागल्या, अशीही काही उदाहरणे आहेत.

ह्या सर्व प्रकारांमुळे, पूर्वग्रह न बाळगणाऱ्या विचारवंतांना पेच पडतो. जीवनविज्ञान, गर्भविज्ञान व शरीरशास्त्राच्या साथीने विकास पावलेले मानसशास्त्र यांचा आधार घेऊन बुद्धी विचारते की देह-नाशानंतरही काहीतरी अस्तित्वात रहाणे शक्य असेलच कसे ? परंतु बुद्धीस अनुभवशरणताही सोडता येत नाही आणि वर्तमान विज्ञानांच्या गृहितांचे अपुरेपण मान्य करावयास लावणाऱ्या घटनांकडे दुर्लक्ष करता येत नाही.

मानवाच्या स्वरूपाविषयीच्या प्रश्नांच्या संदर्भात विचारांना चालना देणाऱ्या आणखी एका प्रकाराकडे अभ्यासक अलीकडे वळले आहेत. तो प्रकार म्हणजे देहबाह्य अवस्थेचा अनुभव (out of body experience अथवा OBE). कारण मरणोत्तर अस्तित्वाच्या शक्यतेच्या संदर्भात तोही विचारार्ह आहे. त्याचे कारण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

माणसाचे एक व्यक्ती या नात्याने अस्तित्व, त्याच्या प्रेरणा, इच्छा, विचार, स्मृती इ. मानसिक घटकांवर अवलंबून असते यात शंका नाही. पूर्वप्रसंगांच्या स्मृती तसेच प्रेरणादींचे सातत्य (continuity) यामुळेच 'मी होतो तोच आहे' ही माणसाची जाणीव टिकून रहात असते. स्मृती संपूर्णपणे नष्ट झाली की आणि वर्तमानातील प्रेरणा-प्रयोजनांचे सूत्रच तुटले की माणूस तोच रहात नाही. तथापि त्याबरोबरच माणसाचे व्यक्ती या नात्याने वेगळेपण त्याच्या शरीरामुळेही असते. तसे नसते तर 'मी-तू' 'हा व तो' हा भेद व त्यानुसार चालणारा व्यवहार संभवलाच नसता. तर मग साहजिकच विचार येतो की, जर मृत्यूनंतर माणसाच्या व्यक्तित्वातील काही अस्तित्वात रहात असेल तर त्यामध्ये स्मृती वगैरे मानसिक घटक व त्यांना एकत्रित ठेवणारे असे कोणत्यातरी स्वरूपाचे शरीर हे दोन्ही असले पाहिजेत.

## देहबाह्य अवस्थेचा अनुभव

देहबाह्य अवस्थानुभवांच्या बाबतीत प्रसंगांची तसेच तपशीलाचीही विविधता आढळून आलेली आहे. स्थूल शरीराबाहेर अंशतः अथवा पूर्णतः पडल्याची, त्यावेळी स्थलकालाची जाणीव कायम असल्याची, त्यावेळी स्वतःच्या शरीराकडे दुरून पहात असल्याचा

(autoscopy) किंवा अन्य स्थळी गेल्याचा अनुभव शेकडो स्त्री-पुरुषाना आलेला आहे. तो अनुभव भिन्न भिन्न व्यक्तींना भिन्न भिन्न प्रसंगाच्या निमित्ताने आला आहे व त्याच्या अनुभवामध्ये तपशीलाबाबतही भिन्नता दिसून आली आहे.

विख्यात माध्यम रेव. स्टॅन्टन मोझेस यानी माध्यमावस्थेत ती अवस्था अनुभवली होती. 'माझा हात (मृतात्म्याचा) संदेश लिहित होता; तोपर्यंत माझे स्पिरिट शरीरापासून अलग झालेले होते; हात लिहित असल्याचे मला दुरून दिसत होते. शरीराकडे तसेच खोलीतील वस्तूकडे मी पाहिले एका प्रकाशशलाकेने मी शरीराशी जोडलेला असल्याचे मला दिसले.. वर छतातून सौम्य सुखद प्रकाश शरीरावर पडत होता व शरीरास कंप व आचके येत होते.' मानस चिकित्सक कार्ल गुस्ताव युग यांना देहबाह्यअवस्थेचे अनुभव 'बिकट प्रसंगी आले होते.' एका विद्यार्थ्याचा अनुभव प्रा. मायकेल ग्रास्सो यांनी उद्धृत केला आहे तो असा : 'अमेरिकन नौदलात असताना मी एकदा पाण्याखाली १६ तास अडकलो. त्यावेळी मी न्यूयॉर्कला स्वतःच्या घरी आहे, पत्नी बाजार करून परतली आहे, तिला नौदल अधिकाऱ्याकडून फोन आला आहे व ती त्याच्याशी बोलते आहे, हे मी 'पाहिले'! एका ब्रिटिश अधिकाऱ्याला तो १९४४ मध्ये रणगाडयास गोळा लागून फेकला गेल्यावेळी पुढील अनुभव आला. 'मी एका ऐवजी दोन झालो'

एक 'मी' जमिनीवर पेटलेल्या कपडयानिशी पडलेला व हातपाय झाडीत असलेला, तर दुसरा 'मी' २० फूट अंतरावर हवेत तरंगणारा व जमिनीवरील 'मी' कडे व रणगाडयाकडे पाहणारा !

## काही अनुभव

काही जणांना मृत्युशय्येवर देहबाह्य अवस्थेचा अनुभव आलेला आहे. पूर्वी सर विल्यम बॅरेट यानी आणि अलीकडे वैद्यकविशारद फ्रेड शूनमेकर तसेच मायकेल सबोम यांनी मानसवैद्य एलिझाबेथ कुबलर-रॉस व केनेथ रिंग यानी आणि परामानसशास्त्रज्ञ डॉ. कार्लिस ओसिस यानी शेकडो आसन्नमरण स्त्रीपुरुषाना आलेले अनुभव अभ्यासले आहेत. डॉ. सबोम यानी शुद्ध वैद्यकीय दृष्टिकोनातून अभ्यास केलेला असल्यामुळे त्याचा निष्कर्ष फार महत्त्वाचा आहे.

डॉ. ओसिस यांनी अमेरिकन संस्कृतीतील शेकडो तसेच भारतीय संस्कृतीतील शेकडो आसन्नमरण व्यक्तींचे अनुभव जमा करून त्याने विश्लेषण केलेले असल्यामुळे तेही महत्त्वाचे आहेत. मृत्युशय्येवरील सुमारे २० लाख स्त्रीपुरुषाना देहबाह्य अवस्थेचा अनुभव आला असल्याचे डॉ. पॉल गॅलप यानी १९८२ मध्ये केलेल्या अमेरिकन सर्वेक्षणातही आढळले आहे आता, मृत्युशय्येवरील स्त्रीपुरुषाना आलेला अंधकारमय प्रदेशातून गेल्याचा, नंतर सुरम्य व प्रकाशमय प्रदेश पाहिल्याचा, तेथे दिवंगत आप्ताचे वा साधुसंताचे दर्शन झाल्याचा, दिवंगत आप्त आपल्याला नेण्यासाठी आले असल्याचा वगैरे अनुभव त्या त्या संस्कृतीतील समजुती तसेच आसन्नमरण व्यक्तीच्या स्मृतीमुळे प्रभावित झालेला असणे अगदी शक्य आहे तथापि स्वतःच्या शरीराकडे दुरून पहात असल्याचा, किंवा या जगाच्या पलीकडे गेल्याचा जो अनुभव बहुतेकांना आलेला आहे तो मात्र संस्कृतिसापेक्ष असल्याचे दिसत नाही. दिवंगत नातेवाईक भेटल्याचा अनुभव हा स्मृतिमूलक असतो अथवा व्यक्तीच्या मनाचा खेळ असतो असे नेहमीच म्हणता येईल काय, हाही प्रश्नच आहे.

डॉ. कुबलर-रॉस याच्या संग्रहातील पुढील उदाहरण विचार करावयास लावते. एक आसन्नमरण मुलगी वडिलाना म्हणाली, 'बाबा, मी त्या ठिकाणी गेले व तेथे मला भाऊ भेटला, परंतु बाबा, मला तर भाऊ नव्हता!' हे ऐकून वडिलाना रडू आले व त्यानी तिला सांगितले. 'बाळे, तुला भाऊ होता पण तू जन्मण्यापूर्वी तीन महिने आधी तो वारला.'

प्राण गेल्यावर पुन: जिवंत झालेल्यांनाही देहबाह्य अवस्थानुभव आलेले आहेत. सत्यवानाने प्राणोत्क्रमण व पुन: शरीरात प्रवेश या दरम्यानचा अनुभव सावित्रीस सांगितला की नाही कोण जाणे, गेल्या ४०/५० वर्षांत मात्र, डॉक्टरानी मृत्यू जाहीर केल्यानंतर काही वेळाने प्राण परत आलेल्या स्त्रीपुरुषाची कैक उदाहरणे उपलब्ध झाली आहेत व अशा व्यक्तींनी दरम्यानच्या काळातील अनुभव निवेदन केले आहेत एकतर, विद्यमान वैद्यकशास्त्रात, प्राण गेल्याच्या निकषांबाबत काहीसे अज्ञान आहे असे तरी म्हटले पाहिजे, अथवा अशा व्यक्तींचे अनुभव विचारात घेतले पाहिजे.

१९४३ साली डॉ, जॉर्ज रिची ९ मिनिटांनी पुन: जिवंत झाले, 'त्या ९ मनिटांत मी शरीराबाहेर गेलो व दुतरीकडे जाऊन आलो' असे त्यानी सांगितले. १९७४ मध्ये एका 'मृत' इसमाच्या शरीरात २३ मिनिटांनी पुन: प्राण आला. त्यावेळी त्याने सांगितले ते असे. 'मी असीम प्रकाशाकडे जात होतो. त्या प्रकाशाच्या लहरी शीत होत्या नंतर मी निराकार बनलो आणि दिक् व काल याच्या अतीत गेलो' १९८१-८२ मध्ये ओवेन थॉमस नावाचा २० वर्षांचा तरुण सुरी हल्लयास बळी पडला. छातीला मोठे छिद्र पडून आतडीही बाहेर आली होती. डॉक्टराच्या म्हणण्याप्रमाणे हृदय ५ मिनिटे बंद पडले होते व रक्त आम्लयुक्त बनले होते. नंतर तो जिवंत झाला. तो म्हणाला. 'दोन वर्षांपूर्वी मोटर अपघातात वारलेला क्रिस्तोफर हा माझा भाऊ मला भेटला. त्याने माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हटले, 'आम्हाला तू इथे नको आहेस' व त्याने मला दूर लोटले.' डॉ. रेमंड मूडी यानी या प्रकारची १५० उदाहरणे अभ्यासली आहेत. त्यामध्ये सामान्यंकरून आढळलेल्या गोष्टी म्हणजे गजरासारखा आवाज, अंधाऱ्या मार्गातून वेगाने गमन. नंतर धुके व मग प्रकाश भौतिक देहाबाहेर असल्याची जाणीव, डॉक्टर वगैरे मंडळींच्या कृती दिसत असणे, भावनिक घालमेल पण नंतर त्या विचित्र अवस्थेस सरावणे, निराळ्या प्रकारचे शरीर व त्याचे ठायी निराळ्या क्षमता असल्याचे लक्षात येणे. मृत आप्तेष्ट भेटण्यास वा घेऊन जाण्यास आलेले दिसणे, कधीकधी, पूर्वी केव्हाही न पाहिलेला प्रेमळ व तेजोमय आत्मा दिसणे, त्याने गतायुष्याचे मूल्यांकन करावयास सांगणे, पृथ्वीपलीकडील जीवनाची सीमारेषा ओलांडण्याची (-मृत्यूची-) वेळ अजून आलेली नाही व पृथ्वीवर परतायला पाहिजे हे लक्षात येणे किंवा 'परत जा' म्हणून कोणी तरी सांगणे. या अनुभवामुळे जीवनाकडे पहाण्याच्या दृष्टीत तसेच इतरांशी असलेल्या संबंधाच्या बाबतीत सु-परिवर्तन घडून येणे.

## अभ्यासाद्वारा अनुभव

आतापावेतो सांगितलेले सर्व प्रकार हे नैसर्गिकरीत्या (naturalistic) येणारे देहबाह्य अवस्थेचे अनुभव होत. परंतु ती अवस्था अभ्यास-

राही अनुभवता येते असे तत्त्वचिंतक व योगाभ्यासक सांगतात. ते म्हणतात की, साक्षित्वाच्या अभ्यासाने देहभाव कमी होत जातो, देह म्हणजेच मी ही धारणा निर्माण करणाऱ्या भावना तत्त्वज्ञानामुळें क्षीण होतात. प्लेटोने तर फिलॉसफीची व्याख्याच अशी केली की तत्त्वज्ञान ही एकपरी मरण्याची कला होय. स्पिनोझाने देखील म्हटले की : 'The life of philosophy is a daily rehearsal of death' योगशास्त्रात शिथिल शरीर, स्थिरसुखदायक आसन, प्रणवोच्चारण, नादानुसंधान, त्राटक इत्यादी जे मार्ग सांगण्यात आलेले आहेत त्यांचा अवलंब करण्याची शिफारस मुल्डून, फॉक्स, मनरो वगैरे पाश्चिमात्यांनीही केलेली आहे.

**देहबाह्य अवस्थेच्या तपशीलातील विविधता :** काही जणांना मस्तकातून बाहेर पडल्याचा तर काही जणाना नाभिस्थानातून बाहेर पडल्याचा अनुभव आला आहे. काही व्यक्तींनी हवेत तरंगल्याचा तर काहींनी पक्षासारखे झेपावत गेल्याचा अनुभव सांगितला आहे काही व्यक्तींना स्वतःच्या स्थूल शरीराजवळ उभे असल्याचा, काहींना छताजवळ गेल्याचा, काहींना स्थूलदेहाला समांतर स्थितीत जराशा उंचीवर किंवा शेजारीच असल्याचा अनुभव आलेला आहे. काहीजणांनी भिंती पार करून दुसऱ्या स्थळी गेल्याचा व तेथील दृश्य अवलोकन केल्याचा अनुभव निवेदन केला आहे. काही जणांनी स्थूल शरीराशी प्रकाशयुक्त धाग्याने जोडलेले होतो असे सांगितले आहे. स्थूल देहातून बाहेर पडतेवेळी काहींची जाणीव लोप पावली होती. काही जणांना स्वतःला दुसरे एक शरीर असल्याचा अनुभव आला होता, तर काही जणांना स्वतः धुक्याचा ढग किंवा प्रकाशगोल अथवा प्रकाशबिंदू बनल्याचा अनुभव आला होता शरीरातून बाहेर पडण्याच्या काही वेळ अगोदर काहींना ज्ञानेंद्रिये अक्षम झाल्यासारखे व स्नायूंना जडत्व आल्यासारखे जाणवले आहे. काहींचे शरीर थरथरले आहे. काही जणांना घंटानाद, किंवा वाऱ्याचा सूऽऽ असा आवाज, किंवा पंखांची फडफड ऐकू आली आहे. काहींना शरीर लुळे पडल्याचा किंवा जीव आतआत ओढल्याचा अनुभव आलेला आहे.

शरीरात पुन: परत येतेवेळी काहीजणांच्या शरीराला हादरे बसले तर काहींना मुळीच आयास पडले नाही.

शरीराबाहेर असते वेळच्या अनुभवाबाबत मात्र बहुतेकांनी सांगितले आहे की संवेदने स्पष्ट होती; विचार क्रिया व्यवस्थितपणे चालू होती. 'जाणीवेचे क्षेत्र विस्तारले', 'वृक्ष, आकाश इ. कधी नव्हे इतके सुंदर भासले'; 'अभूतपूर्व प्रसन्नता व अवर्णनीय मुक्तता वाटू लागली'; 'सर्व काही पालटल्यासारखे वाटले'; असेही पुष्कळांनी सांगितले आहे.

## अतींद्रिय संवेदना

काही उदाहरणांवरून असे दिसते की देहबाह्य अवस्थेचा अतींद्रिय संवेदनाशी (ESP.) काही एक संबंध असावा. कॉल्म्याने प्राणांतिक अवस्थेत असलेल्या एका स्त्रीचा अनुभव असा : 'माझी चेतना विभागली गेली. एक भाग शरीराशी निगडित होता. दुसरा भाग 'माझा' होता. शरीराशी सलग्न असलेली चेतना विघटित होत चालली आहे असे मला वाटले. शरीर दुरून दिसत होते इतकेच नव्हे तर माझे लक्ष जेथे जेथे वळत होते तेथील— घर, लंडन, स्कॉटलंड वगैरे ठिकाणची वस्तुस्थिती स्पष्ट दिसत होती'

मद्रासचे केंद्रीय सेवेतील श्री. आर. नारायणन जोराने आपटून ७ दिवस बेशुद्ध असताना त्यांना आलेला अनुभव त्यांनी निवेदन केला आहे : 'मला एका खोलीत नेले आहे. तेथे झेनिथ घड्याळ व त्याखाली कॅलेंडर आहे. दिवा लावलेला आहे. आज १८ डिसेंबर आहे असे कोणी तरी म्हणाले. नतर, माझ्यावर जे डॉक्टर शस्त्रक्रिया करणार होते ते मृत्यू पावलेले दिसले.' श्री. नारायणन ओरडले की डॉक्टर वारले आहेत. ते शुद्धीवर आल्यावर डॉक्टर त्यांना म्हणाले, 'मी चागला जिवंत आहे.' पण नारायणन म्हणाले : आज रात्री हृदयाच्या झटक्याने तुम्ही जाणार, तुमच्या पत्नीचे नाव कमला आहे का ? तुमच्या खोलीत झेनिथ घड्याळ व त्याखाली कॅलेंडर आहे का ? डॉक्टर हो म्हणाले. त्याच मध्यरात्री डॉक्टर हृदयाचा झटका येऊन वारले. (इंडियन एक्स्प्रेस, ९-१२-८३).

**भिन्नभिन्न मीमांसा :** देहबाह्य अवस्थानुभवाविषयी तर्कवितर्कात्मक अशी बरीच चर्चा झालेली आहे.

देहबाह्य अवस्थानुभव केवळ भास असतो काय ? मानसिक सतुलन राखण्याचा तो एक प्रयत्न असू शकेल काय ? त्याचा संबंध मनोविकृतीशी असेल काय ? देहबाह्य अवस्था खरोखरच असू शकते की नाही, इत्यादी प्रश्नांना अनुलक्षून या अनुभवाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न मानसशास्त्रज्ञ, मानसचिकित्सक, वैद्यकतज्ज्ञ, परामानसशास्त्रज्ञ इ. नी केलेला आहे.

**वैद्यकशास्त्रीय मीमांसा :** 'मेंदूतील केंद्रावर परिणाम झाल्याने निर्माण झालेला भास' ही वैद्यकशास्त्रीय उपपत्ती आहे, परंतु ती बरोबर नसल्याचे दिसून आले आहे. कारण, ज्या आसन्नमरण व्यक्तींना देहबाह्य अवस्थेचा अनुभव आला होता त्या तापाने फणफणलेल्या नव्हत्या व त्यांना वात झालेला नव्हता; किंवा त्यांना गुंगीचे औषध देण्यात आलेले नव्हते; त्यांच्या मेंदू केंद्रांना विषारी द्रव्याचा आघात (toxic shock) पोचलेला नव्हता; प्राणवायू कमी (hypoxia) पडलेला नव्हता; कार्बन डायॉक्साईडचे आधिक्यही (hyper carbia) नव्हते, इत्यादी गोष्टीकडे डॉ. सबोम यांनी लक्ष वेधले आहे.

**मानसशास्त्रीय उपपत्ती :** श्रीमती सुसन जे. ब्लॅकमोर यांना असे वाटते की त्या अवस्थेत जे अतींद्रियज्ञान होते त्यात स्मृतीची व कल्पनाची भर पडून एक प्रकारचे बोधचित्र (cognitive map) निर्माण होत असले पाहिजे व त्यामुळे माणसाला त्या ठिकाणी गेलो असे वाटत असावे. या दृष्टीने पहाता, देहबाह्य अवस्थेचा अनुभव म्हणजे जागृतावस्थेतील स्वप्न होय.

प्रो. जॉन पामर म्हणतात की जेव्हा काही कारणाने स्नायूमूलक सवेदनामध्ये बदल होतो तेंव्हा स्नायु-सवेदनावर अवलंबून असणारी एरवीची देहविषयक कल्पना (body concept) बदलते. परिणामी, स्व-कल्पनेला (self concept) धोका निर्माण होतो व माणूस आतून अस्वस्थ व सचिंत होतो. मग, जेणेकरून ती स्व-कल्पना सावरली जाईल अशा मानसिक प्रक्रिया होऊ लागतात. त्यापैकी एक म्हणजे माणसाला असे वाटू लागते की आपण शरीराहून निराळे आहोत. या मताच्या समर्थनार्थ प्रो. पामर यांनी पक्षाघात झालेल्या माणसास तसेच झोपेत स्वप्न पडत असलेल्या माणसास देहबाह्यतेचा अनुभव येतो या गोष्टीकडे लक्ष वेधले आहे.

जिवास धोका निर्माण झाल्यावेळी देहबाह्य अवस्थेचा अनुभव आल्याच्या उदाहरणाकडे बोट दाखवून डॉ. एहरेनवॉल्ड यानी असे म्हटले आहे की,या अनुभवाचे मूळ मृत्यूवर मात करण्याच्या मनीषेत असावे. आणखी एक मानसशास्त्रीय उपपत्ती अशी की जेव्हा माणसाला आपण कमी सक्षम आहोत असे वाटू लागते अशावेळी आपण तर अमर आहोत असे वाटावयास लावणारा देहबाह्य अवस्थानुभव त्याला येतो. या समवस्थापनात्मक प्रक्रियेद्वारा (homeostasis) माणसाची स्व-प्रतिमा टिकून राहते असे श्रीमती बार्बारा हॉनेग्गरनी सुचवले आहे डॉ. नॉयिसच्यामते तो अनुभव म्हणजे व्यक्तित्व विलोपनाचेच एक रूप होय.

त्या अनुभवाचे सुरुवातीस शरीर कपायमान झाल्याचा, अंधाऱ्या भुयारातून गेल्याचा, स्थूल शरीराशी प्रकाशमान धाग्याने जोडलेले असल्याचा वगैरे जो अनुभव काहीजण सांगतात त्याचा संबंध गर्भाशयातून योनिमार्गे बाहेर येत असतानाचा शरीरकंप व मातेच्या शरीराला जोडणारी नाळ याच्याशी असावा अशी ही एक कल्पना प्रसृत करण्यात आलेली आहे.

परंतु वरील विविध उपपत्तीवर आक्षेपही घेण्यात आलेले आहेत. ज्याअर्थी काही जण देहबाह्यअवस्थेचा अनुभव स्वेच्छेने घेऊ शकतात त्याअर्थी तो भासात्मक असतो असे म्हणणे कठीण आहे. कारण, माणूस स्वेच्छेने भास निर्माण करू शकत नाही ज्या अर्थी त्या अवस्थेत बुबुळाच्या जलद हालचाली होत असल्याचे आढळत नाही, त्या अर्थी तो अनुभव म्हणजे व्यक्ती पहात असलेले एक स्वप्न असते असेही म्हणता येत नाही शिवाय, त्यावेळचा स्नायूचा विद्युत् आलेख (EMG) स्वप्न पडत असते त्यावेळच्या आलेखापेक्षा निराळा असतो. आणखी असे की, स्वप्न पडते त्यावेळी 'मी शरीराच्या बाहेर पडत आहे व स्वत च्या शरीराकडे दुरून पहात आहे' असा अनुभव येत नसतो तो अनुभव 'व्यक्तित्वविलोपन' (depersonalization) विकृतीतही टाकता येत नाही, कारण, त्या विकृतीत, 'मी कोणीच नाही.' असे अथवा मी दुसराच कोणी तरी आहे असे रुग्णास वाटत असते. देहबाह्य अनुभव तसा नसतो या अनुभवातील autoscopy व मनोविकृतीच्या सदरातील ऑटोस्कोपी यामध्येही फरक आहे देहबाह्यतेच्या अनुभवात माणसाची जाणीव व मनोव्यापार त्या दुसऱ्याशी निगडित असतात. याउलट, मनोरुग्णास असे वाटत असते की, स्वत च्या शरीरासारखे दुसरे एक शरीर आहे व ते शरीर काही तरी करते आहे. प्रसूतीसमयी योनिमार्गातून बाहेरच्या प्रकाशात आल्याच्या अनुभवाशी संबंध जोडण्याचा प्रयत्नही असमाधानकारक वाटतो, कारण, देहबाह्यअवस्थानुभव आलेल्या व्यक्तीमध्ये सीझेरिअन शस्त्रक्रियेद्वारा जन्मलेल्या व्यक्तीही आहेत.

## देहबाह्य अस्तित्व असेल का ?

देहबाह्यतेचा अनुभव ही जाणिवेची एक बदललेली अवस्था होय यात वाद नाही. आता त्यावेळी शरीरातून खरोखरीच काही तरी बाहेर जात असेल का ? या प्रश्नाच्या संदर्भात दोन प्रकारची उदाहरणे विचार करावयास लावतात. व्यक्ती बसलेल्या जागेपासून जराशा अंतरावर तिचे आणखी एक तसेच शरीर दिसणे, आणि व्यक्ती एकाच वेळी दोन स्थळी असणे हे ते दोन प्रकार होत. ते दोन्ही प्रकार 'द्विस्थलीय अस्तित्व' (bi-location) या सदरात टाकावयास हरकत नाही. भारतीय सांख्य वेदांतादि आस्तिक दर्शनामध्ये धी आणि प्राण यानी युक्त असे एक लिंगशरीर असते ही कल्पना आहे. तशीच कल्पना प्राचीन इजिप्शिअन व खाल्डिअन संस्कृतीतही आहे. ती कल्पना जुनी म्हणून भ्रामक होय असे समजणे हे अविचारीपणाचे होईल असे पाश्चिमात्य तत्त्वज्ञ तसेच प्रयोगशील अभ्यासक म्हणू लागले आहेत

माधानचे संत गुलाबराव महाराज यांच्यासंबंधीचा पुढील अनुभव (कै) प्राध्यापक धामापूरकरांच्या रोजनिशीत त्यानी लिहून ठेवला आहे.

'रात्रीचे वेळी मी महाराजाना मायर्संच्या पुस्तकातून मजकूर सांगत असे. एके रात्री मला असे वाटले की पाठीमागच्या बाजूस माझ्या खांद्यावरून डोकावून कोणी तरी पुस्तकाकडे पहाते आहे. हा अनुभव मी महाराजाना सांगितला ते काहीच बोलले नाहीत. दुसऱ्या रात्री मी वाचता वाचता आजूबाजूस लक्ष देत राहिलो. आदल्या रात्रीप्रमाणेच अनुभव आला व मग काही एक आकृती महाराजाच्या शरीरात प्रवेश करीत असल्याचे दिसले. हा अनुभव मी महाराजाना सांगितला ते म्हणाले, 'आता लक्षात आले ना ?'

एक महिला नियमितपणे ध्यान करीत असे. एकदा तिला तो अनुभव आला तो व त्यावेळी जवळच्या कोचावरील तिच्या शेकेखोर मानसशास्त्रज्ञ पतीला जो प्रकार दिसला तो प्रा. मायकेल ग्रॉस्सो यानी उद्धृत केला आहे 'मी अंधारलेल्या खालीत आसन घालून जमिनीवर बसले होते. अंगठ्यावर चित्त एकाग्र करून तिचा रंग, स्पर्श इ मनापुढे आणीत होते पायात व घोट्यात अस्वस्थता वाटू लागली परंतु मी ते हलवू शकले नाही नंतर मला मनाची उन्नत अवस्था (uplift) जाणवू लागली शरीर जाणवेनासे झाले. पूर्णपणे मनाच्याच आवरणात मी आहेसे वाटू लागले मग एकाएकी शरीराच्या वर जाऊन मी नेमून खाली पाहू लागले माझे गुडघे, मांड्या, छाती व खांदे मी पाहिले'

पती तिच्याकडे पहात होते त्यानी लिहिले आहे: 'पत्नीचा चेहरा लावट होत चालल्याचा मला दिसला नंतर वाफेसारखा पदार्थ वर जात असल्याचे व तिच्या चेहऱ्याचा व स्कंधाचा आकार घेत असल्याचे मी पाहिले मी स्तंभित झालो. तो पदार्थ वरवर जाऊ लागला व त्याला आणि पत्नीच्या मानेच्या मागील भागास एक प्रकाशमान असा दोरीसारखा पदार्थ जोडलेला आहे असे दिसले हा सर्व प्रकार १५/२० सेकंदात घडला, पण मी चांगलाच घाबरलो' (१८८१-८४ मध्ये सर विल्यम क्रूक्स यानी फ्लॉरेन्स कुकवर जे प्रयोग केले त्याची आठवण या ठिकाणी होते)

१९१९ साली श्री. अर्नेस्टो बोझानो यानी 'भुताच्या वास्तव्याच्या' म्हणून ३११ केसेस अभ्यासल्या त्यामध्ये हयात व्यक्ती भूतरूपाने दिसल्याची काही उदाहरणे होती. गर्ने, मायर्स व पॉडमोर यांच्या ग्रंथात, टिरेल यांच्या ग्रंथात, तसेच डॉ. श्रीमती लुइसा ऱ्हाईन यांच्या 'ड्यूक कलेक्शन' मध्येही एका स्थळी असलेली व्यक्ती दुसऱ्या स्थळीही लोकाना दिसल्याची उदाहरणे आहेत या प्रकारचे एक विख्यात उदाहरण म्हणजे—

**व विल मॉट केस :** १८६३ साली श्री. विलमॉट लिव्हरपूलहून न्यूयॉर्कला जहाजाने जात होते.

श्रीमती विलमॉट कनेक्टिकट (अमेरिका) येथे होत्या. एके रात्री त्याना खूप चिंता वाटू लागली व झोप येईना. पहाटे ४ च्या सुमारास त्याना असे वाटले की 'आपण पतीला शोधीत गेलो, त्या जहाजावरील त्यांची खोली शोधून काढली, त्यांच्या वरच्या बर्थवरचा गृहस्थ आपल्याकडे बघत होता, आपण पतीचे चुंबन घेतले व निघून आलो.' आता त्याचवेळेस श्री. विलमॉटना पत्नीने येऊन चुंबन घेतले असे स्वप्न पडले. परंतु महत्त्वाची गोष्ट म्हणजे वरच्या बर्थवरील त्या गृहस्थाने एक स्त्री आल्याचे व तिने श्री. विलमॉटचे चुंबन घेतल्याचे पाहिले असे सांगितले. आता, श्रीमती विलमॉट याना जहाजावरील त्या खोलीचे, पतीचे व वरच्या बर्थवरील गृहस्थाचे केवळ अतींद्रिय दूर प्रत्यक्ष (क्लेअर व्हॉयन्स) झाले असेल, श्री. विलमॉटनी पाहिलेले स्वप्न टेलेपथीमुळे पडलेले असेल आणि वरच्या बर्थवरील इसमास टेलेपथीमुळेच भासात्मक दृश्य दिसले हे स्पष्टीकरण कितपत समाधानकारक गणता येईल ?

एकदा गोएटे कवी रस्त्याने जात असताना कोणीतरी दृष्टीस पडले असे जाणवून ते थाबले व उद्गारले. 'फ्रेडरिक ! तू इथे ? अन् रात्रीच्या पोषाखात व माझ्या चपला घालून या हमरस्त्यावर ?' घरी येऊन पहातात तो फ्रेडरिक त्याच्या खोलीत बसलेला होता तो म्हणाला, 'तुझ्या घरी येत असताना पावसाने भिजलो म्हणून तुझेच कपडे चढवून खुर्चीत बसलो. डोळा लागला व मला स्वप्न दिसले की तू मला रस्त्यात भेटलास व विचारलेस, 'तू इथे रात्रीच्या पोषाखात व माझ्या चपला घालून हमरस्त्यावर ?'

पुढील घटना प्रा. के. टी. जहागीरदारानी प्रसिद्ध केली आहे. एके सायकाळी त्यांच्या घरी श्री. टिळक व पराजपे याचे समवेत शिवयोगी (कै.) न्यायस्वरूप शर्मा होते. 'रात्रीचे ९॥ च्या सुमारास शर्मांनी टिळकाना त्याच्या गाडीने आपल्या घरी पोहोचविण्यास सांगितले. आम्ही चौघे शर्मांच्या घरी लिफ्टमध्ये असताना शर्मांना टिळकानी आपल्याला खूप भूक लागली असल्याचे सांगितले. वर गेल्यावर, कोणत्या पद्धतीचे जेवण आवडते ते शर्मांनी टिळकाना विचारले. टिळक म्हणाले, 'हम भात, पोळी, वरण, भाजी, और चटणी खाता है' दहा मिनिटात नोकर चार थाळ्या घेऊन हजर झाला. टिळकानी स्वयपाक्यास विचारले, 'हे सर्व पदार्थ करावयास तुला कोणी व केव्हा सांगितले ?' तो म्हणाला 'क्यों, आठ बजे साहब तो इधर आये थे, और चार लोगोके लिये खाना बनाने के लिए बोलके गये ! (अभिरूचि, १९८० दिवाळी अक).

**सामूहिक भासांचा प्रश्न :** माणूस ज्या ठिकाणी होता त्याहून दुसऱ्या जागीदेखील दोघातिघांना एकाच वेळी दिसल्याची उदाहरणे "कलेक्टिव हॅल्यूसिनेशन' म्हणून गणण्यात येत असतात. पुढील दोन उदाहरणे नमुन्यादाखल घेऊ या.

(१) श्रीमती हॉल व आणखी तिघेजण जेवावयास बसले होते. बाईंना एकाएकी आपण काही अंतरावर उभ्या आहोत असे 'दिसले', बाकीच्या तिघानाही बाई टेबलापाशी बसलेल्या व शिवाय भिंतीच्या फळीसमोर उभ्या असलेल्या दिसल्या.

(२) 'दादाजी' (चौधरी) १९७० साली अलाहाबादला एका गृहस्थांचे घरी होते. एका खोलीत भक्तमडळीचे भजन चालू होते. दुसऱ्या खोलीत दादाजी एकटे बसले होते. बाहेर आल्यावर ते एका बाईंना म्हणाले. 'कलकत्त्यास तुमच्या वहिनीस पत्र लिहा व मी पत्ता सांगतो त्या घरात ह्यावेळी मी कोणास दिसलो काय ते विचारावयास सागा.' त्यानी मुकर्जी नावाच्या कुटुंबाचा पत्ता दिला. पत्र पाठवले गेले. पत्रोत्तरी खालील माहिती आली : कु. रोमा (रमा) मुकर्जी तिच्या झोपायच्या खोलीत पडल्या पडल्या इंग्रजीचा पाठ करीत असताना तिला आवाज ऐकू आला. तिच्या अभ्यासिकेत दादाजी असल्याचे तिला झोपायच्या खोलीच्या दारातून दिसले व ती किंचाळली. दादाजीनी तिला गप्प राहाण्यास व चहा आणण्यास खुणावले. तिने चहा–बिस्किटे आणून त्याना दिली. तिच्यामागे तिच्या मातुश्री व डॉक्टर बधु होते. मातुःश्रीनी दाराच्या फटीतून दादाजीना पाहिले. बाजार करून आलेल्या श्री. मुकर्जींनी साशकतेने फटीतून पाहिले तेव्हा त्याना खुर्चीवर माणूस बसलेला दिसला. काही वेळाने त्या चौघाना आवाज ऐकू आला. दुसऱ्या दाराने दादाजी गेले असावेत असे त्याना वाटले व ते त्या अभ्यासिकेत गेले. दाराच्या खिटघा बदच असलेल्या आढळल्या दादाजी तेथे नव्हते. मात्र अर्धा कप चहा व बिस्किटे नाहीशी झाली होती व दादाजीच्या आवडत्या सिगरेटचा जळता तुकडा मेजावर आढळला (डॉ. कार्लिस ऑसिस, Research in Parapsychology मध्ये).

अशा या 'सामूहिक भासाच्या' बाबतीत पुढील प्रश्न विचारता येईल. एकादी वस्तू खरोखरच आहे की नाही हे ठरवताच, ती चारचौघाना एकाच वेळी दिसते आहे का हा निकष आपण व्यवहारात लावीत असतो. तोच निकष लावून सामूहिक भासांमध्ये काही वास्तवाचा भाग असतो असे का म्हणू नये ?

## इतर अजब प्रकार

गेल्या शतकात प्रसिद्ध झालेल्या काही वृत्तातांत कसोशीपूर्वक निरीक्षणाचा आधार किती होता व त्या काळी जादूटोणा व 'करणी' यावर असलेल्या विश्वासाचा प्रभाव किती होता हा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्या प्रकारची उदाहरणे आजही मिळतात काय हे पहावयास पाहिजे व ती प्रयोगाच्या कक्षेत आणली पाहिजेत. पॅपुस लिखित 'Magic Practique' या ग्रथातील एक उदाहरण असे आहे :

'एका रशिअन अधिकाऱ्यास एका जिवत माणसाचे भूत वारंवार दिसत असे. एके दिवशी त्याने त्या भुताच्या मस्तकात तरवार खुपसली. तिकडे त्या माणसाच्या मस्तकास जखम झाली व तो दुसऱ्याच दिवशी मरण पावला.'

English Judicien Archives मध्ये पुढील उदाहरण आहे : जेन ब्रुक्स या बाईच्या कोपाचा रोख एकदा एका लहान मुलाकडे वळला. मूल क्षीण व निस्तेज होऊ लागले. एके दिवशी त्याने भिंतीवरील एका जागेकडे बोट दाखवून म्हटले : 'ती तिथे जेन ब्रुक्स आहे. एका माणसाने त्या जागेवर चाकू मारला. नंतर जेनच्या घरी जाऊन पाहिले तो तिच्या हातास जखम झालेली आढळली.'

## देहबाह्य अवस्थाविषयक जुने प्रयोग

सर विल्यम बॅरेट याच्या स्नेह्याने पुढील प्रयोग केला होता.

'१८८१ नोव्हेंबरच्या एके रविवारच्या मध्यरात्री मी एकाएकी निर्धार केला की तीन मैलावर केनिंगस्टन येथे कु. व्हेरिटी (वय

२५) धाकट्या बहिणीसह राहत होत्या. त्यांच्या शयनगृहात (सूक्ष्म शरीराने) जावयाचे. पुढे गुरुवारी त्याना प्रत्यक्ष भेटावयास गेलो तेव्हा कु. व्हेरिटीने सांगितले की रविवारच्या मध्यरात्री ती जागी असताना मी तिला तिच्या बिछान्याजवळ उभा राहिलेला दिसलो; ती किंचाळली. जागे केलेल्या धाकट्या बहिणीनेही मला पाहिले. या गृहस्थाने सायकिकल रीसर्च सोसायटीच्या विनंतीवरून असा आणखी एक प्रयोग यशस्वीपणे करून दाखवला होता. या प्रकारच्या नऊ व्यक्ती सर बॅरेटना आढळल्या होत्या व त्यांनी त्यांच्यावर केलेले प्रयोग यशस्वी ठरले होते.

रेव. स्टेंटन मोझेस याच्या स्नेह्याने पुढील निवेदन केले व त्याची ग्वाही मोझेसनी दिली आहे: 'एके सायंकाळी मी ठरविले की मोझेसच्या दृष्टीस पडावयाचे. मध्यरात्रीच्या जरा अगोदर मी मोझेस-वर विचार केंद्रित करून बिछान्यावर पहुडलो. त्याच्या खोलीशी व परिसराशी मी अपरिचित होतो. लवकरच मला झोप लागली. काही दिवसांनी त्यांची भेट झाल्यावेळी मी विचारले, 'शनिवारी रात्री तुमच्या खोलीत काही घडले काय?' मोझेस म्हणाले: 'मी श्री. M. समवेत बसलो होतो. साडेबाराच्या सुमारास ते जायला निघाले व मी त्याना दार उघडून दिले. परत आलो तो त्याच्या खुर्चीत मला तुम्ही दिसलात. मी निरखून पाहिले. वर्तमानपत्र उचलले व स्वप्नात नसल्याची खात्री करून घेतली.' मी मोझेसना म्हणालो की माझा प्रयोग यशस्वी झालेला दिसतो ..काही आठवड्यानंतर मी पुनः प्रयोग केला. त्याप्रसंगी मोझेसनी मला काही प्रश्न विचारले. इतकेच नव्हे तर तेथून निघण्याची माझी इच्छा असताही त्यांनी स्वतःच्या इच्छाबलाने मला थोडा वेळ थांबून ठेवले...'

कॅमेऱ्याचा उपयोग करून घेऊनही काही प्रयोग गेल्या शतकात करण्यात आले होते त्यापैकी एक प्रयोग असा: बुखारेस्ट येथील शिक्षण संचालक श्री. हॅसडेन व त्याचे स्नेही डॉ. इस्त्राती यानी प्रयोग करण्याची रात्र ठरवून घेतली होती त्या रात्री ते दोघेजण आपापल्या गावी होते. श्री हॅसडेननी उशाशी एक व पायथ्याशी एक असे कॅमेरे ठेवले, इस्त्रातीना मनोमन बोलावले व मग ते झोपी गेले. तिकडे इस्त्रातीनी हॅसडेनच्या कॅमेऱ्यावर स्वतःचे चित्र उमटावयाचे असा दृढ संकल्प केला व ते झोपी गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी हॅसडेन यानी कॅमेऱ्यातली प्लेट धुतली. एका कॅमेऱ्यातील प्लेटवर इस्त्रातींचे तंतोतंत प्रोफाइल आले होते व दुसऱ्या कॅमेऱ्यातील प्लेट 'येण्याचा प्रयत्न तीन वेळा' झाल्याचे दर्शवीत होती.

## अलिकडे करण्यात आलेले प्रयोग

गेल्या ३० वर्षात देहबाह्य अवस्थाविषयक प्रयोगाना पुनः चालना मिळाली आहे. त्याचे स्वरूपही वेगळे आहे प्रयोगकर्ता सांगेल त्यावेळी प्रयुक्ताने देहबाह्य अवस्थेत नियोजित स्थळी-लक्ष्य स्थळी-जावयाचे, तेथील वस्तुस्थिती अवलोकन करावयाची, शक्यतर तेथे काहीतरी कृती करावयाची व 'परत येऊन' सर्व काही निवेदन करावयाचे. त्याच कालावधीत प्रयुक्ताच्या शारीरिक व्यापाराची मेंदूतील विद्युत लहरींची लय, त्वचेचे पोटेंशिअल, हृदयस्पंदन, बुबुळाची हालचाल इ. ची प्रयोगकर्त्याने नोंद करावयाची. तिकडे-लक्ष्य स्थळी-निरीक्षक व्यक्ती, उंदीर, मांजर यासारखे प्राणी ठेवावयाचे. उपकरणेही ठेवायची असे या प्रयोगांचे सामान्य स्वरूप असते.

प्रयोगासाठी मिळालेल्या खास उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे, (१) श्री. इंगो स्वान हे लेखक, कलावंत व संशोधक, १९७३-७४ मध्ये देहबाह्य अवस्थेत गुरु व बुध या ग्रहांवर गेल्याचे व तेथे जे 'पाहिले' ते नंतर पायोनिअर १० व मरिनर १० द्वारा मिळालेल्या माहितीशी जुळले असे त्यानी त्यांच्या 'To Kiss Earth Goodbye' या ग्रंथात म्हटले आहे. (२) स्टूअर्ट ब्लू हरारी. हे स्वतःही संशोधक आहेत. (३) डॉ. तनाऊस.

**स्वानवरील प्रयोग :** एका प्रयोगमालिकेत स्वैररीत्या निवडलेल्या काही वस्तू स्वानपासून १० फूट उंचीवर फळीवर एका वेळी कोणती तरी एक वस्तू अशा रितीने ठेवली होती. पैकी आठही चाचण्यात स्वाननी बसल्या जागेवरून 'तेथे जाऊन' ती ती वस्तू बरोबर वर्णन केली. काही वेळा त्यानी संबंधित वस्तूची स्थिती उफराटी-रिवर्स सांगितली. काही वेळा त्यांनी सांगितले की चकचकीत पृष्ठभागावर दिव्यांचा प्रकाश पडल्याकारणाने वस्तूचा काही भागच दिसू शकला.

दुसऱ्या एका प्रयोगात स्वान यांनी न्यूयॉर्क येथून देहबाह्य अवस्थेत डरहॅम येथे सॉल्फविन व हरारी या प्रयोगकर्त्यांच्या प्रयोगशाळेत नियोजित वेळी जाण्याचा यत्न केला. ह्या प्रयोगासाठी चार कॅसेटचा एक, या प्रमाणे एकूण ५ संच घेतले होते. प्रत्येक कॅसेटवर घंटा, भोंगा, तंतुवाद्य वगैरेंच्यापैकी कोणता तरी एक ध्वनी होता. प्रयोगाचे रात्री कॅसेटच्या त्या पाच संचांपैकी कोणता तरी एक संच घेतला व त्या संचातील चार कॅसेटपैकी एक कॅसेटही स्वैररीत्या निवडली होती.

न्यूयॉर्क येथून स्वान यानी लागोपाठ दोन रात्री देहबाह्य अवस्थेत डरहॅम येथील त्या लक्ष्यस्थळी जाण्याचा प्रयत्न केला व त्यावेळी तेथे लावलेल्या टेपवर कोणता नादध्वनी ऐकला ते आणि त्या ठिकाणी कोणी व्यक्ती दिसली की नाही ते टिपून ठेवले. नंतर त्या चारही टेपवरचे ध्वनी ज्या टेपवर मुद्रित करून ठेवले होते ती 'मास्टर-टेप' स्वान याना ऐकवला गेला व त्या दोन रात्री, कोणते दोन ध्वनी ऐकले ते, आणि त्या ठिकाणी कोणी होते की नाही ते स्वान यानी पत्राने डरहॅम येथे कळवले. ते तंतोतंत बरोबर होते.

*हरारीवर प्रयोग : काही प्रयोगात लक्ष्य-स्थल ५० फूटावर तर* काही वेळा पाव मैल दूर होते. त्या स्थळी टेपरेकॉर्डरसह दोन-तीन निरीक्षक, काही प्राणी व नोंद-उपकरणे ठेवली होती. निरीक्षकाना फक्त इतकेच सांगून ठेवले होते की अमुक ४० मिनिटांच्या अवधीत केव्हा तरी हरारी तेथे येण्याचा प्रयत्न करतील. तिकडे, प्रयोगशाळेत हरारीना सांगण्यात आले की त्या ४० मिनिटांपैकी अमुक १० मिनिटांच्या वेळात बसल्याजागेवरून २-३ मिनिटे लक्ष्यस्थलास भेट द्या; पुढच्या १० मिनिटामध्ये पुनः एक भेट द्या; त्या पुढील १० मिनिटात आणखी एकदा भेट द्या.

प्रयोगाचे दिवशी हरारी शिथिल स्थितीत व मनाने शांत राहात, संघर्षाचे प्रसंग टाळीत; दुपारी खात नसत; हृदय स्पंदनाची गती तसेच श्वासोच्छ्वास स्थिर ठेवीत व देहाबाहेर जाण्याच्या तयारीत राहात.

एका प्रयोगाचे वेळी, लक्ष्य-स्थळी, कोपऱ्यामध्ये ८०×३०×१० इंच आकाराच्या खोक्यात हरारीचे आवडते मांजराचे पिल्लू ठेवले होते. कारण त्याची अशी धारणा होती की आपण तेथे गेलो आहोत

अशी केवळ कल्पना केली तर त्यावेळी होणाऱ्या त्या पिलाच्या हालचाली व खरोखरच देहबाह्य अवस्थेत तेथे गेलो तर त्यावेळी त्या पिलाच्या हालचाली यामध्ये फरक दिसून येईल.

प्रयोगकर्त्यांनी हरारी यांना एकूण ८ वेळा संभाषणात गुतवून ठेवले आणि ८ वेळा लक्ष्यस्थळी जाण्यास सागितले. संभाषणात गुतवून ठेवलेल्याच्या एकूण कालावधीत पिल्लू अस्वस्थ होते व त्याने ३७ वेळा म्यावम्याव केले होते. परतु हरारीनी 'पिलाला भेट दिली' त्या ८ वेळा मिळूनच्या काळात मात्र पिलू शात होते व त्याने एकदा सुद्धा 'म्याव' केले नाही.

एका प्रयोग बैठकीचे वेळी हरारीनी सागितले की मी लक्ष्यस्थळी अमुक जागी उभा होतो. आणि पिलाने खरोखरच त्या बाजूजवळ बराच वेळ घालवला होता.

**डॉ तनाऊसवर प्रयोग**: डॉ. कार्लिस ओसिस यानी तनाऊसवर (व इतरावरही) प्रयोग केले आहेत प्रयुक्ताला लक्ष्यस्थळाचे केवळ अतीद्रियसंवेदन (ESP) झाले की तो तेथे देहबाह्य अवस्थेत खरोखरच गेला होता हे निश्चित करता यावे म्हणून दोन प्रकारच्या प्रयुक्त्या (devices) योजलेल्या असत. (१) लक्ष्यस्थळी मेजावर एक वस्तू, तिच्या आजूबाजूस आरसे, त्या वस्तू पुढे एक (प्रिझम) व या सर्वांच्या पुढे छिद्र असलेली फळी. खरोखरच त्या छिद्रातून पाहिले तर ती वस्तू निराळ्या जागी दिसेल, किंवा तिची प्रतिबिंब एकमेकांवर पडतील, किंवा तिच्या प्रतिमांचा विशिष्ट भागच दृग्गोचर होईल. (२) दुसरी प्रयुक्ती अशी मेजावरील छिद्रयुक्त फळीच्या पलीकडे एक वर्तुळाकार चकती व दुसऱ्या खोलीतून बटन दाबले की ती फिरू लागेल व पाच रंगापैकी कोणत्या तरी एका रंगाची पार्श्वभूमी निर्माण होईल आणि त्या छिद्रातून पाहणाऱ्याला असा दृक्-भ्रम होईल की त्या चकतीच्या अमुक चतकोरावर (quadrant) एक रेखाचित्र (Line drawing) आहे. याच लक्ष्य—कक्षामध्ये दीड फूट आकाराची एक पेटीही टागून ठेवलेली असे. तिला पोलादी पत्र्याचे दुहेरी वेष्टन. त्या पत्र्यामुळे विद्युत चुबकीय प्रवाहापासून सरक्षण मिळेल अशी योजना. त्या पेटीमध्ये कपन ग्राहक असे दोन टागते पत्रे (sensors) व त्यांना स्ट्रेन गॉजेस जोडलेले पत्रे कंप पावले की स्ट्रेन गॉजेसमध्ये विद्युत स्पंद उत्पन्न व्हावयाचा, तो वर्धित व्हावयाचा व त्याची नोद दुसऱ्या खोलीतील उपकरणावर व्हावयाची.

डॉ तनाऊस नि शब्द व काळोख्या खोलीत शिथिल अवस्थेत पडून राहात किंवा ध्यान लावीत. 'मी लक्ष्य स्थळी जाण्याच्या तयारीत आहे' असे त्यानी इंटरकॉमवरुन सागितले की ओसिस बटन दाबीत व लक्ष्य खोलीतील ती वर्तुळाकार चकती फिरू लागे.

एकूण १९७ प्रयोगात, ११४ वेळा डॉ तनाऊसनी त्या त्या वेळी पार्श्वभूमीचा रग कोणता होता, ते अथवा कोणते रेखाचित्र दिसले ते बरोबर सागितले.

डॉ. तनाऊसचा प्रयोगादरम्यानचा अनुभव : (१) एका प्रयोगा नतर ते म्हणाले, की त्या लक्ष्य स्थळी एक बाई बसलेल्या असल्याचे त्यानी पाहिले. ही गोष्ट खरी होती.

(२) डॉ. तनाऊसनी असेही सागितले की त्यांना प्रयोगांमध्ये पुढील अडचण अनुभवावी लागत असे : 'माझे ते 'दुसरे शरीर' म्हणजे छोटासा प्रकाशगोल दिसे व माझ्या भौतिक शरीरापेक्षा त्याची उंची कमी वाटे. लक्ष्य स्थळी असलेल्या मेजावरील पेटीच्या छिद्रातून पहाताना येण्यासाठी मला 'ते' शरीर ताणावे लागे.

(३) एका प्रयोगाचे वेळी ते मध्येच ओरडले : 'अहो, 'तो' प्रकाश फार तीव्र आहे अन् मला दिसेनासे झाले आहे' त्यावेळी तिकडे प्रयोगकक्षात बिघाड झालेला होता व तेथील वस्तूवर पडलेला प्रकाश खरोखरीच खूप तीव्र झालेला होता

एका स्त्रीवरील प्रयोगात तिने अमुक वेळेस नियोजित (लक्ष्य) स्थळी जावयाचे असे ठरवलेले होते. त्या ठिकाणी निरीक्षक म्हणून बसवलेल्या महिलेस काही तरी 'दिसले' असे वाटले. म्हणून तिने कॅमेरा सुरू केला. थोड्याच वेळात त्या प्रयुक्त स्त्रीने फोनवरून डॉ ऑसिसजवळ कुरकूर केली की 'तुमच्या ऑफिसात मी आले असताना माझ्यावर पटापट कॅमेरा चालवणे ही काय तुमची रीत झाली?'

## शारीरिक दृष्ट्या निरीक्षण

ईगो स्वानच्या 'देहबाह्य अवस्थेत' त्याच्या मेंदूच्या पार्श्व खंडातील विद्युत लहरी सपाट होत गेल्या. त्याची फ्रीक्वेन्सी मात्र ८ ते १२ ऐवजी १२ ते २२ (बीटा लय) इतकी वाढली. बुबुळाची जलद हालचाल झालेली आढळली नाही.

हरारी 'देहबाह्य अवस्थेत' जाण्याचे वेळी त्वचेचे पोटेन्शिअल १५.४ ऐवजी ११.१ होई; हृदयाचे स्पदन तसेच श्वासोच्छ्वासात थोडी वाढ होई. प्रत्यक्ष त्या अवस्थेत गेल्यावेळी मेंदूच्या लहरी बऱ्याच अशी अल्फा लयीत असत व बुबुळाच्या हालचाली कमी झालेल्या असत. स्नायूचा विद्युत आलेख (EMG) त्यांची शिथिलता दर्शवीत होता. □

संदर्भ


1. R. C. Gonson, The Impersonal Splendour, 1953
2. M. Sabom, Reflections of Death : A Medical Investigation, 1982.
3. R Moody, Life After Life, 1975.
4. G. N M. Tyrrdl, Personality of Man, 1944.
5. S. J. Blackman, Transpersonal Pry 1968.
6. Jour. Nerves of Mental Disease, 1974.
7. Jour. Thanatologey 1971.
8. Res. in Parapsychology in 1982.

# लॉर्ड्सवरचा दणदणीत विजय आणि साहेबाची खिलाडूवृत्ती (?)

इंग्लंडचे खेळाडू नि प्रेक्षक म्हणे फारच खिलाडूवृत्तीचे असतात! पण तसे ते नसतात हे लॉर्ड्स् मैदानावर भारतीय संघाने नोंदविलेल्या ऐतिहासिक विजयानंतर पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. वेस्टंडीजकडून ५–० जबरदस्त मार खाल्ल्यानंतर, वेस्टंडीजच्या तुफानी गोलंदाजाकडून 'नाकाचे शेंडे' उडवून घेतल्यानंतर या साहेबाची गाठ पडली भारतासारख्या 'निरुपद्रवी' संघाशी!

भारताने बेन्सन हेजेस गमावला, ऑस्ट्रेलेशिया कप गमावला अन् अशा पार्श्वभूमीवर तो संघ इंग्लंडच्या भूमीवर म्हणजेच क्रिकेटच्या माहेरघरी उतरला. महिनाभर केवळ किरकोळ सामने झाले. कधी अनिर्णित तर कधी भारत तर कधी यजमान संघ विजयी होत कसोटी मालिकेकडे वाटचाल चालू होती. दोन आंतरराष्ट्रीय एक दिवशीय सामन्यात भारताने करंडक मिळवला; पण एक सामना गमावला. यामुळे इंग्लंडच्या संघाचे मनोधैर्य वाढले होते; किमान पक्षी ते कमी तरी झालेले नव्हते. तर अशा निरुपद्रवी संघाबरोबर इंग्लंडचा मुकाबला होता.

पहिलाच सामना लॉर्ड्सवर, क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या मैदानावर. भारत व इंग्लंड यांच्या दरम्यान या क्रिकेटशौकीनांच्या प्रिय मैदानावर १० कसोटी सामने झाले. त्यापैकी ८ इंग्लंडने जिंकलेले तर दोन अनिर्णित राहिलेले. या पार्श्वभूमीवर सुरू होत होता ११ वा सामना. डेव्हीड गावर नि कपिलदेव निखंज या दोन कप्तानांच्या दरम्यान.

गावर! एक दुर्दैवी कप्तान. गेल्या १४ सामन्यात इंग्लंडचा कप्तान! पण त्यातील एकही कसोटी सामना त्यानं जिंकलेला नव्हता. त्यामुळं त्याला आता किमान या भारताला तरी हरवायच होतं. त्यावरच त्याचं भवितव्य ठरणार होतं.

कपिलचही काहीसं असच होतं. २१ क्रिकेट कसोटी सामन्यात त्यानं भारताचं कर्णधारपद भूषविलं होतं; पण एकदाही विजय म्हणून काही त्याला मिळवता आला नव्हता. पण कपिलच 'वन डे' सम्राटपद मात्र नाकारता येत नव्हतं. त्याची मध्यमगती गोलंदाजी नि प्रसंगी नाबाद १७५धावा करणारी तुफानी फलंदाजी या गोष्टी नजरेआड करता येत नव्हत्या.

शेवटी खूप वाट पाहिल्यानंतर ५ जूनला भारत–इंग्लंड दरम्यानच्या १९८६ च्या कसोटी मालिकेतील पहिला सामना सुरू झाला. कपिलनं नाणेफेक जिंकली नि प्रथम गोलंदाजी पत्करली कपिलला नाणेफेकीनंतर निर्णय घेता येत नाही तो गोंधळात पडतो अशी टीका त्याच्यावर बेन्सन–हेजेसच्या सामन्यावेळी झाली होती. पण यावेळचा त्याचा निर्णय चुकीचा नव्हता हे पहिल्याच दिवशी दिसून आले

चेतन शर्मा! भारताचा नवा, तरुण, उसळत्या रक्ताचा, चेंडूलाही तसाच उसळविणारा, दाढीवाला, राकट पण मजबूत हाडाचा नि तिक्ष्ण नजरेचा मध्यमगती गोलंदाज तो व इंग्लंडचा ग्रॅहम गूच हे दोघे या पहिल्या दिवसाचे मानकरी ठरले. गूचने झंजावाती शतक ठोकले. सर्व भारतीय गोलंदाजांच्या नाकी दम आणीत, चेंडूला अनेकवेळा सीमापार पाठवित गूचने धावांची शंभरी ओलांडली.

चेतनने भारताच्या बाजूने इंग्लंडच्या संघाला भलेमोठे खिंडार पाडले. गूच, गावर, गेटींग, लॅंब यासारख्या भरंवशाच्या फलंदाजांना त्याने तंबूची वाट दाखविली. झाल; येथेच इंग्लंडच्या खेळाडूंची खिलाडूवृत्ती संपली. एक तुलनेनं बारकसं, कृशवजा पोरगं इंग्लंडची नांगी मोडतंय म्हटल्याबरोबर टीकेचा भडीमार सुरू झाला. चेतनच्या गोलंदाजीच्या शैलीवरच या साहेबलोकांनी आक्षेप घ्यायला सुरुवात केली. तो काहीसा 'थ्रो' करतो अशी ओरड सुरू केली.

गमतच आहे नाही? चेतन तोच; पण टीका नवी. चेतन ऑस्ट्रेलियात खेळला, शारजाला खेळला, भारतात खेळला, श्रीलंका न्यूझीलंड, पाकिस्तानविरुद्ध खेळला पण कोणीही त्याच्याबाबत हा आक्षेप घेतला नाही. साहेबलोकांचे सारेच निराळे ना? त्यांनी मात्र या दाढीवाल्यावर आक्षेप घेतला. पण आमचे असे कृशवजा 'रमाकांत'च जबरी गोलंदाजी करीत असतात हे ते साहेब सोईस्करपणे विसरलेले दिसले. साळगावकरला आम्ही असेच गमावले त्याच्याही वेगामुळे त्याच्या शैलीवर आक्षेप घेतले नि तो कायमचा बाद झाला. तर आता चेतनची गोलंदाजी सदोष वाटू लागली. पण करतो काय साहेब? सामना तर खेळायचाच होता वेस्ट इंडिजविरुद्ध नुकत्याच झालेल्या मालिकेत गेटिंगचे नाक फुटताच त्याने ओरड केली की 'हा वेग कोठे तरी थांबवायला हवा नाही तर खेळाडूंचे बळी जातील.' पण त्याच्याच संघाचे बोथम डिली वगैरे सर्वांचे हाल करीत होते तेव्हा मात्र त्यांना या मान्याची आठवण का झाली नाही अर्थात झाली नाही हे बरोबरच आहे तेव्हा इंग्लंड जिंकत होते. पण आता बाजी उलटली तेव्हा त्यांनी लगेच आपली '*खिलाडूवृत्ती*' त्यजली होती

तर गूचच्या शतकाने, शर्मांच्या भेदक गोलंदाजीने नि इंग्लंडच्या खेळाडू–प्रेक्षकांच्या टीकेने पहिला दिवस गाजला.

दुसऱ्या दिवशी शर्माने आणखी एक बळी घेतला नि आपल्या आतापर्यंतच्या कसोटी कारकिर्दीतली सर्वोत्कृष्ट गोलंदाजी सिद्ध केली रॉजर बिन्नीनेही तीन बळी मिळविले आणि इंग्लंडचा डाव २९४ मध्ये सपला.

त्यानंतर भारताने आपला डाव सुरू केला. या डावाचे वर्णन करीत बसण्याचे येथे कारण नाही. पण या डावात दोन महत्त्वाच्या घटनाची नोंद झाली. त्यातली एक होती सुनील गावसकरच्या संदर्भात तर दुसरी दिलीप वेंगसरकरच्या संदर्भात.

सुनील गावसकर ! भारताचा लिटल मास्टर, जगातला महान विक्रमवीर, गेली अनेक वर्षे एका विक्रमाची नोंद करण्यासाठी धडपडतोय आणि हा विक्रम म्हणजे प्रत्येक देशातील प्रत्येक मैदानावर शतक करण्याचा. या विक्रमात त्याला लॉर्डस् नेहमीच हुलकावणी देत आले आहे. यावेळी गावसकर लॉर्डस्‌लाच हुलकावणी देईल असे वाटत होते. कारण लॉर्डसवर खेळला गेलेला त्याचा हा कदाचित शेवटचाच सामना ठरण्याची शक्यता आहे. सुनीलने खेळी सुरू केली धीमेपणे. त्याने आज बाद होणार नाही याची काळजी घेत धावा जमविण्यास सुरुवात केली पण ३४ धावा झालेल्या असतानाच तो बाद झाला नि स्वप्न पुन्हा अधुरेच राहिले. विक्रमवीर सुनील एका विक्रमापासून वंचित राहिला.

दुसरी घटना दिलीप वेंगसरकरबाबत ! आपल्या गल्लीतल्या मैदानाची, तेथल्या खेळपट्टीची सर्व माहिती असावी नि तेथे आपण यथेच्छ ठोकाठोकी करावी अशा थाटात दिलीप नेहमीप्रमाणे लॉर्डस्‌वर उतरला होता. त्याने सहजपणे खेळीत लॉर्डस्‌वरचे आपले तिसरे शतक नोंदवीत एका विक्रमाची नोंद केली. त्याच्या या विक्रमी शतकामुळेच भारत इंग्लडवर ४७ धावांची आघाडी घेऊ शकला. दिलीपने नाबाद १२६ धावा आपल्या खात्यावर जमा केल्या.

या डावात त्याला मिळालेली मोहिंदर अमरनाथ, किरण मोरे यांची साथ कशी विसरता येईल?

हा गुरुवार, शुक्रवार, शनिवार अशा तीन दिवसाचा खेळ पार पडला होता. या तीनही दिवशी इग्लंडच्या प्रेक्षकांनी तोबा गर्दी केली होती. पण चौथ्या दिवशी ही संख्या काहीशी रोडावली. मात्र त्यावेळी सामना अनिर्णिततेकडे झुकण्याची चिन्हे दिसत होती. चौथ्या दिवशी माईक गॅटिंग व अॅलन लॅब यांनी भारतीय गोलंदाजाचे हाल केले. उपहारापर्यंतच त्यानी प्रत्येकाने पाच–पाचवेळा चेंडूला सीमापार केले होते. आता सामना नक्कीच अनिर्णित होणार असे वाटू लागले. कपिलदेवने १८ चेंडूत तिघांना बाद केले होते. तरी गॅटिंग– लॅब भारताच्या आशांना लबे करणार असे वाटू लागले. पण मनिंदरने तीन, कपिलने आणखी एक बळी मिळवित विजय पुन्हा भारताच्या पारड्यात आणून ठेवला इंग्लंडचा दुसरा डाव अवघ्या १८० धावात गुडाळला गेला होता. भारताची पहिल्या डावातील ४७ धावाची आघाडी विचारात घेता विजयासाठी भारताला अवघ्या १३४ धावा हव्या होत्या.

## ११ व्या षटकाचे हाल

आता भारताकडे एक सपूर्ण दिवस नि २० अनिवार्य षटके होती. विजयाची दिल्ली दूर नव्हती. पण वरुणराजाच्या मेहरबानीची गरज होती चौथ्या दिवसाचा खेळ सपतो तेव्हा आकाश काळवडून आले होते नि कपिलच्या यशाचा सूर्य ढगाआड लपला होता. विश्रांतीच्याच दिवशी कपिलने तर 'सामना निर्णायकच करीन' अशी प्रतिज्ञा केलेली होती. ती त्याला पुरी करायची होती.

पाचवा दिवस उजाडला लॉर्डस्‌वर पाऊस बरसत होता. अवघ्या भारतीय क्रिकेट जगताचे लक्ष या सामन्याकडे होते. वरुणराजाला आणाभाका घातल्या जाऊ लागल्या आणि सामन्याची अवधी २० मिनिटेच वाया गेली असताना वरुणराजाने हाक ऐकली व तात्पुरते थांबण्याचे आश्वासन देत तो गडप झाला. के. श्रीकातच्या जोडीनं सुनील मैदानावर उतरला. टाळ्याचा केविलवाणा कडकडाट झाला. केविलवाणा ? होय मात्र तसा तो का हे मात्र नंतर पहायचय.

सुनीलने फटकेबाजीला सुरुवात केली. श्रीकात मात्र चाचपडत खेळत होता. अखेरीस भोपळाही न फोडता परत जात त्याने भारताला एक धक्का दिला. तिकडे डिली बेहोष झाला. मोहिंदर आला सुनीलने चौकारामागून चौकार मारण्यास प्रारभ केला. आपला आवडता पण हल्ली टाळलेला स्ट्रेटड्राइव्हचा फटकाही त्याने मारला. तो बाद होणार नाही असे समालोचक म्हणत असतानाच पुन्हा डिलीने चमत्कार केला. २२ धावावर सनीला त्याने तंबूत परतवले.

पुन्हा एकदा दिलीप उतरला आल्या–आल्या चौकार ठोकीत लॉर्डस् आपल्याच घरचे आहे याची जाणीव साहेबलोकांना करून दिली. मोहिंदर एका बाजूने यष्टया सांभाळून होता. उपहाराला खेळ थाबला तेव्हा २ बाद ७२ धावा होत्या. आता बहुदा जिमी नि दिलीपच धावसंख्या उभारणार असे वाटत होते. पण उपहारानंतर सहा धावांची भर टाकून दोघेहीजण माघारी आले. अझरूद्दीनने फटकेबाजी केली नि स्थिर स्थावर होतो असे दाखवित असतानाच तो धावबाद झाला. पाच बाद ११० अशी भारताची स्थिती होती भारताला आता २४ धावाची गरज होती. मोहरे तर कोसळत होते.

अशा वेळी मग बॅट फिरवित, लावलेल्या सामन्यावर वैतागलेला, पहिल्या कसोटी विजयासाठी आसुसलेला भारताचा अष्टपैलू कर्णधार कपिल देव मैदानात उतरला. उपकर्णधार रवि शास्त्री मैदानातच त्याची वाट पहात होता. गावरने परिस्थिती लक्षात घेऊन क्षेत्ररक्षक पागवले. या अधीर फलंदाजाचा झेल सीमारेषेपाशी टिपावा हा हेतू त्यामागे होता. पण त्या पागलेल्याना कपिलने शक्तिनिशी मारलेले ठोके अडवता आले नव्हते एवढ्या वेगाने चेंडू सीमापार जात होता.

तशात आले एडमडचे ते षटक, ते ११ वे षटक्. एडमडला या षटकाचे हाल आधी ठाऊक असते तर त्याने कदाचित हे धाडस केले नसते. पहिले दोन चेंडू कपिलने केव्हाच सीमापार केले होते. त्यानतर आणखी एक चौकार मारला व विजयासाठी आता केवळ चार धावा शिल्लक ठेवल्या. एडमडने चेंडू टाकला नि कपिल देव निखजने तो एकदम प्रेक्षकातच ठोकला. भारताने लॉर्डस्‌वरचा सामना जिंकला, कपिलने आपल्या कारकिर्दितला १ ला सामना जिंकला. पुन्हा एकदा टाळ्यांचा केविलवाणा गजर झाला.

होय केविलवाणा ! कारण हा विजय पाहायला खिलाडूवृत्तीचे साहेब आले नव्हते. अवघे ३५० प्रेक्षक हा सामना पाहात होते. साहेबाची हार पक्की झाल्यावर साहेब फिरकतो कशाला लॉर्डस्‌कडे ? पाऊस, विकेन्ड

नव्हता वगैरे दुर्बल कारणे त्याला देता येतील, पण खरे कारण इंग्लंडची हार हे होते.

तर अशी आहे साहेबाची खिलाडूवृत्ती. स्वतः जिंकले तर ते हरणाऱ्या संघाचही कौतुक करतील पण स्वतः हरले तर मात्र जिंकलेल्यांना श्रेय देणे त्याना जमत नाही. मग त्याना शर्माची शैली चुकीचीच वाटते. मग त्याना काम आठवते, पाऊसही आठवतो. चालू कसोटी मालिकेतील आणखी दोन सामने बाकी आहेत. सामने निर्णायक करावयाचे ब्रीद असणाऱ्या कपिलने ते जिंकले तर साहेबाचे कसे व्हायचे कोणास ठाऊक. वेस्टइंडीजकडून ४–० हार खाल्ली आहे भारताकडून ३–० हार खाल्ली तर साहेब हाय खाईल यात शंका नाही. पण थांबा, तिकडे गावरची उचलबांगडी झालीय. माईक गॅटिंगने ती कर्णधारपदाची सूत्रं हाती घेतली आहेत. आता पाहू या हे गॅटिंगसाहेब आपलं नाक पुन्हा किती सरळ करतायत ते !

— अनिल शिंदे

रंगभूमी

## 'आविष्कार'ची उत्तम नाट्यनिर्मिती :

# आर्य चाणक्य

वि. भा. देशपांडे

'आर्य चाणक्य' हे नाटक ल. मो. बांदेकर यानी लिहिलेले आहे. बांदेकर हे नाव तसे अपरिचित. सावंतवाडीचा हा लेखक मुंबईपर्यंत पोहोचला ही उत्तम गोष्ट झाली. अशा अर्थाने की, आपल्या लेखनाचे रंगमंचावर नेमके काय घडू शकते, त्याचा प्रतिसाद कसा येऊ शकतो याचा त्याना अंदाज आला. त्यांच्या लेखनात आश्वासकता निश्चितच आहे.

आर्य चाणक्य हा विषय साहित्याला, नाटकाला तसा नवीन नाही. अलिकडच्या काळात सावंतवाडीचे हे बांदेकर धरून मी तीन नव्या नाटककारांची याच विषयावरची नाटके ऐकलेली आहेत या विषयावर अनेकांना नाटके का लिहावीशी वाटतात ? तर त्याचे दर्शनी उत्तर आहे की, इतिहासकाळात ज्या व्यक्तीच्या जीवनात मोठ्या प्रमाणात नाट्यपूर्णता आहे अशामध्ये चाणक्य हा आहे. अशा ऐतिहासिक नाटकात मूळ घटना जरी तेवढ्याच असल्या तरी त्या घटनाचे व्यक्तिमत्वविशेषांचे अन्वयार्थ नाटककार कसे लावतो, यावर त्या नाट्यलेखनाची गुणवत्ता सिद्ध होत असते त्या दृष्टीने पाहिले तर बांदेकरानी लिहिलेले नाटक निश्चितच विचार करण्याजोगे आहे. चाणक्याचा नंदाकडे झालेला अपमान, त्यातून निर्माण झालेली सूडाची भावना, घडलेल्या गोष्टी, या सर्वांतून उभे राहिलेले नाट्य हे सर्वपरिचित आहे. ही घटना चौकट स्थूलरुपाने नाटककाराने वापरली आहेच. पण केवळ तेवढीच वापरली नाही. तर चाणक्याने तक्षशीलेमध्ये घेतलेले शिक्षण, त्यावर झालेले संस्कार याचे सूत्रही आरंभी वापरले आहे. तसेच चाणक्याची व्यक्तिरेखा दोन स्तरावर व्यक्त करण्याचा प्रयत्न आहे. एक व्यक्तिगत स्तरावर त्याचा झालेला अपमान, त्यातून नंदघराण्याचा निपात करण्याची योजना, दुसरा स्तर आहे तो अधिक व्यापक. या निमित्ताने भारत देश एकसंध करता आला तर पाहावा निरनिराळ्या राजाना भेटून आपापसात न लढता, परकीयाना मदत न करता भारत देश बलवान कसा होईल यासाठी त्याने आयुष्याचा खूप वेळ खर्ची घातला. या दुसऱ्या स्तरामुळे चाणक्याच्या व्यक्तिरेखेला एक नवे परिमाण निर्माण झाले. त्यालाच पूरक म्हणून नाटकाच्या अखेरीस आपल्या मनाप्रमाणे सारे घडल्यावर स्वार्थात न गुतून पडता आपल्या चणक या गावी जाण्याचा त्याने निर्णय घेतला त्यामुळे हे सारे त्याने जे घडवले ते आरंभी जरी व्यक्ती स्तरावर वाटले तरी अखेरीस ते भारत देशाच्या आणि संबंधित व्यक्तीच्या संदर्भातलेच होते, यावर लक्ष केंद्रित झाले.

बांदेकरानी नाट्यविषयाची मांडणी, प्रसंगाची योजना, व्यक्तिरेखाचा वापर यथायोग्यपणे केलेला आहे विषयाच्या गांभीर्याला साजेलशी वजनदार संवादभाषाही वापरली आहे त्यामध्ये काही शब्द खटकले ते म्हणजे कुत्रा, खर्व, झक मारणे इत्यादी. ते बदलून दुसरे वापरणे शक्य आहे. सहितेच्या संदर्भात दोन प्रश्न उभे राहतात. एक म्हणजे नाटककाराने या प्रकारच्या ऐतिहासिक, गंभीर प्रकृतीच्या विषयासाठी दशावतारी संकल्पनेचा वापर आरंभी–अखेरीस मोठ्या प्रमाणात का केला ? किंवा सूत्रधार शंकासूर यांचा उपयोग कशासाठी केला ? त्याचे एक अकलात्मक उत्तर असे असू शकेल, नाटककार ज्या गावचा आहे तिथे दशावतारी नाटकाचा प्रभाव आहे. पण चाणक्य ही गंभीर प्रकृती व्यक्तिरेखा आणि नाटकाचा सारा आशय–विषयही गंभीर स्तरावरचा. त्यामुळे दशावतारी शैलीने त्यात अधिक भर पडली असे वाटले नाही. का केवळ एक शैली वापरून पाहायची म्हणून स्वीकारली ? दुसरा प्रश्न आहे तो चाणक्याच्या व्यक्तिरेखनाचा. नाटककार चाणक्याच्या जीवनातील घटना प्रसंगाचे चित्रीकरण करण्यात इतका गुंतला की त्यामुळे त्यातल्या मनोदर्शनाचा, विश्लेषणाचा भाग पार्श्वभागी राहिला दर्शनी चाणक्याच्या जीवनाचे एक 'डॉक्युमेन्टेशन' आपण पाहात आहोत असे अनेकदा वाटून गेले. नाट्यगत घटना प्रसंगाची संख्या आणि गती–वेग इतका झाला की त्यामुळेही असे घडले असावे.

या नाटकाचा प्रयोग मात्र ताकदीने उभा राहिलेला आहे. अजित भगत याचे दिग्दर्शन, तुलसी बेहरेची दशावतारी संकल्पना, प्रदीप मुळेने केलेली स्तरनिविष्ट रंगमंच योजना, या व्यतिरिक्त प्रकाश–संगीत याचा वापर. यामुळे प्रयोगाचा परिणाम वाढता राहिला. तरीही जाणवले ते असे की, पूर्वार्ध–पहिला अंक हा विस्ताराने अधिक आहे. उत्तरार्ध–दुसरा अंक आकाराने प्रमाणशीर आणि परिणामाला नेमका आहे. दिग्दर्शकाने पहिल्या अंकाचे काही प्रमाणात संपादन करणे आवश्यक आहे.

या नाटकाची प्रयोगमूल्ये सर्वार्थाने चांगली होती. प्रयोगतंत्राच्या बरोबरीने अभिनयाचा भागही लक्षवेधी होता प्रमोद पवारने केलेला चाणक्य किती तरी काळ स्मरणात राहील. ( जशी त्याने केलेली टिळकांची व्यक्तिरेखा स्मरणात राहणारी आहे ) त्याचे शब्दांचे उच्चारण, त्यांचे वजन, फेक आणि एकूणच व्यक्तिरेखेचा बाज महत्त्वाचा होता त्याला तसे रंगमंचीय व्यक्तित्व नाही, पण तो ती

उणीव आपल्या अभिनयाने भरून काढतो. आजकाल रंगभूमीवर चागली बोलणारी नटमंडळी दुर्मिळ होत चालली आहेत. त्यामध्ये प्रमोद पवार, अच्युत पोतदार यांच्यासारख्या मंडळीचे महत्त्व निश्चितच आहे. अच्युतने केलेली अमात्य राक्षसाची भूमिका तितकीच तोलाची होती. पण आहे त्यापेक्षा ती अधिक प्रमाणात व्यक्त व्हायला पाहिजे असे वाटले. म्हणजे नाटचपरिणामही वाढेल. या दोघाच्या जोडीने लक्षात राहिला तो नागेश मोखेकर. त्याला विनोदाचे अंग चागले आहे. शब्दफेकीचे तंत्र अचूकपणे वापरण्याची कला आहे. त्याने प्रयोगात मजा आणली. या व्यतिरिक्त सयाजी शिंदे, देवानद जाधव, प्रमोद भंगाळे, विनोद पडित, नाना दळवी, प्रकाश माने, सामंत, मरक, बोरकर, जोशी, गावडे आदी कलाकार होते. मुबईच्या आविष्कार नाटचसंस्थेने एक उत्तम प्रयोग पेश करून प्रायोगिक स्तरावर लक्षवेधी काम केले आहे म्हणून सूत्रधार काकडे आदी मंडळीना धन्यवाद.

### □ आदरांजली

प्रा. अरविंद मगरूळकर, प्रा. डॉ. प्रभुदास भुपटकर आणि डॅडी लोणकर हे तिघेही नाटक–रंगभूमीशी भिन्न भिन्न कारणांनी सबंधित होते. गेल्या काही दिवसापूर्वी या तिघाचे निधन झाले.

मंगरूळकर हे बहुभाषी होते. भाषा, साहित्य, व्याकरण यावर त्याचे प्रभुत्व होते. ज्ञानेश्वरी, व्याकरण यांचे ते भाष्यकार होते. त्याच्याच बरोबरीने ते आस्वादक समीक्षक होते. नृत्य, नाटच, सगीत आणि चित्रकला यांचे ते सखोल ज्ञानी होते. यावर अधिकारवाणीने समीक्षा करणारे होते. परपरेचे भान असणारे आणि नवतेची ओढ असणारे त्याचे व्यक्तिमत्त्व अनेक उत्तम समीक्षाना जन्म देत असे. त्यानी जीवनाच्या अनेक अंगांवर प्रेम केले. जे जे जीवनसौंदर्य, कलासौंदर्य त्यांना भावले ते ते त्यांनी मुक्तपणाने सर्वांना दिले. महाराणी पद्मिनी, 'घाशीराम कोतवाल' या नाटकांवरची त्याची समीक्षा ही केवळ वाचनीय नाही तर संग्रहणीय आहे.

प्रा. डॉ. भुपटकर हे हिंदीचे ख्यातनाम अध्यापक, प्रचारक, प्रवक्ते होते. नाटक हा त्याच्या अभ्यासाचा, आवडीचा, जीवनकार्याचा विषय होता. ते स्वतः नट-दिग्दर्शक, कार्यकर्ते होते. त्यांनी केलेल्या नाटकापैकी अंमलदार, सत्त्वपरीक्षा, वि. द. घाटे यांची एकाकिका, यातील भूमिका मी पाहिल्या होत्या. दिग्दर्शनेही पाहिली होती. महाराष्ट्रीय कलोपासक या जुन्या–जाणत्या नाटचसस्थेचे ते बरीच वर्षे कार्याध्यक्ष होते. वेळेच्या संदर्भात अतिशय कडक होते.

डॅडी तथा मु. रा. लोणकर हे एक उत्तम सघटक होते. समाजकल्याण खाते, नाशिकचे लोकहितवादी मंडळ, पुण्याची रगदीप, मनोरजन या सस्थांमध्ये त्यानी भरपूर काम केले. पुण्यामध्ये १९७७ साली झालेल्या नाटचसमेलन आणि त्यानतर पुण्यात निघालेली अखिल भारतीय नाटचपरिषदेची शाखा त्यामध्ये त्याच्या कार्याचा वाटा मोठा आहे. त्या त्याच्या स्मृती आहेत.

या तिघाच्या स्मृतीस भावपूर्ण आदराजली □

चित्रपट

# आखरी रास्ता

## शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रकार


के. भाग्यराज हा दक्षिणेतला सुपरस्टार त्यानं जरा व्यापक क्षेत्र स्वीकारायच ठरवलं आणि निर्माण झाला 'आखरी रास्ता'. अमिताभ बच्चन असलेल्या इतर चित्रपटांत जे असत तेच इथही झालेल आहे. म्हणजे अमिताभ सगळा चित्रपट व्यापून वर उरला आहे. शिवाय इथं त्याचा डबल रोल असल्यान बघायलाच नको. नावाला असलेल्या जयाप्रदा आणि श्रीदेवी सोडल्या, तर इतर कुणाही पात्राला इथ महत्त्व नाही. १८ रिळाच्या या सपूर्ण चित्रपटात आहे तो फक्त अमिताभ. त्याच्या चाहत्याना यामुळं हा चित्रपट आवडेलही कदाचित, पण चित्रपटाच्या इतर अगापेक्षा एकाच अभिनेत्याला जास्त महत्त्व आल्यामुळ चित्रपटाचं फारसं भलं झालेलं नाही.

बऱ्याच दिवसाच्या 'गॅप' नतर अमिताभचे अलिकडच्या काळात आलेले चित्रपट म्हणजे 'मर्द' आणि हा 'आखरी रास्ता'. पैकी 'मर्द' यशस्वी झाला असला तरी तो चित्रपट आणि त्यातली अमिताभची भूमिका अतिशय वाईट, त्याला न शोभणारी होती. 'आखरी रास्ता'तला रोल मात्र खूपच सिरीयस आहे त्यामुळ 'मर्द' सारखा धेडगुजरी प्रकार इथं पहायला मिळत नाही. पण एवढा मुद्दा सोडला तर तीच सूडान पेटलेल्या व्यक्तीची कहाणी. एक कायदा हातात घेऊ पहाणारा तर दुसरा कायद्याचा रक्षक. यामुळ निर्माण होणारा बाप–मुलाचा सघर्ष हा नेहमीचाच प्रकार इथ आहे त्यामुळ 'आखरी रास्ता' हा शिळ्या कढीला ऊत आणण्यासारखा प्रकार वाटतो.

डेव्हिड (अमिताभ बच्चन) हा एक अशिक्षित, साधासुधा तरुण. चतुर्वेदी (सदाशिव अमरापूरकर) या नेत्यावर त्याची कमालीची भक्ती असते. त्याच्या इशाऱ्यावर तो नाचत असतो. मेरी (जयाप्रदा) त्याच्या आयुष्यात येते आणि त्याचं आयुष्य बदलून जात, ती त्याला सुशिक्षित, सुसंस्कृत बनवायचा प्रयत्न करते.

पण एकदा चतुर्वेदीची वाईट नजर मेरीवर पडते. तो रेल्वे संपाच निमित्त करून डेव्हिडला तुरुगात पाठवतो आणि इकडे मेरीवर बलात्कार करतो. मेरी आत्महत्या करते. पण एका पत्रात सगळं लिहून ठेवते. डेव्हिडला हे कळतं आणि तो चतुर्वेदीवर भडकून उठतो. पण त्याचा काही उपयोग होत नाही. पोलीस इन्स्पेक्टर सहाय (दलिप ताहिल) आणि डॉक्टर वर्मा (भरतकपूर) चतुर्वेदीला पुरावा नष्ट करण्यासाठी मदत करतात. आणि डेव्हिडनंच मेरीचा खून केला अशी साक्षही न्यायालयात देतात. परिणामी डेव्हिडला शिक्षा होते. आपल्या लहान मुलाला आपल्या मित्राकडे महेशकडे (अनुपम खेर) सोपवून आणि त्याला या लोकाचा बदला घेण्यासाठी गुंड बनवण्याच आश्वासन घेऊन डेव्हिड तुरुंगात जातो.

चोवीस वर्षानतर तो सुटून येतो तेव्हा त्याचा मुलगा विजय (पुन्हा अमिताभ) हा पोलिस अधिकारी झालेला असतो. आपल्या सूडप्रकरणात आपल्या मुलाची मदत मिळणार नाही हे लक्षात येताच डेव्हिड आपल्या



पद्धतीने सहाय आणि वर्मा यांना काटा काढतो.

दरम्यान इतके दिवस महेशलाच आपले वडील समजणाऱ्या विजयला सत्य समजून चुकते. आणि चतुर्वेदीच्या बाबतीत आपण कायद्याच्या मार्गानं जाऊ असं तो डेव्हिडला सुचवतो. तो ते अमान्य करतो आणि मग शेवटच्या संघर्षात चतुर्वेदी आणि डेव्हिड दोघांचाही बळी जातो.

'आखरी रास्ता' सुरू होतो डेव्हिड तुरुंगातून सुटतो त्या प्रसंगावर. त्यामुळं फ्लॅशबॅक इथं अपरिहार्य आहे; पण तो सलग न दाखवता तुटक तुटक एखाद्या विशिष्ट प्रसंगांनंतर असा दाखवला आहे. अर्थात त्यामुळं फार वेगळा परिणाम साधला जातो असं नाही. चित्रपटाच्या कथेबद्दल फारसं बोलण्यासारखं नाही. पूर्वी असंख्य वेळा पडद्यावर येऊन गेलेल्या कथेत आणि पटकथेत नाविन्यांची तरी काय अपेक्षा करणार? सगळे प्रसंग पूर्वी या ना त्या चित्रपटात पाहिल्यासारखे वाटतात.

अमिताभला जास्तीत जास्त वाव देऊन चित्रपट काढायचा एवढा एकच उद्देश दिग्दर्शक भाग्यराजनं डोळ्यासमोर ठेवला असल्यानं बाकीच्या गोष्टी त्याच्या दृष्टीनं गौण ठरल्या आहेत. चित्रपटाचा वेग मधेच एकदम थंडावतो. अठरा रिळांच्या या चित्रपटातले काही प्रसंग कंटाळा येण्याइतके लांबवले आहेत. अमिताभला अलिकडच्या काही चित्रपटांप्रमाणं अर्धवट विनोदी–अर्धवट गंभीर अशा रूपात न दाखवता त्याची व्यक्तिरेखा पुरेशी गंभीर दाखवली आहे तेवढं एक बरं आहे.

या चित्रपटात वास्तविक गाण्यांना वाव नाही. पण हिरोला गाणीही येतात हे दाखवायला अट्टाहासानं ती टाकली आहेत. त्यांना दिलेलं लक्ष्मी–प्यारेचं संगीत अत्यंत सुमार.

हा चित्रपट अमिताभचाच आहे आणि ही हातखंडा भूमिका त्यानं सफाईनं केली आहे. तरुण मुलापेक्षा बापाच्या भूमिकेत तो अधिक शोभतो. पण या भूमिकेत त्यानं इतका खालचा आवाज वापरला आहे की तो काय बोलतोय हेच कधीकधी ऐकू येत नाही. जयाप्रदा आणि श्रीदेवी कुणीतरी स्त्रीपात्रं चित्रपटात असावीत म्हणून आहेत. त्यांना काहीही काम नाही. भूमिका छोटी असूनही लक्ष वेधून घेतात ते अनुपम खेर आणि सदाशिव अमरापूरकर. अनुपमची भूमिका त्याच्या इतर भूमिकांपेक्षा वेगळी, थोडी लाईट शेड असलेली आहे पण तीही त्यान चांगली जमवली आहे. इतर भूमिकांत ओम शिवपुरी, दलिप ताहिल, भरतकपूर आहेत.

एकूण नेहमीचा मसाला आणि शिळी कथा वापरून अमिताभच्या चाहत्यांना खूष करण्याचा प्रयत्न म्हणजे 'आखरी रास्ता'

— सीमा कुलकर्णी

## विज्ञान

### ☐ गवत

भुकेलेला सिंह कधी गवत खाईल का? नक्कीच नाही खाणार. पण अगदीच संकटात सापडलेला मनुष्य मात्र खाईल. नव्हे त्याने गवत खावे व आपला जीव वाचवावा असा शास्त्रज्ञांचा सल्ला आहे. गवतातूनही माणूस पोषण मिळवू शकेल.

पालेभाज्या, गव्हाचा कोंडा (पिठातून मिळणारा) व अन्य अन्नपदार्थांत सेल्युलोजयुक्त 'धागे' (फायबर्स) असतात. डॉक्टरांच्या परिभाषेत असल्या पदार्थांना 'रफेज' (Roughage) म्हणतात व त्यांचा शौचास साफ होऊन पोट तंदुरुस्त ठेवण्यासाठी उपयोग होतो. त्यांना काही पोषणमूल्य नसते असा आजवरचा समज होता. अन्नपदार्थांतील फायबर म्हणजे पेशींच्या भिंती त्या बव्हंशी सेल्युलोजच्या असतात. गुरे, ससे, घोडे अशासारख्या प्राण्यांच्या पोटात जे एकप्रकारचे जीवाणू (बॅक्टेरिया) असतात त्यांच्यामुळे फायबरचे पचन होऊ शकते. माणसांच्या शरीरातही हे जीवाणू असतात. पण मोठ्या आतड्यातल्या ज्या भागात (कोलन) ते असतात तिथे त्यांचा पचनासाठी उपयोग होऊ शकत नाही. ह्या दृष्टिकोनातील त्रुटींची थोडीफार कल्पना नुकतीच येऊ लागली आहे. काही माणसे अन्नातून मिळणाऱ्या फायबरपासून त्यांच्या गरजेचा काही हिस्सा ऊर्जा मिळवू शकतात. संकटात सापडलेला (उदा. युद्धात एकाकी पडलेला व त्याच्याजवळील अन्नसाठा संपून गेलेला आहे असा सैनिक) माणूस गवत खाऊन आपला जीव वाचवू शकेल.

पालेभाज्या व कडधान्यांच्या पेशींच्या भिंतीत सेल्युलोजशिवाय पेक्टिन (वनस्पतींच्या ऊतींपासून मिळणारे पाण्यात विरघळणारे एक प्रकारचे पदार्थ त्यांच्यापासून जेल तयार होते.) आणि हेमिसेल्युलोज हे पदार्थ असतात. हेमिसेल्युलोज या एक प्रकारच्या शर्कराच म्हणता येतील. कडधान्याच्या भ्रूणकोष (एंडोस्पर्म) मध्ये हेमिसेल्युलोजांचे प्रमाण बरेच जास्त असते व पेक्टिनचे प्रमाण बरेच

कमी. या सर्व पदार्थांचे जठर व लहान आतड्यात पचन न होता ते जसेच्या तसे मोठ्या आतड्याच्या शेवटच्या भागात ( कोलन ) येतात म्हणून त्यांना रफेज ( Roughage ) म्हणतात. कोलनमध्ये जीवाणूवरील पदार्थांवर जोरदार हल्ला चढवतात. काही प्रकारच्या फायबरांचे पूर्णतः विघटन ( डीग्रेड ) होते. कोलन म्हणजे निव्वळ मल वाहून न्यायचा निष्क्रीय मार्ग आहे हा परंपरागत दृष्टिकोनही चुकीचा ठरला आहे. फायबरचे जीवाणूंनी विघटन केल्यावर त्यातून बाष्पशील मेदाम्ले (व्होलाटाइल फॅटी अ‍ॅसिड्स) तयार होतात. गुरांना या मेदाम्लांपासून शक्ती मिळते. माणसांच्या बाबतीतही मेदाम्ले कोलनच्या भिंतीकडून शोषिली जातात व त्यांचा चयापचय क्रियेत वापर होतो. प्रत्यक्षात ही क्रिया कशी होते हे अद्याप गूढ आहे.

फायबरपासून मिळणारी शक्ती कमीच असते. १ ग्रॅम साखरेपासून सुमारे ४॥ कॅलरी ऊर्जा मिळते तर १ ग्रॅम फायबरपासून त्याच्या सुमारे ६०%. ज्यांच्या जेवणात रफेजचे प्रमाण कमी असते त्यांना फायबरपासून उपलब्ध असणारे पोषण अर्थातच कमी मिळणार. खेड्यातील गरीब लोक व आदिवासी यांच्या खाण्यात झाडपाला, कंदमुळे जास्त प्रमाणात असतात. त्यांच्या बाबतीत हे प्रमाण त्यांच्या रोजच्या ऊर्जेच्या १० ते १५ टक्के किंवा त्याहूनही जास्त असू शकते.

'गरीबांची देवालाच काळजी' हे यावरून नाही का सिद्ध होत ! चळवळे लोक उगीचच गरीब, आदिवासींच्या कुपोषणाबद्दल ओरड करत असतात. पंचतारांकित संस्कृतिवाल्यांनी तिकडे लक्ष देऊ नये. विज्ञान तुमच्या बाजूने आहे !!

## □ बगॅसपासून अल्कोहोल

भारतात साखर कारखानदारी, ऊर्जितावस्थेत नसली तरी, वाढली आहे. साखर करताना ऊस गाळल्यावर जो चोथा (bagasse) रहातो त्याचा अगदी अलिकडेपर्यंत कारखान्याच्या बॉयलरमध्ये जाळण्यासाठी उपयोग केला जात असे. बगॅसचा इंधन म्हणूनही उपयोग करूनही पुष्कळसा बगॅस शिल्लक रहातोच. त्याचा प्रामुख्याने पुठ्ठे व क्रॅफ्ट कागद करण्यासाठी वापर केला जातो. कागद तयार करण्याच्या विकसित तंत्रज्ञानाचा उपयोग करून आता बगॅसपासून पांढरा छपाईचा कागदही बनविता येऊ लागला आहे. उसाच्या रसापासून साखर बनविल्यावर जो काळपट, चिकट अर्धद्रव पदार्थ उरतो त्याला मळी– molasses – म्हणतात. त्यात साखर असते. पण तिचे पक्क्या साखरेत रूपांतर करता येत नाही. मात्र मळी फसफसवून (Fermentation) त्यापासून अल्कोहोल तयार करता येते. शिवाय अ‍ॅसेटिक अ‍ॅसिड, अ‍ॅसिटोन, पॉवर अल्कोहोल इत्यादी अनेक रसायने त्यापासून तयार होऊ शकतात. यामुळे साखर निर्मितीचा खर्च कमी होऊन ती बाजारात स्वस्त विकणे शक्य होते. अनेक साखर उत्पादक देशात तशी ती स्वस्त असतेही. भारतात मात्र साखरेचा उत्पादन खर्च अनावश्यक जास्त असल्यामुळे तिचा बाजारातील दर आंतरराष्ट्रीय दरापेक्षा चढाच असतो.

एका जर्मन फरमेंटेशन प्रक्रियेमुळे आता बगॅसपासून अल्कोहोल बनवणे शक्य झाले आहे. या प्रक्रियेवर आधारलेल्या डिस्टिलरी ब्राझीलमध्ये सुरू झाल्या आहेत. या प्रक्रियेत बगॅसमधल्या सेल्युलोजचे अमलाच्या सहाय्याने जलीय विच्छेदन (अ‍ॅसिड हायड्रॉलिसिस) केले जाते. डिस्टिलरी उभारण्याचा भांडवली खर्च मात्र जास्त आहे. तथापि उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या खर्चापैकी ६० ते ७० टक्के खर्च बगॅसचाच (म्हणजे पर्यायाने उसाचा) असल्यामुळे अंती या पद्धतीने तयार झालेले अल्कोहोल स्वस्तच पडेल. बगॅसपासून अल्कोहोल तयार करण्याच्या तंत्राचा मोठ्या प्रमाणात उपयोग झाल्यास ऊर्जा निर्मितीसाठी पेट्रोलची जागा अल्कोहोल घेऊ शकेल.

मोटारगाड्यांना चटकन वेग मिळण्यासाठी व त्या वेगाने चालवण्यासाठी उच्च ऑक्टेनचे पेट्रोल वापरतात. या पेट्रोलमध्ये शिसे असते व त्यामुळे प्रदूषणाची समस्या निर्माण होते. यावर उपाय म्हणून अमेरिका व इतर राष्ट्रे पेट्रोलमध्ये शिसे (शिशाची संयुगे) मिसळण्याऐवजी १० टक्के अल्कोहोल मिसळून तयार होणारे गॅसोहोल (गॅसोलिन + अल्कोहोल) वापरतात. पेट्रोलऐवजी अल्कोहोलचा उपयोग करणाऱ्या मोटरगाड्या अधिकाधिक संख्येने रस्त्यावर येत आहेत. गेल्या वर्षी एकट्या ब्राझीलमध्ये अल्कोहोलवर चालणारी सुमारे २० लाख वाहने वापरात आली. भारतात पेट्रोलचे उत्पादन मागणीपेक्षा खूपच कमी आहे व ते कमीच रहाणार आहे. सरकारी धोरणांमुळे आपली अर्थव्यवस्था हळूहळू अमेरिकेच्या २० व्या शतकाची सुरुवात ते ७ वे दशक या दरम्यानच्या मोटर उद्योगावर आधारित अशा भांडवलशाही मार्गावर वळते आहे. रस्त्यावर वाहनांची संख्या झपाट्याने वाढेल. पेट्रोलसारख्या महाग व सर्वस्वी नसले तरी बऱ्याच अंशी परावलंबी बनवणाऱ्या वस्तूंचा वापर करण्याऐवजी अल्कोहोलसारख्या स्थानीय (indigenous) पदार्थांवर अवलंबून असणे केव्हाही श्रेयस्कर.

–सु. स. शिरोडकर



# क्षणोक्षणी उत्कंठा वाढवणारी जेफ्री आर्चर लिखित एक जगप्रसिद्ध कादंबरी

न्यूयॉर्कच्या अत्यंत गरीब वस्तीत वाढलेल्या उपेक्षित हार्वे मेटकाफची एकमेव महत्त्वाकांक्षा होती–

येनकेन प्रकारेण अफाट श्रीमंत व्हायचं.

भयानक आर्थिक मंदीच्या काळात, अनाथ व दरिद्री हार्वे जिवंत राहण्याची धडपड करता करता अतिशय धूर्त अन् कावेबाज झाला होता.

या गुणांचा ( ? ) उपयोग करून घेत घेत हार्वे खूप श्रीमंत झाला.

त्याच्या उलाढाली चालूच होत्या.

अशाच एका लबाडीच्या उलाढालीत प्रॉस्पेक्टा ऑईल कंपनी नावाची बोगस कंपनी काढून दहा लाख डॉलर्स गिळंकृत करायची त्याची योजना.

पण या भानगडीत फसलेल्या लोकांमधे चार लोक प्रतिष्ठित होते.

हार्वेकडून लुबाडले गेले तर ते पैसा आणि प्रतिष्ठा दोन्हीही गमावून बसणार होते.

ते एकत्र आले, आपल्याला गंडवणारा माणूस कोण, हे त्यांनी शोधून काढलं.

आणि ठरवलं की पै न पै त्याच्याकडून वसूल करायची ....

आपल्याला फसवणाऱ्या एका व्यक्तीवर डाव उलटवण्याच्या इर्षेने पेटलेल्या चौघांनी रचलेले डाव–प्रतिडाव यामुळे रंगत जाणारी,
क्षणोक्षणी उत्कंठा वाढवणारी
Not a penny more, not a penny less
ही जेफ्री आर्चर लिखित जगप्रसिद्ध कादंबरी–

# ठकासी असावे ....

**मराठीत प्रथमच**

**२ आणि १६ ऑगस्ट**

माणूस नवजागर विशेषांकात